# १

# पंचायतराज

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

१.३.१ भारतातील पंचायतीराज संस्थांची उत्क्रांती

१.३.२ घटनात्मक चौकट: ७३ वी घटनादुरुस्ती कायदा

१.३.३ महाराष्ट्र, केरळ, पश्चिम बंगाल आणि मध्यप्रदेश यांचा तुलनात्मक अभ्यास

## १.१ उद्दिष्टे

**पंचायतराज** या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. पंचायतराज म्हणजे काय हे सांगता येईल.

२. पंचायतराज संस्थांची उत्क्रांती व विकास सांगता येईल.

३. ७३वी घटनादुरुस्ती व ७३ व्या घटना दुरुस्तीचे वैशिष्ट्ये सांगता येतील.

## १.२ प्रास्ताविक

भारत हा प्रामुख्याने खेड्यांचा देश आहे आणि भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ७२% लोक ग्रामीण भागात राहतात.ग्रामीण भारतातील राज्यकारभाराच्या बिजा रोपणातुन लोकशाहीची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली पाहिजे या उद्देशाने महात्मा गांधींनी असे म्हटले की, विकासासाठी आणि शासनासाठी मुख्य घटक शहरे नसून छोटी छोटी गाव असली पाहिजेत कारण तिथेच खऱ्या भारताचे स्वरूप आपल्याला दिसून येते.

भारताने संसदीय प्रणाली सोबतच संघराज्य व्यवस्था स्वीकारलेली आहे. संघराज्य व्यवस्थेत सरकारचे अधिकार आणि कार्ये विभागली जातात.भारतात केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारे आहेत.१९९३ मध्ये भारतीय राज्यघटनेच्या ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीच्या कायद्यानुसार, अधिकार आणि कार्यांचे विभाजन स्थानिक स्वराज्य संस्थांकडे म्हणजेच ग्रामपातळीवर ग्रामपंचायती,

तालुका पातळीवर पंचायत समिती, जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद आणि शहरासाठी नगरपालिका आणि महानगरपालिका यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत.भारतातील अशा छोट्याशा एककाचा कारभार ज्या संस्थांद्वारे केला जातो, ज्यांना पंचायतीराज संस्था म्हणतात. पंचायतीराज संस्थेचे अस्तित्व राज्यघटनेच्या भाग IX अंतर्गत पंचायत या शीर्षकाखाली आहे. एकंदरीतच आजच्या भारतीय संघराज्य व्यवस्थेत आता दोन नव्हे तर तीन स्तरांची सरकारे आहेत.पंचायतीराज संस्थांद्वारे विकेंद्रित शासन पद्धती आणि स्थानिक

munotes.in

लोकांचा सहभाग वाढवून सामाजिक न्यायासह सर्वसमावेशक विकास आणि सेवांचे कार्यक्षम वितरण सुनिश्चित करण्यासाठी पंचायतराज व्यवस्था कार्यरत आहे.

## १.३ विषय विवेचन

स्वातंत्र्यानंतर आपण लोकशाही शासन पद्धती स्वीकारली आहे. लोकशाही ही भारतीयांची जीवन पद्धती व्हावी या दृष्टिकोनातून भारतातील तत्कालीन सरकारांनी वेगवेगळे प्रयत्न केलेले आहेत. भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वांचा विचार करता कलम ४० मध्ये ग्रामपंचायतीची स्थापना करावी असे नमूद केलेले आहे. त्यादृष्टीने ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात आली आहे.

सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी स्थानिक पातळीवरील शासनांना बळकटी देणे गरजेचे आहे. या दृष्टिकोनातून विचार करता बलवंतराय मेहता समिती स्थापन करण्यात आली. बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने ज्या शिफारशी ह्या समितीने सुचविल्या त्या शिफारसी केंद्र सरकारने स्वीकारून भारतातील राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे, त्या व्यवस्थेला आपण पंचायतराज व्यवस्था म्हणून ओळखतो. पंचायतराज व्यवस्थेचा मूळ उद्देश सत्तेच्या विकेंद्रीकरणा बरोबरच स्थानिक भागातील प्रश्न सोडवण्यासाठी स्थानिक शासन निर्माण करून ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी विकास प्रक्रियेत लोकसहभागास वाव देणे हा आहे.

### १.३ १ स्थानिक स्वराज्य संस्था

स्थानिक स्वराज्य संस्थांचा उल्लेख हा पुरातन काळापासून होत असल्याचे दिसून येते.भारतात प्राचीन काळापासून सर्वत्र लहान लहान खेडी वसलेली होती.ह्या लहान लहान खेड्याच्या कारभाराच्या दृष्टीकोनातून जर विचार केला तर आर्थिकदृष्ट्या ही खेडी संपूर्ण स्वयंपूर्ण स्वावलंबी होती. परंतु मोगल व इंग्रजांच्या राजवटीच्या काळात खेड्यांच्ये स्वरूप हे बदलत गेले. स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर भारताच्या विकासाची व भारतातील प्रत्येक समूहाच्या विकासाची जबाबदारी ही भारत सरकारवर पडली. एकंदरीतच भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे भारतातील सर्वाधिक लोकसंख्या ही खेड्यात राहते म्हणून भारताचा जर विकास करावयाचा असेल तर खेड्याचा विकास हा प्रथम झाला पाहिजे या दृष्टिकोनातून भारतीय खेड्याच्या विकासाची योजना ही सामूहिक विकास योजना या नावाने १९५२ मध्ये प्रथमतः सुरू करण्यात आली. कालांतराने ह्या योजनेमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने बदल करून ती योजना आज पंचायतराज व्यवस्थेमध्ये रूपांतरित करण्यात आलेली आहे.

आज जागतिक पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थांना अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. कारण सुरुवातीच्या काळात राज्याचे जे काही स्वरूप होते ते पोलिसी राज्य असे होते. पोलिसी राज्यापासून आता प्रत्येक राज्याने लोककल्याणकारी राज्याची भूमिका स्वीकारल्यामुळे प्रत्येक राज्याचे स्वरूप आज बदलत गेलेले आहे. आज लोककल्याणकारी राज्याच्या दृष्टिकोनातून विचार करता नागरिकांना जास्तीत जास्त सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था ह्या तत्पर आणि प्रगतिशील धोरणातून सकारात्मक पद्धतीने कार्यकर्त्यांना आपल्याला दिसून येत आहेत.

वास्तविक पाहता आज विकासाचे देशपातळीवरील व राज्य पातळीवरील प्रश्न वेगळे आहेत. त्यामुळे राजकीय नेतृत्वास देश पातळीवरील आणि राज्य पातळीवरील प्रश्नांबरोबरच स्थानिक सामाजिक समस्यांची उकल व्हावी, सामाजिक समस्यांची जाणीव व्हावी याचाही विचार करण्यात आलेला आहे. भारतातील विकासाच्या दृष्टिकोनातून विचार करता स्थानिक समस्या ह्या उग्र स्वरूप धारण करताना आपल्याला दिसून येतात. एकंदरीतच जोपर्यंत स्थानिक समस्या ह्या सुटल्या जाणार नाहीत तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेता शासनाने अनेक पावले उचललेली आहेत. स्थानिक समस्या सोडवण्याच्या दृष्टिकोनातून वाटचाल करताना स्थानिक स्वराज्य संस्थांचा संबंध हा प्रामुख्याने स्थानिक समस्यांशी स्थानिक प्रश्नांची निगडित असतो. त्यामुळे आज भारतात संवैधानिकदृष्ट्या केंद्र व राज्य अशी विभागणी झाली असली तरी सुद्धा केंद्र व राज्य यांच्या जबाबदारीची जाणीव लक्षात घेता आज राज्य पातळीवरील अनेक महत्त्वाचे विषय हे स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपवलेले आहेत.

त्यामुळे आज स्थानिक स्वराज्य संस्थांचा विचार करता भारताच्या विकासाच्या कणा या स्थानिक स्वराज्य संस्था ठरत आहेत.

### स्थानिक स्वराज्य संस्था अर्थ व व्याख्या

स्थानिक स्वराज्य संस्थेस वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. अमेरिकेत " म्युनिसिपल शासन " ( Municipal administration ) फ्रान्स मध्ये " स्थानिक प्रशासन " ( Local Administration ) भारतात स्थानिक शासन व स्वशासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्था असे म्हणतात. स्थानिक शासन व स्थानिक प्रशासन यात भेद करतांना डॉ.बी.एम.सिन्हा म्हणतात, स्थानिक शासनामध्ये जिल्हा प्रशासनाचा समावेश होतो तर स्थानिक स्वशासनात नगरपरिषद,महानगर पालिका यांचा समावेश होतो .

स्थानिक पातळीवर काम करणारी जी शासन यंत्रणा आहे त्या शासन यंत्रणेला स्थानिक स्वराज्य संस्था या नावाने ओळखले जाते. लोकशाही देशात या संस्थांकडून महत्त्वाची कार्य पार पाडली जातात. या संस्था स्थानिक जनतेत मोठ्या प्रमाणात राजकीय जनजागृती करून नविन नेतृत्व निर्माण करण्यास कटिबद्ध राहताना दिसून येतात. एकंदरीतच स्थानिक स्वराज्य संस्थांचे ग्रामीण जीवनावर फार मोठे परिणाम होतात. ग्रामीण जनतेचे जीवन सुखी आणि समृद्ध बनविण्यासाठी आधुनिक भारतातील हा स्थानिक स्वराज्य संस्थाचा जो काही प्रयोग आहे या प्रयोगालाच पंचायतराज हे नाव देण्यात आलेले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाचा सर्वात महत्त्वाचा उद्देश म्हणजे केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार स्थानिक ठिकाणचे प्रशासन सुव्यवस्थित चालविणे हा आहे.

(१) **गिलख्रिस्ट यांच्या मते,** "स्थानिक स्वराज्य संस्था या वास्तविकरीत्या सहकारी संस्था असतात.तथापि ,त्यांना एका विशिष्ट मर्यादेत कार्य करण्याचे स्वातंत्र्य किंवा स्वातंत्र्य प्राप्त झालेले असते. "

(२) **एल.गोल्डिंग यांच्या मते**, "एखाद्या विशिष्ट प्रादेशिक विभागातील लोकांनी आपल्याशी संबंधित असलेल्या विषयासंदर्भात स्वतःच व्यवस्थापन करून निर्णय क्रियान्वीत करणारी यंत्रणा म्हणजे स्थानिक शासन होय. "

(३) **डॉ . आशीर्वादम यांच्या मते**, " स्थानिक शासन ही केंद्र सरकार व राज्य सरकारच्या कायद्याद्वारे निर्माण केलेली एक प्रकारची अशी संस्था होय की, ज्याद्वारे शहर किंवा खेड्यासारख्या क्षेत्रामध्ये जनतेद्वारे निवडलेले प्रतिनिधी त्यात असून ते आपल्या अधिकार क्षेत्राच्या मर्यादेत राहून प्रदत अधिकाराचा उपयोग जनकल्याणासाठी करीत असतात "

(४) **सर आयवर जेनिंग यांच्या मते,"** स्थानिक स्वराज्य शासन हे केवळ स्थानिक पातळीवरील शासन नाही तर स्थानिक शासन आपल्यापेक्षा वरिष्ठ शासनास जबाबदार असलेले शासन म्हणजेच स्थानिक शासन होय."

(५) **इनसायक्लोपीडीया ऑफ ब्रिटानीका मध्ये,** "स्थानिक शासन म्हणजे अशा प्रकारचे शासन की ज्यात संपूर्ण राज्यऐवजी अंतर्गतदृष्ट्या एखाद्या लहान क्षेत्रात निर्णय घेवून त्याची अंमलबजावणी करणारी संस्था म्हणजे स्थानिक शासन संस्था होय " .

स्थानिक भागाचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी स्थानिक लोकांनी निवडून दिलेली स्थानिक लोकप्रतिनिधीची जी यंत्रणा कार्यरत असते त्यास स्थानिक शासन असे म्हणतात. केंद्र व राज्य शासनाच्या विविध कायद्याद्वारे या संस्थाना योग्यरीतीने काम करता यावे म्हणून पुरेशी स्वायतता दिली असली तरीही या संस्थांवर अंतिम नियंत्रण मात्र राज्य शासनाचे असते.या संस्था स्थानिक भागात लोककल्याणकारी स्वरूपाची कामे प्रामुख्याने करताना दिसून येतात.

**स्थानिक स्वराज्य संस्थांची वैशिष्ट्ये**

१. स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती ही संवैधानिकदृष्ट्या झालेली असते.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती ही संवैधानिकदृष्ट्या झाली असली तरी त्यांना त्यांच्या कार्यात पूर्णतः स्वायत्तता व स्वातंत्र्य देण्यात आलेले असते.

३. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासनात मोठ्या प्रमाणात लोक सहभाग असतो.

४. स्थानिक स्वराज्य संस्थांवर स्थानिक लोकांचा जास्तीत जास्त सहभाग राहण्यासाठी प्रशासनातील पदाधिकाऱ्यांच्या महत्त्वाच्या पदांवरची निवड ही लोकशाही प्रक्रियेद्वारे लोकांकडून प्रत्यक्ष निवडणुकीने होते.

५. स्थानिक स्वराज्य संस्था या स्थानिक प्रश्नाशी निगडित असतात.

६. स्थानिक स्वराज्य संस्थांवर राज्य शासनाचे नियंत्रण असते.

७. स्थानिक स्वराज्य संस्थांतील निर्णय हे लोकशाही निर्णय प्रक्रियेद्वारे घेतले जातात.

८. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या राज्य किंवा केंद्र पातळीवरील शासनास उत्तरदायी असतात.

९. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सेवा ह्या लोकसेवा प्रकारात येतात.

१०. स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाही विकेंद्रीकरणाच्या पाया आहेत.

११. स्थानिक शासनाची विभागणी ही दोन प्रकारे केले जाते त्यामध्ये एक ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरी स्वराज्य संस्था.

१२. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकशाहीचा आधारस्तंभ असतात .

१३. लोकांनी लोकसभागातून तयार केलेले लोक सहभागी नियोजन म्हणजेच स्थानिक स्वराज्य संस्था होय.

१४. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून पारदर्शकता, सामाजिक लेखाजोखा, परस्परांवर विश्वास, परस्पर समन्वयाद्वारे गावाचा विकास केला जातो.

१५. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना लोकप्रतिनिधित्वाची समान संधी दिल्या जाते.

१६. पंचायतीराज हे गावपातळीवरील शासनाचे स्वरूप आहे प्रत्येक गाव स्वतःच्या क्रियाकलापांसाठी जबाबदार आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व**

१. स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य प्रामुख्याने हे लोकशाही तत्वावर असल्यामुळे लोकांच्या गरजा आकांक्षा ह्या त्यांच्या लोकप्रतिनिधीमार्फत पूर्ण केल्या जातात.

२. स्थानिक स्वराज्य संस्था या स्थानिक प्रश्नाशी निगडित असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था ह्या स्थानिक प्रश्नांचे महत्त्व लक्षात घेऊन अग्रक्रमाद्वारे ते सोडवताना आपल्याला दिसून येतात.

३. स्थानिक प्रश्नांच्या संदर्भात निर्णय घेताना त्या प्रश्नाचे महत्त्व, पैशाची उपलब्धता, वेळेची मर्यादा या सर्व गोष्टीचा विचार हा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रामुख्याने केला जातो.

४. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकशाही राबवणाऱ्या प्रमुख घटक असल्यामुळे नेतृत्वाची निर्मिती करण्यावर भर या संस्था प्रामुख्याने देतात.

५. स्थानिक स्वराज्य संस्था या केवळ नवीन नेतृत्व निर्माण करत नाही तर त्या नेतृत्वाला प्रशिक्षित करण्याचे काम या संस्था करताना दिसून येतात.

६. स्थानिक स्वराज्य संस्थांचे नेतृत्व हे राज्याचे आणि देशाचे नेतृत्व करण्यासाठी सक्षम असल्याचे वेळोवेळी सिद्ध झालेले आहे.

७. स्थानिक नेतृत्वाला स्थानिक प्रश्नांची जाण असल्यामुळे त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था या उपयुक्त ठरतात.

९. स्थानिक स्वराज्य संस्थांतील नेतृत्वाचा विचार करता वेगवेगळे राजकीय पक्ष त्या नेतृत्वांना आपल्या राजकीय पक्षात सहभागी करून घेताना दिसून येतात कारण त्या नेतृत्वाचा ग्रामीण भागावरील पगडा आणि प्रभाव हे यामागचे महत्त्वाचे कारण आहे.

१०. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रत्येक नागरिकांना आपले नेतृत्व सिद्ध करण्याची क्षमता उपलब्ध होताना दिसून येते.

११. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्ती मुळे प्रत्येकांना समान संधी उपलब्ध झालेली आहे.

१२. स्थानिक स्वराज्य संस्था या केंद्रशासन आणि राज्य शासन यांच्या कामाचा भार कमी करून केंद्र शासन व राज्य शासनामधील दुवा म्हणून काम करतात.

१३. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकसहभाग वाढवण्यास प्रयत्नशील असतात.

१४. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध असतात.

**स्थानिक स्वराज्य संस्था उदय आणि विकास**

भारतात प्राचीन काळापासून खेडी अस्तित्वात आहेत. भारतातील प्राचीन खेड्याच्या संदर्भात बोलताना प्राचीन खेडी ही आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होती. तसेच या खेड्यातील काम करणाऱ्या यंत्रणाही स्वयंपूर्ण होत्या.त्यामुळे खेड्यांच्या विकासाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आजच्या आधुनिक व्यवस्थेमध्ये देण्यात आलेले आहे. प्राचीन काळात गावातील सर्व लोक एकत्र येऊन वेगवेगळे कार्य करत असत त्यामुळे ती गाव स्वयंपूर्ण असल्याचे आपल्याला दिसून येते. गावातील लोक एकत्र येऊन काम करणाऱ्या प्रक्रियेला गावसभा या नावाने ओळखला जाते. गावाचा कारभार करणारी गावाची जी काही प्रमुख व्यक्ती होती त्या व्यक्तीस आपल्याकडे आजही काही खेड्यात पाटील या नावाने ओळखले जाते.

सिंधू संस्कृतीत हडप्पा या ठिकाणी नदीच्या किनाऱ्यावर गढीचे भग्न अवशेष सापडलेले आहेत. त्या गढीत उंच खुर्ची असणारे एक भवन सापडलेले आहे. मोहेंजोदडो या ठिकाणी सुद्धा गडीवर विशाल राजकीय भवन होते, या भवनात काही खोल्या व दोन विशाल भवन होते या सभागृहात लाकडी बेंच बसण्यासाठी होते यावरून अनुमान काढता येतो की सिंधू संस्कृतीतील लोक या ठिकाणी एकत्र येऊन प्रशासन करत असावेत.

सिंधू संस्कृती नंतर जी संस्कृती उदयास आली तिला वैदिक संस्कृती असे म्हणतात. या संस्कृतीची माहिती वेदावरून मिळते. ऋग्वेदाच्या काळात राजकीय संघटनाचा प्रमुख आधार हा परिवारात होता. परिवार पितृसत्तात्मक होते. अनेक परिवारांचा समूह मिळून ग्राम बनत असे ग्रामाच्या प्रमुखास ग्रामणी म्हणत. अनेक ग्रामाच्या समुदायास विश म्हणत. विशाच्या प्रमुखास विशपती म्हणत.अनेक विशाचःया समूहास जन म्हणत. जनचा प्रधानाला राजा म्हणत. ऋग्वेदात अशी आर्याची अनेक राज्य होती. त्याकाळी गावाचे शासन ग्रामणी पहात असे. तसेच ऋग्वेदात सभा नावाच्या राजकीय संस्थाचा उल्लेखही आढळतो. सभा ही ग्रामसंस्था होती. सभेमध्ये वयस्कर पुरुष व स्त्रिया ही भाग घेत. सभाच्या प्रमुखास सभासद म्हणत. समिती ही त्याकाळी केंद्रीय राजकीय संस्था होती.म्हणजेच वैदिक काळापासून या गावसभेची सुरुवात झालेली आहे. ऋग्वेदातही गावसभेचा उल्लेख आढळून येतो.

मौर्यकालीन शासन हे लोक कल्याणकारी होते. हे सम्राट अशोकाच्या विधानावरून दिसून येते. "मी कोठेही असो जनतेच्या अडी - अडचणी माझ्यापर्यंत येऊन पोहचल्या पाहिजे. त्यांच्या अडचणी सोडविणे व त्यांच्या कल्याणासाठी कार्य करणे हे माझे कर्तव्य आहे." त्या कालीन राजाला प्रशासकीय कार्यात मदत करण्यासाठी मंत्रीपरिषद अस्तीत्वात होती. प्रातांच्या कारभारासाठी प्रातांची विभागणी केली होती. गावाच्या प्रमुखाला ग्रामिक म्हणत. दहा गावाच्या प्रमुखाला गोप म्हणत .

सातवाहनाच्या काळात ग्राम हा साम्रज्याचा शेवटा घटक होता. गुप्तसाम्राज्य शासन व्यवस्थेत चंद्रगुप्त, सम्राट समुद्रगुप्त, चंद्रगुप्तदुसरा विक्रमादित्य इत्यादी राजे होऊन गेले. त्यांनी लोककल्याणकारी राज्य निर्माण केले. केंद्रिय प्रशासन, प्रांतीय प्रशासन, जिल्हा प्रशासन अशी शासनाची विभागणी केली होती.शासन व्यवस्थेचा सर्वात लहान भाग म्हणजे ग्राम प्रशासन होय. ग्रामप्रमुखास ग्रामअध्यक्ष म्हणत. गुप्त वंशानंतर भारतातील सार्वभौम सत्ता स्थापन करणारा शेवटचा शक्तीशाली महान राजा सम्राट हर्षवर्धन होय . " डॉ. आर. सी. मुजुमदार च्या मते, “प्रांतीय प्रशासन, जिल्हा प्रशासन, ग्रामप्रशासन, अशी विभागणी होती. ग्राम हा प्रशासनातील शेवटच घटक होय.” चोल प्रशासनात राज्याची विभागणी अनेक मणुल मध्ये केली होती.मणुल म्हणून म्हणजे प्रांत. साम्राज्याची विभागणी नाडू म्हणजे जिल्हा, कुरूम म्हणजे तालुका व ग्राम अशी विभागणी होती. चोल प्रशासनाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे स्वयंशासन व्यवस्था.

मध्ययुगात विजय नगरच्या प्रशासनामध्ये प्रांतांची विभागणी पुढील प्रमाणे करण्यात आली होती. प्रांताला मंडलम म्हणत, प्रत्येक उपविभागाला नाडू म्हणत, गाव सर्वात छोटा प्रशासकीय घटक होता. सुलतानशाही मध्ये प्रशासनाच्या सोयीसाठी राज्यांची विविध प्रशासकीय विभागात विभागणी केली होती. त्यांना इक्ता म्हणत. इक्ताचे विभाजन शिक मध्ये करत, शिकाचे विभाजन परगाणा या उपविभागात करत, अनेक खेड्याचा परगणा बनत असे. मुघल प्रशासनात केंद्रीय प्रशासन, प्रांतिक प्रशासन आणि प्रांतांचे अनेक विभाग पाडले जात होते त्यास सुभा म्हणत. खेडे हा प्रशासनाचा लहान व मुख्य घटक होता. शिवाजी महाराजांच्या राज्यव्यवस्थेमध्ये खेडे हा प्रशासनाचा लहान घटक होता.

एकंदरीतच प्राचीन काळापासून भारतामध्ये पंचायत व्यवस्था अस्तित्वात होती याची आपणास माहिती मिळते. गाव किंवा खेडे हे स्वयंपूर्ण घटक होते. गावातील गरजा गावातच भागवल्या जात

होत्या. ग्राम हा प्रशासनाचा सर्वात लहान घटक होता. तसेच मध्ययुगीन राज्य व्यवस्थेमध्ये ग्राम या घटकाला अतिशय महत्त्वाचे स्थान देण्यात आलेले आहे. ग्रामचा विकास म्हणजे संपूर्ण राज्यसंस्थेचा विकास हे मध्ययुगीन काळामध्ये लक्षात घेतलेले आहे. म्हणजेच प्राचीन काळात व मध्य काळात सुद्धा सत्ता विभाजनाचा सिद्धांत अस्तित्वात असल्याचे आपणास दिसून येते.

भारतात विशेषत: ब्रिटीशांच्या आगमनानंतर जातीव्यवस्था आणि सरंजामशाहीच्या प्रलोभनाने गावातील काम करणारा कोतवाल ही संकल्पनाही मोडकळीस आली.ब्रिटीश काळात ब्रिटिश सरकार सरकार कोणत्याही विकेंद्रीकरणाच्या बाजूने नव्हते.१८५७ च्या उठावानंतर, त्यांनी भारत सरकार कायदा १८५८ आणला आणि विकेंद्रीकरण काढून टाकले. लॉर्ड मेयोने १८७० मध्ये विकेंद्रीकरणाची संकल्पना पुढे आणण्याचा प्रयत्न केला केला, त्यानंतर लॉर्ड रिपॉनने विकेंद्रीकरणाचा पुरस्कार केला परंतु शहरी भागाच्या मर्यादेपर्यंत ते मंजूर करण्यात आले. १९०६ मध्ये हॉब हाऊसच्या अध्यक्षते खाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याची पाहणी करण्यासाठी रॉयल विकेंद्रीकरण आयोगाची नेमणूक करण्यात आली. या आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याची सखोल पाहणी केल्यानंतर १९०९ मध्ये आपला अहवाल सादर केला. रॉयल कमिशनच्या विकेंद्रीकरण अहवालावर

१९१५ पर्यंत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नव्हता. १९१५ मध्ये भारत सरकारने या आयोगाच्या काही शिफारशी मान्य केल्या. १९१७ मध्ये मटेंग्यू चेम्सफोर्डने भारतात जबाबदार सरकारची स्थापना व्हावी असा इंग्रज सरकारचा उद्देश आहे असे घोषित केले. त्या निमित्ताने १९१८ मध्ये काही घटनात्मक सुधारणा करण्यात आल्या. १९१८ मध्ये भारत सरकारने आपला ठराव प्रसिद्ध करून विकेंद्रीकरण आयोगाच्या सर्वच्या सर्व शिफारशी मान्य केल्या. १९१८ च्या नंतर स्थानिक स्वराज्य संस्था करिता १९१९ चा कायदा पास झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य प्रांत सरकारकडे सुपूर्द करण्यात आले.१९३५ च्या कायद्यानंतर जबाबदार मंत्रिमंडळाने खऱ्या अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाकडे लक्ष दिले. दरम्यान याच काळात भारतीय स्वातंत्र्यलढा हा मोठ्या प्रमाणात तीव्र करण्यात आला त्यातून १९४७ ला भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर स्वतंत्र भारतापुढे जी काही आव्हाने होती त्या आव्हानांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास करणे हे एक महत्त्वाचे आव्हान सरकार पुढे होते. दरम्यान, भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीच्या वेळी, संविधान सभेत, पंचायतीराज हे मुख्यत: नवीन सरकारची राजकीय अस्थिरता आणि निधीच्या कमतरतेमुळे राज्यघटनेच्या भाग ४ अंतर्गत राज्य धोरणाच्या निर्देशक तत्त्वांच्या शीर्षकाखाली ठेवण्यात आले होते.

भारतातील पंचायतराज व्यवस्थेची सुरुवात खऱ्या अर्थाने ब्रिटिश सरकारच्या काळात झाली असे मानले जाते कारण १६८७ मध्ये मद्रास महानगरपालिकेची स्थापना केल्या गेली. १८८२ मध्ये लॉर्ड रिपन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात आपला ठराव प्रसिद्ध करून या ठरावाद्वारे ब्रिटिश राजवटीत भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेला एक न्याय होता. म्हणून लॉर्ड रिपनला स्थानिक स्वराज्य संस्थेचा जनक असे म्हणतात.

## आधुनिक भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्वरूप व पंचायतराज व्यवस्थेची सद्यस्थिती

भारत हा खेड्यांचा देश आहे. खेड्यांचा विकास आणि उन्नती जर झालीच तरच खऱ्या अर्थाने भारताचा विकास होईल म्हणून गांधीजी म्हणतात जर खेडी नष्ट झाली तर भारत नष्ट होईल म्हणून गांधीजींनी खेड्याकडे चला असा नारा दिला.

भारताच्या घटना समितीने खेड्याचा विकास या संकल्पनेकडे लक्ष देऊन भारताचे" स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी व स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या तत्त्वाचे पालन करून ग्रामीण भागातील शासन व्यवस्थेवर लक्ष केंद्रीत केले आहे. भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ राज्याच्या धोरणासंबंची मार्गदर्शक तत्वे कलम ३८ मध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय प्रस्थापित केला जाईल व त्या समाज व्यवस्थेचे संरक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न राज्याकडून केला जाईल. एकंदरीतच भारतात आर्थिक, सामाजिक, राजकीय न्याय प्रस्थापित करून कल्याणकारी राज्य निर्माण करण्याचा घटनाकारांनी ध्यास घेतला होता. त्यातूनच कलम ४० नुसार ग्रामपंचायती स्थापन करण्याच्या कामी सरकार पुढाकार घेईल व स्वयंशाषित संस्था म्हणून स्वतःचा कारभार पाहता यावा यासाठी पुढाकार घेईल हे अधोरेखित करून सरकारने ग्रामपंचायती स्थापन करून भारताचा संपूर्ण कारभार प्रत्यक्ष जनतेच्या हाती दिला आहे. पंचायतराज स्थापन करण्याचे श्रेय पंडित जवाहरलाल नेहरूंना जाते ते म्हणतात, "गावाच्या विकासाकरीता गावातील

लोकांना अधिकार देणे आवश्यक आहेत. त्यांना त्या दृष्टीने काम करू द्या. त्यांच्याकडून हजार चुका जरी झाल्या तरी घाबरण्याची आवश्यकता नाही म्हणून पंचायतीना अधिकार द्या." त्या दृष्टीने १९५२ मध्ये भारताच्या विकासाकरीता "सामुदायिक विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . या कार्यक्रमाचे मुळ उद्दिष्ट " आर्थिक नियोजन व सामाजिक उद्धार " या दृष्टीने राष्ट्रीय विकास कार्यात ग्रामीण जनतेचा सक्रीय सहभाग असावा हा होता. या दृष्टीने हा कार्यक्रम राबविण्यात आला. हा कार्यक्रम सरकारी कर्मचारी व नेते यांच्या हस्तक्षेपामुळे जेवढा यशस्वी व्हायला हवा तेवढा यशस्वी होऊ शकला नाही. तरी सुद्धा भारतात विकास कार्यासाठी २ ऑक्टोंबर १९५९मध्ये सर्वप्रथम " राज्यस्थान " या राज्याने पंचायतराज योजना राबविली. त्या योजनेचे उदघाटन तत्कालीन पंतप्रधान पं . नेहरूनी नागौर येथे केले. पंचायतराज विकासाकरीता त्यादृष्टीने खऱ्या अर्थाने पावले उचलायला सुरुवात होऊ लागली. १९५७ मध्ये बलवंतराव मेहता समिती स्थापन करण्यात आली. महाराष्ट्र शासनाने मेहता समितीचा अभ्यास करण्यासाठी श्री वसंतराव नाईक समिती नेमली. नाईक समितीच्या अहवालाच्या आधारे महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली.

भारतीय स्वातंत्र्यानंतर, भारतातील पंचायतराजला योग्य संरचना देण्याचा प्रयत्न करणाऱ्या ज्या विविध समित्या होत्या त्या पुढील प्रमाणे आहेत:

**बलवंतराय मेहता समिती**, १९५७:

स्थापना – १६ जानेवारी १९५७

सदस्य – १) बी. जी. राव

२) डी. पी. सिंग

३) ठाकूर फुलसिंग

१) लोकशाही विकेंद्रीकरण व सामुदायिक विकास कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचायतराज संस्थांची लवकरात लवकर सुरुवात करणे ही महत्त्वाची शिफारस या समितीने केलेली आहे.

२) संपूर्ण देशासाठी त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना करण्यात यावी.म्हणजेच गाव पातळीवर ग्रामपंचायत, तालुका पातळीवर पंचायत समिती व जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद असावी.

३) जिल्हा परिषदानी समन्वयाचे कार्य करावे.

४) जिल्हाधिकारी हा जिल्हा परिषदेचा पदसिद्ध अध्यक्ष असावा.

५) सामूहिक कार्यक्रम कार्यान्वित करण्यासाठी ग्रामपंचायतींना ज्यादा अधिकार द्यावेत.

६) प्रत्यक्ष, प्रौढ मतदानाद्वारे गाव पातळीवरील ग्रामपंचायती स्थापना करावी.

७) न्यायपंचायतीची स्थापना करण्यात यावी.

८) जिल्हा परिषदेत सदस्य म्हणून आमदार व खासदारांना सदस्यत्व द्यावेत.

९) पंचायतराज मध्ये सहकार चळवळीचा समावेश करण्यात यावा.

१०) राज्य शासनाने केवळ नियंत्रण, मार्गदर्शन व योजनेचे कार्य करावे.

११) ज्या गावाची लोकसंख्या ५०० असेल तेथे ग्रामपंचायत स्थापन करण्यात याव्यात.

१२) ग्रामपंचायतीमध्ये महिलांना किमान दोन जागा राखीव असाव्यात. तसेच अनुसूचीत जाती-जमतीच्या लोकांना प्रत्येकी एक जागा राखीव असावी.

१३) ग्रामसेवक हा पंचायतीचा सचिव असावा.

१४) ग्रामपंचायतीच्या कार्यात पाणी पुरवठा, स्वच्छता, रस्ते, प्रकाश, व्यवस्था आणि मागास जातीचे कल्याण यांचा समावेश करण्यात यावा.

१५) ग्रामपंचायतीला आपल्या समस्या सोडविण्यासाठी संपत्ती कर, बाजार कर व अनुदान इत्यादी उत्पन्नाची साधने असावीत.

१६) जिल्हास्तरावर जिल्हा परिषदेत पंचायत समितीचे सभापती व जिल्ह्यातील खासदार आमदारांचा समावेश असावा.

**अशोक मेहता समिती,** १९७७:

स्थापना – १२ डिसेंबर १९७७

१) संपूर्ण भारतासाठी द्विस्तरीय पंचायतराजची स्थापना करण्यात यावी.

२) जिल्हा परिषदांना ज्यादा अधिकार व ग्रामपंचायतच्या जागेवर मंडळ पंचायती असाव्यात.

३) पंचायतराजला घटनात्मक दर्जा देण्यात यावा.

४) जिल्हा स्तरावरील विकासाची कामे जिल्हा परिषदेकडे सोपवावीत.

५) जिल्हा परिषद जिल्ह्याच्या आर्थिक नियोजनाचा कारभार पाहतील.

६) जिल्हाधिकारी सहित जिल्हा परिषदचे सर्व अधिकारी जिल्हा परिषदेकडे सुपूर्द करण्यात यावेत.

७) राजकीय पक्षांना आपल्या निवडणूक चिन्हावर निवडणूक लढवण्यासाठी संमती द्यावी.

८) प्रौढ शिक्षण कार्यक्रम जिल्हा परिषदेकडे देण्यात यावेत.

९) न्याय पंचायतींना ग्रामपंचायतीपासून विभक्त करण्यात यावेत.

१०) जिल्ह्यातील योजना तयार करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती असावी.

११) १५ ते २० हजार लोकसंख्येसाठी मंडळ पंचायतीची स्थापना करण्यात यावी.

१२) निर्वाचित सदस्यांच्या कार्यकाळ ४ वर्षाचा असावा.

१३) कृषी व ग्रामोद्योगाना प्रोत्साहन देण्यात यावेत.

१४) जिल्हा परिषदेवर पुढील सहा प्रकारचे सदस्य असावेत.

munotes.in

१) प्रत्यक्ष निर्वाचित सदस्य

२) दोन महिला सदस्य

३) दोन स्वीकृत सदस्य

४) मोठया नगरपालिकेचे अध्यक्ष

५) अनुसूचित जाती – जमातीचे सदस्य

६) ग्रामपंचायती मधील काही निर्वाचित सदस्य

या समितीने सुचवले की पंचायतीराज संस्था ही दोन स्तरीय संस्था असेल जी जिल्हा स्तरावर आणि मंडल स्तरावर कार्यरत असावी अशी महत्त्वपूर्ण शिफारस केली होती.

**जी. व्ही. के राव समिती**, १९८५:

स्थापना – २५ मार्च १९८५

१) लोकप्रतिनिधींच्या सहभागातून आर्थिक व सामाजिक विकास साधला जावा.

२) पंचायतराज संस्थेच्या निवडणुका वेळेवर घेण्यात याव्यात.

३) जिल्हाधिकार्यापेक्षा वरिष्ठ असलेल्या IAS अधिकाऱ्याची जिल्हा विकास आयुक्त म्हणून नेमणूक करावी.

४) गट विकास अधिकाऱ्यास सहाय्यक आयुक्तांचा दर्जा देण्यात यावा.

५) जिल्हा परिषदेचा एक सदस्य ३० हजार ते ४० हजार लोकसंख्ये मागे निवडला जावा.

६) जिल्हा परषदेमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय यांना राखीव जागा देण्यात याव्यात. तसेच महिलांना योग्य प्रतिनिधी देण्यात यावे.

७) जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पद्धतीद्वारे केली जावी व त्यांना राष्ट्रीय ग्रामीण संस्था हेंद्राबाद येथे प्रशिक्षण द्यावे.

८) जिल्हापरिषदेचा कार्यकाल ३ ते ५ वर्षाचा असावा.

९) गट विकास अधिकाऱ्याला साहाय्य आयुक्तचा दर्जा दिला जावा.

१०) राज्य शासनाची कामे पंचायतरात संस्थांकडे हस्तांतरित करण्यात यावी.

११) पंचायतराज संस्था चतु:स्तरीय स्थापन करून राज्य स्तरावर राज्य विकास परिषदेचे स्थापना करून त्या परिषदेचे अध्यक्षपद मुख्यमंत्री यांच्याकडे देण्यात यावेत.

**एल. एम. सिंघवी समिती**, १९८६:

१) पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात यावा.

२) पंचायतराज संस्थांना जास्त वित्तीय साधने प्राप्त करून द्यावीत.

३) ग्रामपंचायती व्यवहार्थ होण्यासाठी खेड्यांची पुनरचना करण्यात यावी.

४) खेड्यासाठी नवीन पंचायतीची स्थापना करावी.

५) गाव स्तरावरील ग्रामसभेचे गठन करून त्यांना जास्तीत जास्तीचे अधिकार द्यावे.

६) ग्रामपंचायती स्वयंपूर्ण व्हाव्यात यासाठी वित्तीय साधनांची तरतूद करण्यात यावी.

७) पंचायतराज संस्थांच्या निवडणुका नियमितपणे घेतल्या जाव्यात व ह्या निवडणुका घेण्यासाठी स्वातंत्र्य घटनात्मक यंत्रणा स्थापना करण्यात यावी.

८) प्रत्येक राज न्यायाधिकरणाची स्थापना केली जावी.

९) केंद्रस्तरावर राष्ट्रीय स्थानिक स्वराज संस्था आणि प्रत्येक राज्य स्तरावर राज्य स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना करून या संस्थेद्वारे प्रशिक्षण दिले जावे.

या समितीने असा सल्ला दिला की भारताच्या कोणत्याही भागासाठी प्रशासकीय मंडळ स्थापन करायचे असेल तर त्याला घटनात्मक संरचना दिली पाहिजे परिणामी, घटनेत ७३वी दुरुस्ती करण्यात आली आणि भाग IX A पंचायत म्हणून समाविष्ट करण्यात आला.

**पंचायतराज संबधी महाराष्ट्र शासनाच्या समित्या**

**१) वसंतराव नाईक समिती**

स्थापना – २२ जून १९६०

१) ग्रामपंचायतीची लोकसंख्या १००० पेक्षा कमी असू नये

२) महाराष्ट्रासाठी त्रिस्तरीय पंचायतराजची स्थापना करण्यात यावी.

३) त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये जिल्हा परिषदेला अधिक महत्व दिले.

४) जिल्हा परिषदेचा प्रशासकीय प्रमुख हा (IAS) दर्जाचा अधिकारी असावा.

५) पंचायत समिती सभापती हा जिल्हा परिषदेचा सदस्य असावा.

६) खासदार आमदारांचा समावेश जिल्हा परिषदेत नसावा.

७) संपूर्ण महाराष्ट्रातील महाराष्ट्रासाठी एकच जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम असावा.

८) प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक ग्रामसेवक असावा.

९) जिल्हाधिकाऱ्यांचा जिल्हा परिषदेच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप नसावा.

१०) पंचायत समितीला जिल्हा परिषदेच्या कार्यकारी उप समितीचा दर्जा असावा.

११) गटविकास अधिकारी हा पंचायत समितीचा प्रशासकीय प्रमुख असावा.

१ मे १९६२ रोजी महाराष्ट्रात त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात येऊन अंमलबजावणीस सुरवात झाली.

**२) ल. ना. बोगींरवार समिती**

स्थापना – २ एप्रिल १९७०

१) ग्रामपंचायतीचा कार्यकाळ ५ वर्षाचा करण्यात यावा.

२) न्यायपंचायती रद्द करण्यात याव्यात.

३) ग्रामसंभेच्या वर्षातून किमान २ बेठका घेण्यात याव्या.

४) सहकार हा विषय जिल्हा परिषदेकडे न ठेवता राज्य शासनाकडे सोपवावा.

५) सरपंच समितीची स्थापना करण्यात यावी.

६) किमान ५०० लोक संख्येमागे एक ग्रामपंचायत स्थापना करण्यात यावी.

७) ग्रामसेवक हा पदवीधर असावा.

८) कृषी उत्पन्न वाढविण्यासाठी राज्य शासनाने कृषी उद्योग निगमची स्थापना करावी.

९) सरपंचाला मानधन देण्यात यावे.

१०) लोकप्रतिनिधींच्या सहभागासाठी नियोजन व मूल्यमापन समितीची स्थापना करण्यात यावी.

११) जिल्ह्याधिकाऱ्याऐवजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास जिल्हा नियोजन समितीचा प्रमुख समजण्यात यावा.

**३) बाबुराव काळे समिती :**

स्थापना – १९ ऑक्टोबर १९८०

१) ग्रामपंचायतीला दरडोई मिळणारे अनुदान १ रु. ऐवजी २ रु करण्यात यावे

२) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम जिल्हा परिषदेकडे देण्यात यावा.

३) एका ग्रामसेवेकाकडे दोन पेक्षा अधिक ग्रामपंचायतीचा कारभार असू नये.

४) राष्ट्रीय मलेरिया निर्मूलन, राष्ट्रीय कुष्ठरोग निवारण व क्षयरोग नियंत्रण हे कार्यक्रम अभिसरण तत्वावर जिल्हा परिषदेकडे देण्यात यावे.

**४) प्रा. पी. बी पाटील समिती :**

स्थापना – १८ जून १९८४

१) ग्रामपंचायत सरपंचाची निवड ग्रामपंचायत सदस्यांकडून न होता ग्रामसभेतील सदस्यांकडून केली जावी.

२) जिल्हा नियोजनाची जबाबदारी पूर्ण वेळ नियोजन अधिकाऱ्यावर सोपवावी .

३) स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक व्यापक, आर्थिक अधिकार देण्यात यावेत.

४) जिल्हा नियोजन मंडळात सर्वे लोकप्रतिनिधींना स्थान देण्यात यावे.

५) जिल्हा परिषदेचा एकूण सदस्यांच्या १/४ जागा महिलांसाठी आरक्षित ठेवाव्या.

६) अनुसूचित जाती व जमाती यांना लोकसंख्येचा प्रमाणात जिल्हा परिषदेवर आरक्षण द्यावे.

७) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम व महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम यांचे एकत्रीकरण करण्यात यावे.

८) लोकप्रतिनिधींना ( आमदार, खासदार ) जिल्हा परिषदेवर सदस्यत्व देण्यात येऊ नये.

munotes.in

९) राज्य स्तरावर राज्य विकास मंडळाची स्थापना करावी.

१०) ग्रामपंचायतीचे लोकसंख्येच्या आधारावर अ,ब,क,ड, असे वर्गीकरण करावे.

११) स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी स्वतंत्र स्वरूपाची नोकर यंत्रणा असावी.

### १.३.२ ७३ वी घटना दुरुस्ती कायदा

पंचायतीराज संस्था प्रदीर्घ काळापासून अस्तित्वात असल्या तरी, नियमित निवडणुका न होणे, तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला यांसारख्या दुर्बल घटकांचे अपुरे प्रतिनिधित्व, अधिकारांचे अपुरे हस्तांतरण आणि आर्थिक संसाधनांचा अभाव यासह अनेक कारणांमुळे या संस्थांना व्यवहार्य आणि प्रतिसाद देणाऱ्या लोकसंस्थेचा दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त होऊ शकलेला नव्हता.राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांपैकी एक असलेल्या घटनेच्या कलम ४० मध्ये असे नमूद केले आहे की राज्य ग्रामपंचायतीं स्थापन करण्यासाठी पावले उचलेल आणि त्यांना स्वत:चे एकक म्हणून कार्य करण्यास सक्षम करण्यासाठी आवश्यक असे अधिकार प्रदान करेल. याचा विचार करून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राहिलेल्या उणिवा लक्षात घेता पंचायतराज संस्थांच्या काही मूलभूत आणि अत्यावश्यक वैशिष्ट्यांची निश्चितता राज्यघटनेत समाविष्ट करणे अत्यावश्यक आहे. त्यानुसार घटनेत पंचायतींशी संबंधित एक नवीन भाग जोडण्याचा प्रस्ताव आहे, सोबतच गाव किंवा गावांच्या गटामध्ये ग्रामसभा; गाव आणि इतर स्तरावर पंचायतींची रचना, गावातील पंचायतींच्या सर्व जागांसाठी आणि मध्यवर्ती स्तरावर अशा स्तरावरील पंचायतींच्या अध्यक्षांच्या कार्यालयांसाठी थेट निवडणुका, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी पंचायत सदस्यत्वासाठी आणि प्रत्येक स्तरावरील पंचायतींच्या अध्यक्षांच्या पदासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागांचे आरक्षण, महिलांसाठी एक तृतीयांश जागांचे

आरक्षण,पंचायतींसाठी ५ वर्षांचा कार्यकाळ निश्चित करणे आणि कोणत्याही पंचायतीचा कार्यकाळ संपल्यास ६ महिन्यांच्या कालावधीत निवडणुका घेणे, पंचायत सदस्यत्वासाठी अपात्रता,आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय आणि विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी योजना तयार करण्याच्या संदर्भात पंचायतींवर अधिकार आणि जबाबदाऱ्यांचे राज्य विधानमंडळाद्वारे हस्तांतरण, राज्याच्या एकत्रित निधीतून पंचायतींना अनुदान देण्यासाठी राज्य विधानमंडळांकडून अधिकृतता मिळवून देणे, तसेच नियुक्त कर, शुल्क, टोल आणि महसूलासाठी पंचायतींना योग्य वित्तपुरवठा करणे,तसेच प्रस्तावित दुरुस्तीनंतर एक वर्षाच्या आत वित्त आयोगाची स्थापना करणे आणि त्यानंतर दर ५ वर्षांनी पंचायतींच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे, पंचायतींच्या खात्यांचे लेखापरीक्षण, पर्यवेक्षणाखालील पंचायतींच्या निवडणुकांच्या संदर्भात तरतूद करण्याचे राज्य विधानमंडळांचे अधिकार, राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याचे निर्देश आणि नियंत्रण, या भागाच्या तरतुदींचा केंद्रशासित प्रदेशांना लागू करणे,उक्त भागाच्या तरतुदी लागू करण्यापासून काही राज्ये आणि क्षेत्रे वगळून, प्रस्तावित दुरुस्ती सुरू झाल्यापासून एक वर्षापर्यंत विद्यमान कायदे आणि पंचायती चालू ठेवणे आणि पंचायतींशी संबंधित निवडणूक प्रकरणांमध्ये न्यायालयांच्या हस्तक्षेपास प्रतिबंध करण्यासाठी १० सप्टेंबर १९९१ संविधान (सत्तर-तृतीय दुरुस्ती) अधिनियम, १९९२ म्हणजेच ७३ वी घटनादुरुस्ती होय.१९९२ मध्ये ७३ वी घटनादुरुस्ती संमत झाली व तिच्या प्रत्यक्ष कार्यवाहीस २४ एप्रिल १९९३

पासून सुरुवात झाली.भारताच्या राज्यघटनेत पंचायतराज व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी जो कायदा लागू केला आहे तो पुढील प्रमाणे सांगता येईल.

१. **लघु शीर्षक आणि प्रारंभ.-**

(१) या कायद्याला संविधान ( त्रेह्यात्तरावी दुरुस्ती) अधिनियम, १९९२ म्हटले जाऊ शकते.

(२) केंद्र सरकार, अधिकृत राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नियुक्त करेल अशा दिनांकास तो लागू होईल.

२. नवीन भाग IX समाविष्ट करणे.- संविधानाच्या भाग VIII नंतर, खालील भाग समाविष्ट केला जाईल, म्हणजे भाग नववा पंचायती

२४३. **व्याख्या**

या भागात, संदर्भ अन्यथा आवश्यक असल्याशिवाय,-

(a) "जिल्हा" म्हणजे राज्यातील जिल्हा

(b) "ग्रामसभा" म्हणजे गावपातळीवर पंचायत क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या गावाशी संबंधित मतदार यादीत नोंदणी केलेल्या व्यक्तींचा समावेश असलेली संस्था

(c) "मध्यवर्ती स्तर" म्हणजे या भागाच्या उद्देशांसाठी मध्यवर्ती स्तर असल्याचे सार्वजनिक अधिसूचनेद्वारे राज्याच्या राज्यपालाने निर्दिष्ट केलेले गाव आणि जिल्हा स्तरांमधील स्तर

(d) "पंचायत" म्हणजे अनुच्छेद २४३B अन्वये ग्रामीण भागासाठी स्थापन केलेली स्वराज्य संस्था (कोणत्याही नावाने ओळखली जाते) असा आहे;

(e) "पंचायत क्षेत्र" म्हणजे पंचायतीचे प्रादेशिक क्षेत्र

(f) "लोकसंख्या" म्हणजे शेवटच्या आधीच्या जनगणनेत निश्चित केलेली लोकसंख्या ज्याचे संबंधित आकडे प्रकाशित केले गेले आहेत;

(g) "गाव" म्हणजे या भागाच्या उद्देशांसाठी राज्यपालाने सार्वजनिक अधिसूचनेद्वारे निर्दिष्ट केलेले गाव आणि त्यामध्ये अशा प्रकारे निर्दिष्ट केलेल्या गावांचा समूह समाविष्ट आहे.

२४३**A. ग्रामसभा**

ग्रामसभा अशा अधिकारांचा वापर करू शकते आणि गावपातळीवर अशी कार्ये करू शकते जसे राज्याचे विधानमंडळ कायद्याद्वारे प्रदान करेल.

२४३**B. पंचायतींची रचना**

(१) या भागाच्या तरतुदींनुसार प्रत्येक राज्यात, गाव, मध्यवर्ती आणि जिल्हा स्तरावर पंचायती स्थापन केल्या जातील.(२) खंड (१) मध्ये काहीही असले तरी, वीस लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या नसलेल्या राज्यात मध्यवर्ती स्तरावरील पंचायती स्थापन करता येणार नाहीत.

## २४३**C. पंचायतींची रचना**

(१) या भागाच्या तरतुदींच्या अधीन राहून, राज्याचे विधानमंडळ, कायद्याद्वारे, पंचायतींच्या रचनेच्या संदर्भात तरतूद करू शकते:परंतु, कोणत्याही स्तरावरील पंचायतीच्या प्रादेशिक क्षेत्राची लोकसंख्या आणि निवडणुकीद्वारे भरल्या जाणाऱ्या अशा पंचायतीमधील जागांची संख्या, यथावकाश, संपूर्ण राज्यात समान असेल.

(२) पंचायतीमधील सर्व जागा पंचायत क्षेत्रातील प्रादेशिक मतदारसंघातून थेट निवडणुकीद्वारे निवडलेल्या व्यक्तींद्वारे भरल्या जातील आणि; या उद्देशासाठी, प्रत्येक पंचायत क्षेत्र प्रादेशिक मतदारसंघांमध्ये अशा प्रकारे विभागले जाईल की प्रत्येक मतदारसंघाची लोकसंख्या आणि त्याला वाटप केलेल्या जागांची संख्या, यथावकाश, संपूर्ण पंचायत क्षेत्रामध्ये समान असेल.

(३) राज्याचे विधानमंडळ, कायद्याने, प्रतिनिधित्वाची तरतूद करू शकते-

(a) ग्रामीण स्तरावरील पंचायतींचे अध्यक्ष, मध्यवर्ती स्तरावरील पंचायतींमध्ये किंवा मध्यवर्ती स्तरावर पंचायत नसलेल्या राज्याच्या बाबतीत, जिल्हा स्तरावरील पंचायतींमध्ये

(b) मध्यवर्ती स्तरावरील पंचायतींचे अध्यक्ष, जिल्हा स्तरावरील पंचायतींमध्ये

(c) लोकसभेचे सदस्य आणि राज्याच्या विधानसभेचे सदस्य जे मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात ज्यात गावपातळी व्यतिरिक्त इतर स्तरावर संपूर्ण किंवा अंशतः पंचायत क्षेत्र समाविष्ट आहे, अशा पंचायतीमध्ये;

(d) राज्यांच्या परिषदेचे सदस्य आणि राज्याच्या विधान परिषदेचे सदस्य, जिथे त्यांची मतदार म्हणून नोंदणी केली जाते-(i) मध्यवर्ती स्तरावर पंचायत क्षेत्र, मध्यवर्ती स्तरावरील पंचायतीमध्ये;(ii) जिल्हा स्तरावर पंचायत क्षेत्र, जिल्हा स्तरावरील पंचायत.

(४) पंचायत क्षेत्रातील प्रादेशिक मतदारसंघातून थेट निवडणुकीने निवडले किंवा नसले तरीही पंचायतीच्या अध्यक्षांना आणि पंचायतीच्या इतर सदस्यांना पंचायतीच्या बैठकीत मतदान करण्याचा अधिकार असेल.

(५) पंचायतीचे अध्यक्ष -(a) गावपातळीवर पंचायत अशा रीतीने निवडली जाईल ज्याप्रमाणे राज्याचे विधानमंडळ, कायद्याने तरतूद करेल; आणि (b) मध्यवर्ती स्तरावर किंवा जिल्हा स्तरावरील पंचायत, त्यातील निवडून आलेल्या सदस्यांद्वारे आणि त्यांच्यामधून निवडली जाईल.

## २४३**D. जागांचे आरक्षण**

(१) जागा यासाठी राखीव असतील-

(a) अनुसूचित जाती; आणि (b) अनुसूचित जमाती,

प्रत्येक पंचायतीमध्ये आणि राखीव जागांची संख्या, त्या पंचायत क्षेत्रातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या किंवा त्या पंचायतीच्या प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे भरल्या जाणाऱ्या एकूण जागांच्या संख्येइतकेच प्रमाण असेल. त्या पंचायत क्षेत्रातील

munotes.in

अनुसूचित जमाती ही त्या क्षेत्राच्या एकूण लोकसंख्येइतकी आहे आणि अशा जागा पंचायतीमधील वेगवेगळ्या मतदारसंघात रोटेशनद्वारे वाटप केल्या जाऊ शकतात.

(२) खंड (१) अंतर्गत राखीव असलेल्या एकूण जागांपैकी एक तृतीयांश जागांपैकी कमीत कमी जागा अनुसूचित जातीतील महिलांसाठी किंवा यथास्थिती, अनुसूचित जमातीसाठी राखीव असतील.

(३) प्रत्येक पंचायतीमध्ये प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे भरल्या जाणाऱ्या एकूण जागांपैकी एक तृतीयांश (अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी राखीव जागांच्या संख्येसह) महिलांसाठी राखीव असतील आणि अशा पंचायतीमधील वेगवेगळ्या मतदारसंघात आवर्तनाद्वारे जागा वाटप केल्या जाऊ शकतात.

(४) गावातील किंवा इतर कोणत्याही स्तरावरील पंचायतींमधील अध्यक्षांची पदे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिलांसाठी अशा प्रकारे राखीव असतील, जसे की राज्याचे विधानमंडळ, कायद्याद्वारे, तरतूद करेल:परंतु, कोणत्याही राज्यातील प्रत्येक स्तरावरील पंचायतींमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या अध्यक्षांच्या कार्यालयांची संख्या, जवळपास शक्य तितकी, प्रत्येक पंचायतीमधील अशा कार्यालयांच्या एकूण संख्येच्या समान प्रमाणात असेल. राज्यातील अनुसूचित जातींची किंवा राज्यातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या बरोबरीची पातळी:परंतु पुढे असे की, प्रत्येक स्तरावरील पंचायतींमधील अध्यक्षांच्या एकूण पदांपैकी एक तृतीयांश पेक्षा कमी पदे महिलांसाठी राखीव असतील:परंतु या कलमाखाली आरक्षित कार्यालयांची संख्या प्रत्येक स्तरावरील वेगवेगळ्या पंचायतींना रोटेशनद्वारे वाटप केली जाईल.

(५) खंड (१) आणि (२) अन्वये जागांचे आरक्षण आणि खंड (४) अन्वये अध्यक्षांच्या पदांचे आरक्षण (महिला आरक्षणाव्यतिरिक्त) हे लेखात नमूद केलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर प्रभावी होणार नाहीत.

(६) या भागातील कोणतीही गोष्ट राज्याच्या विधानमंडळाला कोणत्याही पंचायतीमध्ये किंवा पंचायतींमधील अध्यक्षांच्या कार्यालयांमध्ये कोणत्याही स्तरावर नागरिकांच्या मागासवर्गीयांच्या बाजूने जागा राखून ठेवण्यापासून रोखू शकत नाही.

### २४३**E. पंचायतींचा कालावधी, इ**

(१) प्रत्येक पंचायत, सध्याच्या काळासाठी लागू असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार लवकर विसर्जित केल्याशिवाय, तिच्या पहिल्या बैठकीसाठी नियुक्त केलेल्या तारखेपासून पाच वर्षे चालू राहील आणि यापुढे नाही.

(२) सध्याच्या काळासाठी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील कोणत्याही दुरुस्तीचा खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीची समाप्ती होईपर्यंत, अशा दुरुस्तीपूर्वी तत्काळ कार्यरत असलेल्या कोणत्याही स्तरावर पंचायत विसर्जित करण्याचा परिणाम होणार नाही.

(३) पंचायत स्थापन करण्यासाठी निवडणूक पूर्ण होईल-(अ) खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेला कालावधी संपण्यापूर्वी;(b) विसर्जनाच्या तारखेपासून सहा महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी:परंतु, विसर्जित झालेल्या पंचायतीचा उर्वरित कालावधी सहा महिन्यांपेक्षा

कमी असल्यास, अशा कालावधीसाठी पंचायत स्थापन करण्यासाठी या कलमाखाली कोणतीही निवडणूक घेण्याची आवश्यकता नाही.

(४) पंचायतीचा कालावधी संपण्यापूर्वी ती विसर्जित केल्यावर स्थापन झालेली पंचायत केवळ खंड (१) अन्वये पंचायत चालू राहिली असेल आणि ती विसर्जित झालेली नसेल तर उर्वरित कालावधीसाठीच सुरू राहील.

२४३**F. सदस्यत्वासाठी अपात्रता**

(१) एखादी व्यक्ती पंचायत सदस्य म्हणून निवडल्याबद्दल आणि असण्यासाठी अपात्र ठरवली जाईल-(a) जर तो संबंधित राज्याच्या विधानमंडळाच्या निवडणुकीच्या उद्देशाने सध्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याअंतर्गत अपात्र ठरला असेल तर:परंतु, कोणत्याही व्यक्तीचे वय पंचवीस वर्षांपेक्षा कमी आहे या आधारावर, जर तिचे वय एकवीस वर्षे पूर्ण झाले असेल तर तिला अपात्र ठरवले जाणार नाही;(b) जर तो राज्याच्या विधानमंडळाने बनवलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याच्या अंतर्गत अपात्र ठरला असेल.

(२) पंचायतीचा सदस्य खंड (१) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही अपात्रतेच्या अधीन झाला आहे की नाही असा प्रश्न उद्भवल्यास, तो प्रश्न अशा प्राधिकरणाच्या निर्णयासाठी आणि अशा रीतीने एखाद्याच्या विधानमंडळाच्या निर्णयासाठी संदर्भित केला जाईल. राज्य, कायद्याने, प्रदान करू शकते.

**२४३G. पंचायतींचे अधिकार आणि जबाबदाऱ्या.-** या राज्यघटनेतील तरतुदींच्या अधीन राहून, राज्याचे विधानमंडळ, कायद्याद्वारे, पंचायतींना स्वराज्य संस्था म्हणून कार्य करण्यास सक्षम करण्यासाठी आवश्यक असे अधिकार प्रदान करू शकते. आणि अशा कायद्यामध्ये पंचायतींना योग्य स्तरावर अधिकार आणि जबाबदाऱ्यांचे हस्तांतरण करण्याच्या तरतुदी असू शकतात, त्यामध्ये निर्दिष्ट केल्या जाणाऱ्या अटींच्या अधीन राहून-(a) आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायासाठी योजना तयार करणे;(b) अकराव्या अनुसूचीमध्ये सूचीबद्ध केलेल्या बाबींसह आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायासाठी त्यांना सोपवल्या जाणाऱ्या योजनांची अंमलबजावणी करणे.

२४३**H. पंचायतींद्वारे कर लादण्याचे अधिकार आणि निधी**

एखाद्या राज्याचे विधानमंडळ, कायद्याने,

(a) कर, शुल्क, टोल आणि शुल्क आकारण्यासाठी, गोळा करण्यासाठी आणि योग्य करण्यासाठी पंचायतीला अधिकृत करणे.

(b) पंचायतीला असे कर, शुल्क, टोल आणि शुल्क अशा उद्देशांसाठी आणि अशा अटी आणि मर्यादेच्या अधीन राहून राज्य सरकारने आकारने.

(c) राज्याच्या एकत्रित निधीतून पंचायतींना असे अनुदान देण्याची तरतूद करणे.



munotes.in

(d) पंचायतींद्वारे किंवा त्यांच्या वतीने प्राप्त झालेले सर्व पैसे अनुक्रमे जमा करण्यासाठी आणि त्यातून असे पैसे काढण्यासाठी अशा कायद्यात नमूद केल्याप्रमाणे निधीची स्थापना करणे.

## २४३-I. आर्थिक स्थितीचे पुनरावलोकन करण्यासाठी वित्त आयोगाची रचना

(१) राज्याचा राज्यपाल, राज्यघटना (सत्तरवी दुरुस्ती) कायदा, १९९२ सुरू झाल्यापासून एक वर्षाच्या आत आणि त्यानंतरची मुदत संपल्यावर. दर पाचव्या वर्षी पंचायतींच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यासाठी वित्त आयोग स्थापन करण्याची शिफारस राज्यपाल करतील.

(a) जी तत्त्वे नियंत्रित करावीत-(i) राज्याद्वारे आकारण्यात येणारे कर, शुल्क, टोल आणि शुल्क यांच्या निव्वळ उत्पन्नाचे राज्य आणि पंचायतींमधील वितरण, जे या भागांतर्गत त्यांच्यामध्ये विभागले जाऊ शकतात आणि पंचायतींमधील त्यांच्या संबंधित सर्व स्तरांवर उत्पन्नाचे वाटप करणे. (ii) कर, कर्तव्ये, टोल आणि फी यांचे निर्धारण जे पंचायतीला नियुक्त केले जाऊ शकतात किंवा विनियोजन केले जाऊ शकतात;(iii) राज्याच्या एकत्रित निधीतून पंचायतींना दिले जाणारे अनुदान.

(b) पंचायतींची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना;

(c) पंचायतींच्या सुदृढ वित्ताच्या हितासाठी राज्यपालांनी वित्त आयोगाकडे पाठविलेली इतर कोणतीही बाब.

(२) एखाद्या राज्याचे विधानमंडळ, कायद्याद्वारे, आयोगाच्या रचनेसाठी, तिच्या सदस्य म्हणून नियुक्तीसाठी आवश्यक असलेली पात्रता आणि त्यांची निवड कोणत्या पद्धतीने केली जाईल याची तरतूद करू शकते.

(३) आयोग त्यांची कार्यपद्धती निश्चित करेल आणि राज्याचे विधानमंडळ कायद्याद्वारे त्यांना प्रदान करेल असे अधिकार त्यांच्या कार्याच्या संबंधित असतील.

(४) या अनुच्छेदाखाली आयोगाने केलेल्या प्रत्येक शिफारशी राज्याच्या विधानमंडळासमोर ठेवल्या जातील व त्यावरील कारवाईच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह राज्यपालास पाठवल्या जातील.

## २४३J. पंचायतींच्या खात्यांचे लेखापरीक्षण

एखाद्या राज्याचे विधानमंडळ, कायद्याने, पंचायतींच्या खात्यांची देखरेख आणि अशा खात्यांचे लेखापरीक्षण करण्याच्या संदर्भात तरतूद करू शकते.

## २४३K. पंचायतींच्या निवडणुका

(१) पंचायतींच्या सर्व निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्याचे आणि आयोजित करण्याचे, त्यावर देखरेख, दिशा आणि नियंत्रण राज्य निवडणूक आयोगाकडे असेल ज्यामध्ये राज्य निवडणूक आयुक्त नियुक्त केला जाईल.



munotes.in

(२) राज्याच्या विधानमंडळाने केलेल्या कोणत्याही कायद्यातील तरतुदींच्या अधीन राहून, राज्य निवडणूक आयुक्तांच्या सेवाशर्ती आणि पदाचा कार्यकाळ राज्यपाल नियमानुसार ठरवू शकेल अशा असतीलःपरंतु, राज्य निवडणूक आयुक्तांना उच्च न्यायालयाचे न्यायाधीश या नात्याने आणि तत्सम कारणाशिवाय त्यांच्या पदावरून काढून टाकले जाणार नाही आणि त्यांच्या नियुक्तीनंतर राज्य निवडणूक आयुक्तांच्या सेवेच्या अटींमध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.

(३) राज्य निवडणूक आयोगाने विनंती केल्यावर राज्याचे राज्यपाल, राज्य निवडणूक आयोगाला खंड (१) द्वारे राज्य निवडणूक आयोगाला प्रदान केलेल्या कार्यांसाठी आवश्यक असेल असे कर्मचारी उपलब्ध करून देतील.

(४) या राज्यघटनेच्या तरतुदींच्या अधीन राहून, एखाद्या राज्याचे विधानमंडळ, कायद्याद्वारे, पंचायतींच्या निवडणुकांशी संबंधित किंवा संबंधित सर्व बाबींच्या संदर्भात तरतूद करू शकते.

### २४३**L. केंद्रशासित प्रदेशांसाठी**

या भागाच्या तरतुदी केंद्रशासित प्रदेशांना लागू होतील. तसेच अनुच्छेद २३९ अन्वये आणि विधानमंडळ किंवा राज्याच्या विधानसभेचे संदर्भ, विधानसभेच्या केंद्रशासित प्रदेशाच्या संबंधात, त्या विधानसभेचे संदर्भ होते:परंतु, राष्ट्रपती, सार्वजनिक अधिसूचनेद्वारे, निर्देश देऊ शकतात की या भागाच्या तरतुदी कोणत्याही केंद्रशासित प्रदेशाला किंवा त्याच्या भागाला लागू होतील अशा अपवाद आणि सुधारणांच्या अधीन राहून त्यांनी अधिसूचनेत नमूद केले असेल.

### २४३**M. काही भागांना लागू न होणारा भाग**

(१) या भागातील कोणतीही गोष्ट कलम (१) मध्ये संदर्भित अनुसूचित क्षेत्रांना आणि कलम २४४ च्या खंड (२) मध्ये संदर्भित आदिवासी भागात लागू होणार नाहीत.

(२) या भागातील काहीही त्यांना लागू होणार नाही-(a) नागालँड, मेघालय आणि मिझोराम राज्ये;(b) मणिपूर राज्यातील पर्वतीय क्षेत्र ज्यासाठी कोणत्याही कायद्यानुसार सध्या अस्तित्वात असलेल्या जिल्हा परिषदा अस्तित्वात आहेत.

(३) (a) जिल्हा स्तरावरील पंचायतींशी संबंधित पश्चिम बंगाल राज्यातील दार्जिलिंग जिल्ह्याच्या डोंगराळ भागात लागू होईल ज्यासाठी दार्जिलिंग गोरखा हिल कौन्सिल सध्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार अस्तित्वात आहे;(b) अशा कायद्यांतर्गत स्थापन केलेल्या दार्जिलिंग गोरखा हिल कौन्सिलच्या कार्ये आणि अधिकारांवर परिणाम होईल असा अर्थ लावला जाईल.

(४) या संविधानात काहीही असले तरी,-

(a) खंड (२) च्या उपखंड (a) मध्ये संदर्भित राज्याचे विधानमंडळ, कायद्याद्वारे, खंड (१) मध्ये संदर्भित क्षेत्र वगळता, जर काही असेल तर, त्या राज्याला हा भाग विस्तारित करू शकते, जर त्या राज्याची विधानसभा त्या सभागृहाच्या

एकूण सदस्यसंख्येच्या बहुमताने आणि त्या सभागृहाच्या उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन तृतीयांश पेक्षा कमी नसलेल्या बहुमताने तसा ठराव पास करू शकते;(b) संसद, कायद्याद्वारे, या भागाच्या तरतुदींचा विस्तार अनुसूचित क्षेत्रे आणि खंड (१) मध्ये नमूद केलेल्या आदिवासी भागात अशा कायद्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपवाद आणि सुधारणांच्या अधीन राहुल करू शकते.

### २४३**N. विद्यमान कायदे आणि पंचायतींचे सातत्य**

या भागात काहीही असले तरी, राज्यघटना (सत्तरवी दुरुस्ती) अधिनियम, १९९२ सुरू होण्यापूर्वी लगेचच राज्यात अंमलात असलेल्या पंचायतींशी संबंधित कोणत्याही कायद्याची कोणतीही तरतूद, जी तरतुदींशी विसंगत आहे. ती सक्षम कायदेमंडळ किंवा इतर सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे सुधारित किंवा रद्द करेपर्यंत किंवा अशा प्रारंभापासून एक वर्षाची मुदत संपेपर्यंत, यापैकी जे आधी असेल तोपर्यंत अंमलात राहील.

### २४३-ओ. निवडणूक प्रकरणांमध्ये न्यायालयांच्या हस्तक्षेपास प्रतिबंध

या घटनेत काहीही असले तरी,-(a) मतदारसंघांच्या सीमांकन किंवा अशा मतदारसंघांना जागा वाटपाशी संबंधित कोणत्याही कायद्याची वैधता, कलम २४३K अंतर्गत बनविल्या जाणाऱ्या किंवा केल्या जाणाऱ्या, कोणत्याही न्यायालयात प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाणार नाही;(b) अशा प्राधिकरणासमोर सादर केलेल्या निवडणूक याचिकेशिवाय आणि एखाद्या राज्याच्या विधानमंडळाने बनविलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याअंतर्गत प्रदान केलेल्या पद्धतीने कोणत्याही पंचायतीच्या निवडणुकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाणार नाही.'संविधानात, उपखंड (ब) नंतर, खालील उपखंड समाविष्ट केले जातील, म्हणजे:-

(bb) राज्याच्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशींच्या आधारे राज्यातील पंचायतींच्या संसाधनांना पूरक करण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये वाढ करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना करण्यासाठी संविधानात खालील अनुसूची जोडली जाईल.

### अकरावी अनुसूची(अनुच्छेद २४३**G**)

१. कृषी, कृषी विस्तारासह.२. जमीन सुधारणा, जमीन सुधारणांची अंमलबजावणी, जमीन एकत्रीकरण आणि मृदा संवर्धन.३. लघु सिंचन, पाणी व्यवस्थापन आणि पाणलोट विकास.४. पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालन.५. मत्स्यव्यवसाय.६. सामाजिक वनीकरण आणि शेत वनीकरण.७. गौण वनोपज.८. अन्न प्रक्रिया उद्योगांसह लघु उद्योग.९. खादी, ग्राम आणि कुटीर उद्योग.१०. ग्रामीण गृहनिर्माण.११. पिण्याचे पाणी.१२. इंधन आणि चारा.१३. रस्ते, कल्व्हर्ट, पूल, फेरी, जलमार्ग आणि दळणवळणाची इतर साधने.१४. ग्रामीण विद्युतीकरण, वीज वितरणासह.१५. अपारंपरिक ऊर्जा स्रोत.१६. गरीबी निर्मूलन कार्यक्रम.१७. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांसह शिक्षण.१८. तांत्रिक प्रशिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण.१९. प्रौढ आणि अनौपचारिक शिक्षण.२०. लायब्ररी.२१. सांस्कृतिक उपक्रम.२२. बाजार आणि जत्रा.२३. रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि दवाखान्यांसह आरोग्य आणि स्वच्छता.२४. कुटुंब कल्याण.२५. महिला आणि बाल विकास.२६. अपंग आणि मतिमंदांच्या कल्याणासह सामाजिक कल्याण.२७. दुर्बल घटकांचे आणि विशेषतः

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे कल्याण.२८. सार्वजनिक वितरण प्रणाली.२९. सामुदायिक मालमत्तेची देखभाल.

### ७३ **व्या घटना दुरुस्तीचे वैशिष्ट्ये**

१) कायद्याने प्रत्येक स्तरावर लोकप्रतिनिधित्व.

२) प्रत्येक पंचायतीच्या निवडणुका दर पाच वर्षांनी घेणे.

३) पंचायतीच्या निवडणुका घेण्यासाठी राज्यस्तरावर राज्य निवडणूक आयोग स्थापन करणे.

४) पंचायतराज व्यवस्थेमध्ये महिलांना एक तृतीयांश आरक्षण.

५) लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती आणि जमातींना आरक्षण.

६) वित्त आयोगाची स्थापना करणे.

७) पंचायती संस्थांना राज्य शासनाद्वारे निधी उपलब्ध करून देणे.

८) कायद्याने पंचायतीचे लेखापरीक्षण करणे.

९) न्यायालयाच्या हस्तक्षेपांवर बंदी.

१०) पंचायती राज्याचे तीन स्तर निश्चित करण्यात आले.

११) ग्रामसभेला अत्यंत महत्त्वाचे स्थान.

१२)निवडणूकीला उभे राहण्याकरीता वयाची अट, वय वर्षे २१ पूर्ण असणे अनिवार्य

१३)एखादी पंचायत बरखास्त केल्यास सहा महिन्यात निवडणूका घेणे आवश्यक

१६)आरक्षण सरपंच, सभापती, पंचायत समिती व अध्यक्ष, जिल्हा परिषद या पदांनाही लागू

७३ व्या घटना दुरुस्ती १९९२ मध्ये कलम २४३ ते २४३(O) मधील तरतुदींचा समावेश असलेल्या "पंचायती" नावाच्या घटनेत नवीन भाग IX जोडला आहे आणि पंचायतींच्या कार्यांतर्गत २९ विषयांचा समावेश असलेली नवीन अकरावी अनुसूची जोडण्यात आलेली आहे.

ग्रामीण भारतामध्ये ७३व्या घटनादुरुस्तीचा सकारात्मक प्रभाव स्पष्टपणे दिसत आहे. आज सत्ता समीकरणे लक्षणीयरीत्या बदलली आहेत. बहुतांश राज्यांतील पंचायतींच्या निवडणुका नियमितपणे होत आहेत. ६०० हून अधिक जिल्हा पंचायती, सुमारे ६००० मध्यवर्ती पंचायती आणि २.३ लाख ग्रामपंचायतींच्या माध्यमातून २८ लाखांहून अधिक व्यक्तींना आता आपल्या प्रातिनिधिक लोकशाहीत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.तरीही नोकरशाहीच्या भूमिकेची योग्य व्याख्या या विधेयकात नाही. त्यात राज्य सरकारची भूमिका स्पष्टपणे स्पष्ट होत नाही. व्यावहारिक स्तरावर, भारतात लोक निरक्षर आहेत त्यांना पंचायत राजची प्रत्यक्षात माहिती नाही. देशाच्या काही भागात आजही जात पंचायतींचे वर्चस्व आहे.

munotes.in

पंचायती राजाच्या तीनही स्तरांना अजूनही खूप मर्यादित आर्थिक अधिकार आहेत आणि त्यांची व्यवहार्यता पूर्णपणे राज्यांच्या राजकीय इच्छाशक्तीवर अवलंबून असल्यामुळे पंचायतराज संस्थांना काही मर्यादा पडताना दिसून येतात.

### १.३.३ महाराष्ट्र, केरळ, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश मधील पंचायतराज संस्थांचा तुलनात्मक अभ्यास

**महाराष्ट्र, केरळ, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश मधील पंचायतराज संस्थांचा तुलनात्मक अभ्यास**

भारतातील वेगवेगळ्या राज्यांच्या पंचायतराज संबंधीचा तुलनात्मक अभ्यास करताना आपल्याला पंचायतराज विषयक भारतीय संविधानातील तरतुदीचाही अभ्यास करणे गरजेचे आहे. कारण भारतीय संविधानात पंचायतराज व्यवस्थेचे स्वरूप, अधिकार, कार्य, भूमिका याचे त्यात सविस्तर विवेचन करण्यात आलेले आहे.

**पंचायतीराज संबंधी घटनात्मक तरतुदी**

भारतीय राज्यघटनेच्या भाग IX मध्ये पंचायतींच्या तीन स्तरांची स्थापना करण्याची तरतूद आहे. त्यामध्ये (i) गाव पातळीवर ग्रामपंचायत (ii) जिल्हा स्तरावरील जिल्हा पंचायती आणि (iii) उपजिल्हा स्तरावरील ग्रामपंचायती आणि जिल्हा पंचायतींमधील दुवा म्हणून कार्य करण्यासाठी मध्यवर्ती पंचायतीची (पंचायत समिती) स्थापना करण्यात यावी. तसेच स्थानिक प्रशासनामध्ये ग्रामस्थांच्या थेट सहभागासाठी एक मंच म्हणून ग्रामपंचायत क्षेत्रात राहणाऱ्या नोंदणीकृत मतदारांची सर्वसाधारण सभा म्हणजेच ग्रामसभा स्थापन करावी अशी तरतूद आहे. तसेच 2

दशलक्षपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या बाबतीत फक्त पंचायतराज व्यवस्थेचे दोन स्तर असतील.

भारतीय राज्यघटनेने या पंचायतींसाठी पाच वर्षांचा कालावधी निश्चित केला आहे. तसेच भारतीय समाजातील महिला आणि उपेक्षित घटकांसाठी (अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती) लोकसंख्येच्या प्रमाणात जागांच्या आरक्षणाची तरतूद केली आहे. तसेच महिलांसाठी 33.33% राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. तथापि, अनेक भारतीय राज्यांनी पंचायतींमध्ये महिलांसाठी जागा आणि अध्यक्षपदांचे आरक्षण 50% पर्यंत वाढवले आहे.

भारतीय राज्यघटनेने पंचायतींच्या सर्व सदस्यांची निवडीसाठी निवडणुकांची तरतूद केली आहे. या निवडणुका आयोजित करण्यासाठी, सर्व राज्यांना राज्य निवडणूक आयोग स्थापन करणे बंधनकारक आहे. तसेच राज्य आणि स्थानिक सरकार (शहरी आणि ग्रामीण दोन्ही)

munotes.in

यांच्यामध्ये वित्तीय संसाधनांच्या विभाजनासाठी तत्त्वांची शिफारस करण्यासाठी प्रत्येक पाचव्या वर्षी राज्य वित्त आयोग (SFC) स्थापन करणे राज्यांसाठी अनिवार्य केले आहे.

**भारतीय राज्यघटनेतील संविधानात्मक तरतुदी पाहता पंचायतराजची भारतातील सद्यस्थिती (सांख्यिकीय) पुढील प्रमाणे सांगता येईल**

| अ.क्र | विवरण | संख्या |
|---|---|---|
| १ | भारतातील तीनही पातळीवरील एकूण पंचायतीराज संस्था संख्या | २६०५१२ |
| २ | भारतातील ग्रामपंचायतीची संपूर्ण संख्या | २५३२६८ |
| ३ | भारतातील तालुका पातळीवरील पंचायतीची संख्या | ६६१४ |
| ४ | भारतातील जिल्हा पातळीवरील जिल्हा पंचायतीची संख्या | ६३० |
| ५ | भारतातील निवडून आलेल्या पंचायत सदस्यांची एकूण संख्या | ३१ लाख |
| ६ | भारतातील निवडून आलेल्या महिला पंचायत सदस्यांची एकूण संख्या | १३.७५ लाख |

**Source:Basic Statistics of Panchayati Raj Institutions,2019,Ministry of Panchayati Raj, Government of India**

**भारतीय राज्यघटनेतील संविधानात्मक तरतुदी पाहता भारतातील पंचायतराजची केरळ, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र राज्याची तुलनात्मक सद्यस्थिती (सांख्यिकीय) पुढील प्रमाणे सांगता येईल**

| अ.क्र | विवरण | | केरळ | पश्चिम बंगाल | मध्यप्रदेश | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राज्यनिहाय निहाय पंचायतराज | जिल्ह्यांची संख्या | १४ | २३ | ५२ | ३६ |
| | | उपजिल्हा विभागाची संख्या | ७७ | ३४१ | ३५२ | ३५५ |
| | | ब्लॉकची संख्या (तालुका) | १५२ | ३४२ | ३१३ | ३२२ |

munotes.in

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रशासकीय विभाग | खेड्यांची संख्या | १६६४ | ४०९९७ | ५५१८५ | ४४१४६ |
| २ | राज्यनिहाय पंचायतीराज संस्थांची संख्या (जिल्हा, मध्यवर्ती आणि ग्रामपंचायती) | जिल्हा | १४ | २२ | ५१ | ३४ |
| | | पंचायत समिती | १५२ | ३४२ | ३१३ | ३५१ |
| | | ग्रामपंचायती | ९४१ | ३३४० | २२८१७ | २७८७० |
| | | पारंपरिक पंचायती | — | ०१ | —- | ——--- |
| ३ | राज्यनिहाय पंचायतीराज संस्था मध्ये निवडून आलेल्या प्रतिनिधींची संख्या (जिल्हा, मध्यवर्ती आणि ग्रामपंचायती | जिल्हा | ३३१ | ८३४ | ८५२ | १९९० |
| | | पंचायत समिती | २०७९ | ९३०६ | ६७९० | ३९३९ |
| | | ग्रामपंचायती | १५९६२ | ४९२६२ | ३८५३३९ | २३४१९३ |
| | | पारंपरिक पंचायती | ०० | ०० | ०० | ०० |
| | | एकूण | १८३७२ | ५९४०२ | ३९२९८१ | २४०१२२ |
| ४ | राज्यनिहाय पंचायतीराज संस्था मध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींची संख्या (जिल्हा, मध्यवर्ती आणि ग्रामपंचायती | जिल्हा | १६८ | ४२३ | ४२६ | १००५ |
| | | पंचायत समिती | ११०२ | ४७४३ | ३३९५ | १९८९ |
| | | ग्रामपंचायती | ८३६० | २४९९१ | १९२६६९ | ११८४९६ |
| | | पारंपरिक पंचायती | ०० | ०० | ०० | ०० |
| | | एकूण | ९६३० | ३०१५७ | १९६४९० | १२१४९० |
| ५ | राज्यनिहाय पंचायतीराज संस्था मध्ये | निवडून आलेल्या एकूण | १८३७२ | ५९४०२ | ३९२९८१ | २४०१२२ |

munotes.in

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | निवडून आलेल्या एकूण प्रतिनिधीच्या प्रमाणात महिला प्रतिनिधींची संख्या (जिल्हा, मध्यवर्ती आणि ग्रामपंचायती | प्रतिनिधीची संख्या | | | | |
| | | निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींची संख्या | ९६३० | ३०१५७ | १९६४९० | १२१४९० |
| | | निवडून आलेल्या महिला प्रतिनिधीची एकूण टक्केवारी | ५२.४२ | ५०.७७ | ५०.०० | ५०.६० |

**Source:Basic Statistics of Panchayati Raj Institutions,2019,Ministry of Panchayati Raj, Government of India**

**महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्था**

महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्था ही भारतासाठी मार्गदर्शक म्हणून ओळखली जाते, शिवाय पंचायतराज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी महाराष्ट्राने देशाचे नेतृत्व केलेले आहे. केंद्र शासनाने स्थापन केलेल्या बलवंतराय मेहता समितीच्या शिफारसीनुसार त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात येऊन तिचे नामकरण 'पंचायतराज' असे करण्यात आले. मेहता समितीने सुचविलेल्या पंचायतराज व्यवस्थेच्या चौकटीत राहून स्थानिक गरजांनुसार राज्यस्तरावर पंचायतराज स्थापन करण्याची मुभा राज्यांना दिली.त्यानुसार २ ऑक्टोबर १९५८ रोजी राजस्थान आणि १ नोव्हेंबर १९५८ रोजी आंध्रप्रदेश या राज्यांनी पंचायतराज संस्थाची स्थापना केली. खऱ्या अर्थाने राजस्थान या राज्याच्या पुढाकाराने त्रिस्तरीय व्यवस्था प्रत्यक्ष अंमलात आली. पंचायतराजची स्थापना करणारे राजस्थान हे पहिले राज्य आहे,आंध्रप्रदेश २ रे तर महाराष्ट्र हे ९ वे राज्य आहे.व्दिभाषिक मुंबई राज्याच्या पुर्नरचनेचा प्रश्न विचाराधीन असल्यामुळे मुंबई राज्यात पंचायतराज निर्मितीचा विषय लांबणीवर टाकण्यात आला होता. १ मे १९६० रोजी नवीन महाराष्ट्राची निर्मिती झाली.

मेहता समितीच्या शिफारशींच्या आधारे महाराष्ट्रात पंचायतराजची कशा प्रकारे अंमलबजावणी करता येईल, याचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने २६ जून १९६० रोजी तत्कालीन महसूलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. या समितीच्या शिफारशीनुसार ८ सप्टेंबर १९६१ रोजी महाराष्ट्रातील दोन्ही सभागृहांत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ संमत करण्यात आला.या

munotes.in

अधिनियमाला ५ मार्च १९६२ रोजी भारताच्या राष्ट्रपतींची अनुमती मिळाली. त्यानंतर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार १ मे १९६२ पासून पंचायतराज व्यवस्था सुरू करण्यात आली.त्यानुसार महाराष्ट्रात सध्याच्या स्थितीत त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था कार्यरत आहे. महाराष्ट्रातील वेळोवेळी पंचायतराज व्यवस्थित काळानुरूप बदल करण्यात आले आहेत.

१९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायतराजमध्ये आमुलाग्र बदल करण्यात आले. पंचायतराजला सवैधानिक दर्जा प्राप्त झाल्यामुळे ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायतराज व्यवस्था बळकट होण्यास मदत झाली. ७३ वी घटना दुरुस्ती ही पंचायतराज व्यवस्थेसाठी एका अर्थाने हा मैलाचा दगड म्हणता येईल कारण यानुसार पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत याप्रमाणे त्रिस्तरीय पध्दत विकसीत करण्यात येऊन ग्रामपंचायत ग्रामसभा बंधनकारक करण्यात आली.

**महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्थेची रचना पुढील प्रमाणे आहे.**




**महाराष्ट्रातील स्थानिक संस्थांची आकडेवारी**

भारतीय राज्यघटना कलम ४० नुसार ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात यावी या तत्त्वानुसार महाराष्ट्रात प्रत्येक गावात व काही गावांसाठी एकत्र ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात आलेली आहे. आज महाराष्ट्रात ३४ जिल्हा परिषद ३५१ पंचायत समिती व २८ हजार ५६३ एवढ्या ग्रामपंचायती आहेत महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार त्याचा कारभार चालतो.

| Sr. No. | Division | Area in Sq. Km. | Population | No. of Districts | Municipal Corporations | Municipal Councils | Nagar Panchayats | Zilla Parishads | Panchayat Samitis | Village Panchayats | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Konkan | 30728 | 24883830 | 7 | 9 | 22 | 21 | 5 | 45 | 3014 | 3116 |
| 2 | Nashik | 57440 | 15736784 | 5 | 5 | 40 | 17 | 5 | 54 | 4972 | 5093 |
| 3 | Pune | 57275 | 19997778 | 5 | 5 | 50 | 16 | 5 | 57 | 5649 | 5782 |
| 4 | Aurangabad | 64813 | 15629248 | 8 | 4 | 50 | 25 | 8 | 76 | 6582 | 6745 |
| 5 | Amravati | 46035 | 9948366 | 5 | 2 | 40 | 16 | 5 | 56 | 3910 | 4029 |
| 6 | Nagpur | 51286 | 10682621 | 6 | 2 | 39 | 33 | 6 | 63 | 3655 | 3798 |
| Total | | 307577 | 96878627 | 36 | 27 | 241 | 128 | 34 | 351 | 27782 | 28563 |

## केरळ पंचायतराज व्यवस्था

1960 च्या पंचायत अधिनियमाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विभागाचे पंचायत विभागामध्ये विभाजन करण्याची शिफारस केली होती.1957 मध्ये भारत सरकारने श्री. बलवंत राय मेहताच्या अध्यक्षतेखाली समुदाय विकास कार्यक्रमाचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली. समितीने ग्रामीण स्थानिक सरकारची एकसमान त्रिस्तरीय प्रणालीची शिफारस केली. बलवंत राय मेहता समितीच्या अहवालाच्या शिफारशींनुसार भारतात पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली. राज्यघटनेतील 73 व्या दुरुस्तीच्या आधारे पंचायतराज व्यवस्था देशपातळीवर लागू करण्यात आले. त्यातून केरळमध्ये पंचायत राज व्यवस्थेचा विकास करण्यासाठी केरळ पंचायतराज अधिनियम तयार करण्यात आला.

केरळ पंचायतराज अधिनियम १९९४ नुसार केरळमध्ये पंचायतराज व्यवस्थेत (अ) प्रत्येक गावासाठी किंवा गावांच्या गटासाठी एक ग्रामपंचायत. (ब) मध्यवर्ती स्तरावर ब्लॉक पंचायत; आणि (क) प्रत्येक जिल्हा पंचायत क्षेत्रासाठी एक जिल्हा पंचायत अशी त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आलेली आहे.कलम २४३ नुसार केरळ पंचायतराज व्यवस्थेमध्ये ग्रामसभा स्थापन करण्यात आलेल्या आहेत.प्रत्येक पंचायतीमध्ये अनुसूचित जाती आणि जमातीसाठी व महिलांसाठी जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.पंचायतीच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात आलेला आहे.केरळ पंचायतराज अधिनियम १९९४ मध्ये एकूण २६ प्रकरणांमध्ये केरळ पंचायतराज व्यवस्थेच्या संदर्भात सविस्तर अशी माहिती देण्यात आलेली आहे.

## पश्चिम बंगाल

१९७७ मध्ये पंचायतींच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी अशोक मेहता समितीची स्थापना करण्यात आली. पंचायतराज हा लोकशाहीचा आत्मा आहे, त्यामुळे त्याला अधिक अधिकार मिळायला हवेत, असे समितीच्या निदर्शनास आले. सन १९७७ नंतर स्थापन झालेल्या पंचायती दुसऱ्या पिढीच्या पंचायती म्हणून ओळखल्या जातात. पश्चिम बंगालमध्ये या अहवालात केलेल्या सूचना स्वीकारल्यानंतर पश्चिम बंगाल मध्ये पंचायती अधिक प्रभावी झाल्या.

१९९० च्या दशकात, पंचायतराज संस्थांना घटनात्मक अधिकार व दर्जा दिल्याशिवाय त्या फलदायी होऊ शकत नाही, म्हणून केंद्र सरकारने १९९२ मध्ये ७३ वी घटनादुरुस्ती कायदा संमत केला तेव्हापासून खऱ्या अर्थाने पंचायतराज व्यवस्था भारतात रुजवल्या गेली. एकंदरीतच पश्चिम बंगालमध्ये पंचायतराज व्यवस्थेचा अंमलबजावणीसाठी वेगवेगळे कायदे तयार करण्यात आले ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. पश्चिम बंगाल पंचायत ( निवडणूक ) कायदा , 2003 सर्व सुधारणांसह
2. पश्चिम बंगाल पंचायत ( निवडणूक ) नियम , 2006 सर्व सुधारणांसह
3. पश्चिम बंगाल पंचायत कायदा , 1973 सर्व सुधारणांसह 4. पश्चिम बंगाल पंचायत ( पंचायत समिती ) प्रशासकीय नियम , 2008 सर्व सुधारणांसह
5. पश्चिम बंगाल पंचायत ( घटना ) नियम 1975 सर्व सुधारणांसह
6. पश्चिम बंगाल पंचायत ( ग्रामपंचायत ) प्रशासकीय नियम , 2004 सर्व सुधारणांसह

पश्चिम बंगालमधील पंचायतराज व्यवस्थेचे वेगवेगळे कायदे पाहता पश्चिम बंगालमध्ये सुद्धा त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आहे. तसेच पश्चिम बंगालमध्ये सुद्धा महिलांसाठी व अनुसूचित जाती आणि जमातीसाठी जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच पंचायतीच्या निवडणुका घेण्यासाठी या ठिकाणी स्वतंत्र राज्य पातळीवर निवडणूक आयोग स्थापन करण्यात आलेला आहे.

संबंधित राज्य अधिनियम आणि त्याअंतर्गत केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार, सध्या २२ जिल्हा परिषदा मध्ये ८२५ मतदारसंघ आहेत. १ महाकुमा परिषद, ३४२ पंचायत समित्यांमध्ये समित्या ९२४० मतदारसंघ आहेत.आणि ३३५४ ग्रामपंचायतींमध्ये ४८७५१ ग्रामपंचायत मतदारसंघ आहेत. पश्चिम बंगालमध्ये ७ महानगरपालिका आणि ११९ नगरपालिका आहेत. म्हणजेच पश्चिम बंगालमध्ये सुद्धा त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आहे. तसेच पश्चिम बंगालमध्ये सुद्धा महिलांसाठी व अनुसूचित जाती आणि जमातीसाठी जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच पंचायतीच्या निवडणुका घेण्यासाठी या ठिकाणी स्वतंत्र राज्य पातळीवर निवडणूक आयोग स्थापन करण्यात आलेला आहे.

**मध्य प्रदेश**

मध्यप्रदेश पंचायतराज अधिनियम १९९३ नुसार मध्यप्रदेश मध्ये त्रिस्त्रीय पंचायती राजव्यवस्था अस्तित्वात आलेली आहे. ७३व्या घटनादुरुस्तीनंतर निवडणुका घेणारे पहिले राज्य हे मध्य प्रदेश आहे.२००१ मध्ये, पंचायतीराज अधिनियम मध्ये ग्राम स्वराज अधिनियम द्वारे सुधारणा करण्यात आली, ज्याने पंचायती राजच्या संरचनेत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी ग्रामसभा मजबूत करण्यावर भर दिलेला आहे. मध्यप्रदेश मध्ये त्रिस्त्रीय पंचायतराज व्यवस्था असून ग्रामपंचायत तालुका पातळीवर जनपद आणि जिल्हा पातळीवर

जिल्हा पंचायत अशी त्रिस्तरीय रचना असून महिलांसाठी व अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र, केरळ, मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यातील पंचायतराज व्यवस्थेचा तुलनात्मक अभ्यास करताना असे निदर्शनास येते की ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर या राज्यांमध्ये त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली असून ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना प्राधान्य देण्यात आलेले आहेत. प्रत्येक राज्यात लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती व जमातींना जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रत्येक राज्यासाठी पंचायतीच्या निवडणुका घेण्यासाठी स्वतंत्र निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली असून प्रत्येक राज्यांमध्ये वित्त आयोगाच्या ही स्थापना करण्यात आलेली आहे.

**सारांश**

पंचायतराज हे भारतातील स्थानिक सरकारचे नाव आहे.पंचायत प्रणालीत गावपातळीवर (ग्रामपंचायत) समाविष्ट करते,गावांचे समूह (ब्लॉक पंचायत) आणि जिल्हा स्तर (जिल्हा पंचायत).पंचायतीराज हे गावपातळीवरील शासनाचे स्वरूप आहे.प्रत्येक गाव स्वतःच्या क्रियाकलापांसाठी जबाबदार आहे.१९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायतीला अधिकार आणि जबाबदाऱ्या देण्यात आलेल्या आहेत.

**आपली प्रगती तपासा**

**१. स्थानिक स्वराज्य संस्थांचा अर्थ व व्याख्या सांगा?**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**२. बलवंतराव मेहता समितीच्या शिफारशी सांगा?**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**३. भारतातील पंचायतराज संस्थांचा उदय व विकास सांगा?**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

1. THE KERALA PANCHAYAT RAJ ACT & RULES I THE KERALA PANCHAYAT RAJ ACT 1994 I THE KERALA PANCHAYAT RAJ RULES I CONSTITUTION 73RD AMENDMENT ACT I GUIDELINES FOR THE PREPARATION OF TENTH FIVEYEAR PLAN OF LOCAL GOVERNMENTS CD-ROM version prepared by KERALA INSTITUTE OF LOCAL ADMINISTRATION Mulagunnathu kavu, Thrissur-680581

2. Singh, M. P., The Constitution of India, Delhi Law House, Delhi, 4thEdition 2015.

3. Bakshi, P. M., The Constitution of India, Universal Law Publishing Co. Pvt. Ltd., Delhi, 3rdEdition 1996.

4. Pandey, Dr. J. N., Constitutional Law of India, Central Law Publications, Allahabad, 49thEdition 2012.

5. Roy, M., The West Bengal Panchayat Act, 1973, TAX'N LAW, Kolkata, Edition 2011.

❊❊❊❊❊❊

munotes.in

# २

# लोकशाही विकेंद्रीकरण प्रक्रिया

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.३.१ लोकशाही विकेंद्रीकरणाचा अर्थ व व्याख्या

२.३.२ स्थानिक सक्षमीकरनासाठी शासकीय पातळीवरील पुढाकार / प्रयत्न : आरक्षण आणि सामाजिक लेखापरीक्षण

२.३.३ वित्तीय विकेंद्रीकरण

## २.१ उद्दिष्टे

**लोकशाही विकेंद्रीकरण प्रक्रिया** या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. लोकशाही विकेंद्रीकरण म्हणजे काय हे सांगता येईल.

२. लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया सांगता येईल.

३. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या संदर्भातील वेगवेगळ्या कार्यक्रमांची भूमिका आणि स्वरूप सांगता येईल.

## २.२ प्रास्ताविक

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने सार्वभौम लोकसत्ताक राज्यपद्धतीची स्थापना केली आहे. तसेच लोकशाही जीवन पद्धतीचा स्वीकार केला आहे. त्यानुसार प्रत्यक्ष निवडणुकीतून निवडून आलेल्या प्रतिनिधींचे लोकशाही सरकार केंद्राच्या व राज्याच्या ठिकाणी स्थापन होते. भारतीय राज्यघटनेच्या कलम-४० मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्थानिक शासन व्यवस्थेची निर्मिती करून घटक राज्यांना पुरेशी स्वायत्तता बहाल करण्यात येते. त्या आधारे भारतात तीनही शासन व्यवस्थेमध्ये सत्तेचे व अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आलेले आहे.

लोकशाही सुसंघटित व स्थिर स्वरूपाची निर्माण करण्याच्या दृष्टीने सत्तेचे विकेंद्रीकरण करणे हे तत्व स्विकारणे आवश्यक होते. स्वातंत्र्यपूर्व काळात केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी कायदा व सुव्यवस्था निर्माण करणे तसेच महसुलांच्या आधारे नागरिकांना आवश्यक तेवढ्याच सुखसोई उपलब्ध करून देणे व साम्राज्यशाही हितसंबंधाला धोका पोहोचणार

munotes.in

नाही, एवढाच मर्यादित आर्थिक विकास करणे, अशी मर्यादित भूमिका स्थानिक शासन संस्थांची होती.

स्वातंत्र्योत्तर काळात मात्र कायदा व सुव्यवस्थे बरोबरच आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाला प्राधान्य देऊन लोकांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने लोकांचे मूलभूत प्रश्न सोडविण्याची जबाबदारी केंद्र सरकार व राज्य सरकारवर येऊन पडली. पोलादांचे उत्पादन, वीज उत्पादन, मोठ्या यंत्रांचे उत्पादन, पाठबंधारे प्रकल्प, शास्त्रीय व तांत्रिक प्रगती, शेती व पाणी पुरवठ्याच्या योजना, राष्ट्रीय महामार्ग, जमिनीचे मोठ्या प्रमाणात संरक्षण, पशुपालन व दुग्धव्यवसाय तसेच आरोग्य विषयक सुविधा इत्यादी. मूलभूत प्रश्नांबाबत राष्ट्रीय कार्यक्रमानची आखणी करून त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्थानिक शासनव्यवस्थेवर सोपविण्यात आली. त्याचवेळी ग्रामीण जनतेकडून येणाऱ्या दबावामुळे सरकारला स्थानिक स्वरूपाच्या विविध विकास कार्यक्रमांची सुरुवात करावी लागली. एकंदरीतच अशा प्रकारच्या योजना व कार्यक्रम राबविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था या अगोदरपासूनच अस्तित्वात होत्या. परंतु पुरेसा पैसा, मनुष्यबळ व शिस्तबद्ध संघटना यांच्या अभावामुळे ही जबाबदारी पार पाडण्यास काहीअंशी या शासन संस्था असमर्थ ठरल्या आहेत.

परिणामतः मोठ्या सरकारी योजना व छोटे स्थानिक कार्यक्रम पार पाडण्यामध्ये सरकारची शक्ती विभागली गेली. त्याचा परिणाम असा झाला की, मोठ्या योजनांना त्याची गरज व आवश्यकता लक्षात घेता सहाजिकच अग्रस्थान मिळाले. त्यामुळे स्थानिक कार्यक्रमांकडे दुर्लक्ष करावे लागले. राष्ट्रांच्या दुर्गामी विकासाच्या दृष्टीने ही दुर्दैवी घटना होती, म्हणून स्थानिक कार्यक्रमाबाबतच्या जबाबदारीतून राज्य सरकारांनी मुक्त होणे, आवश्यक असून स्थानिक कामे लोकांच्या उपक्रमशीलतेवर आणि उपलब्ध साधनांवर सुटण्याची गरज आहे. असे झाले तर त्या योजना फक्त राज्य सरकारांनी हाती घेणे शक्य होईल. त्यावर लक्ष केंद्रित करता येईल. या विचारातून स्वतंत्र अशा शासनाकडे वेगवेगळ्या विकास योजना शोधून, त्या योजना पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविणे हे संयुक्तिक

ठरू शकेल. अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या अनुषंगाने लोकशाही विकेंद्रीकरणाचा विचार प्रभावीपणे राबविला गेला.

## २.३ विषय विवेचन

### २.३.१ लोकशाही विकेंद्रीकरणाचा अर्थ व व्याख्या :-

राज्यातील राज्यकारभाराबाबत निर्णयात्मक धोरण ठरविण्याची व ते अंमलात आणण्याची सत्ता एकाच ठिकाणी एकवटलेली असेल तर तेथे सत्तेचे केंद्रीकरण होते. पण येथे विकेंद्रीकरण हा शब्द व्यापक अर्थाने केंद्रीकरणाचा प्रतिशब्द म्हणून सर्वसाधारणपणे वापरला जातो. परंतु सामान्यतः सत्तेचेवरच्या थरांकडून खालच्या थरांकडे हस्तांतरण म्हणजे विकेंद्रीकरण असे मानले जाते.

**(१)** **पॉल मीर** या विचारवंताच्या मते, "विकेंद्रीकरण म्हणजे वरिष्ठ संस्थांचे अधिकार खालच्या थरातील संस्थांकडे सोपविणे अथवा स्थानिक वा विभागीय संस्थांना केंद्रीय सत्तेच्या मदतीशिवाय स्वतंत्रपणे स्वतःच्या योजना आखण्याचा अधिकार देणे होय."

अशी व्याख्या विकेंद्रीकरणाची केली आहे. या व्याख्येतून स्थानिक अथवा विभागीय संस्था स्वायत्त असाव्यात असा अर्थबोध होतो.

**(२)** **न्यूमन** या राज्यशास्त्रज्ञाच्या मते, "राजकीय निर्णय घेण्याचा अधिकार न देता स्थानिक संस्थांकडे अंमलबजावणीचे अधिकार सोपविले तरी देखील मर्यादित स्वरूपात का होईना ते सत्तेचे विकेंद्रीकरणच असते."

विकेंद्रीकरणातवरच्या क्षेत्रातील संस्थांची सत्ता व स्वायत्तता खालच्या थरातील क्षेत्रातल्या संस्थांकडे तीन प्रकारांनी हस्तांतरित होऊ शकते. राज्यकारभाराच्या विशिष्ट क्षेत्रातील कामाबाबत, स्थानिक क्षेत्रातील संस्थांना निर्णय घेण्याचे अधिकार देऊन, राजकीय सत्तेचे हस्तांतरण होऊ शकते. काही विशिष्ट क्षेत्रातील संबंधित अर्थव्यवहार व उपलब्ध साधने याबाबतचे अधिकार स्थानिक संस्थांकडे सोपवून राज्यसंस्थेच्या हातातील आर्थिक सत्ता मर्यादित स्वरूपात स्थानिक संस्थांकडे घ्यावयाची असते. आणि विविध प्रकारच्या स्थानिक योजना त्यांची अंमलबजावणी त्याबाबत देखरेख व मार्गदर्शन याबाबतचे प्रशासन विषयक अधिकार स्थानिक संस्थांकडे सोपवावयाचे आहेत. थोडक्यात, स्थानिक पातळीवर प्रशासन संस्था स्थापन करून त्यांना अधिकार देऊन मर्यादित स्वरूपात स्वायत्तता घ्यावयाची आहे. असे विकेंद्रीकरण लोकशाही विकेंद्रीकरण असेलच असे नाही. तर केंद्र सरकारला स्थानिक पातळीवर संस्था निर्माण करून त्यांचे कार्य चालविण्यासाठी काही व्यक्ती नियुक्त करून सत्तेचे अथवा कार्याचे विकेंद्रीकरण करता येईल. पण त्याला लोकशाही विकेंद्रीकरण असे म्हणता येणार नाही. कारण स्थानिक संस्था लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींची असेल तर येथे लोकशाही विकेंद्रीकरण अवलंबून असते. सत्तांतर व हस्तांतर केलेल्या सत्तेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार व स्वायत्तता यावर विकेंद्रीकरण अवलंबून असते. विकेंद्रीकरण म्हणजे विषम केंद्रीकरण नव्हे, तर विषम केंद्रीकरणात कनिष्ठ अथवा हाताखालच्या अधिकाऱ्याकडे एखाद्या विवक्षित कार्याची जबाबदारी उचलण्याबाबत केवळ प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार सोपविला जातो. पण तो संपूर्णपणे हस्तांतरित केला जात नाही. त्या ठिकाणी स्वायत्ततेचा प्रश्नच उद्भवत नाही. म्हणून विषम केंद्रीकरण हे विकेंद्रीकरण नव्हे, तर कार्यक्षमतेच्या आणि उपयुक्ततेच्या दृष्टीने प्रतिनिधीकरणाची पद्धती स्वीकारली जाते.

**(३)** **मेरी फॉलेट** यांनी "प्रतिनिधीकरण आणि विकेंद्रीकरण यातील फरक स्पष्ट करताना प्रतिनिधीकरनाच्या कल्पनेत सर्वश्रेष्ठ व्यक्तीकडे सर्व सत्ता केंद्रित असते. परंतु कार्यक्षमतेच्या दृष्टीने तो आपले काही अधिकार कनिष्ठाकडे सुपूर्त करतो. या उलट विकेंद्रीत लोकशाहीमध्ये काही तत्त्वावर सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचा प्रयत्न असतो. लोकांकडे अधिकाधिक अधिकार सोपविले जातात व लोकराज्याचे तत्व प्रत्यक्षात उतरविले जाते. स्थानिक लोकात स्वतःची कामे स्वतःच्या जबाबदारीवर पार पाडण्याची कार्यक्षमता निर्माण व्हावी हा त्यामागील प्रमुख उद्देश असतो. "साम्यवादी देशात साम्यवाद्यांच्या म्हणण्याप्रमाणे "जनतेची लोकशाही" असते. अंतर्गत संबंध दृढ स्वरूपाचे राहून, स्थानिक स्वायत्तता आणि राष्ट्रीय एकके साधण्याच्या विकेंद्रीकरणाचे तत्व अनुसरले जाते. हे तत्व लोकशाही विकेंद्रीकरणाहून अगदी भिन्न आहे.

**(४)** **व्हिशिंस्की** यांनी या तत्त्वाचे प्रतिपादन केले आहे की, या पद्धतीत मूलभूत विकासाच्या प्रश्नांबाबत आणि संबंध राष्ट्रव्यापी आर्थिक रचना निर्माण करण्याबाबत विचार करण्याचे काम अर्थातच, केंद्रीय सत्ताधारी संस्थांकडे असेल. अर्थोत्पादनाच्या कामात मार्गदर्शन आणि अर्थ उत्पादनाच्या साधनांच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण या पद्धतीत गृहीत असते. राष्ट्रीय योजना यशस्वी करण्यासाठी आणि देशाची आर्थिक व सांस्कृतिक इमारत उभारण्यासाठी भिन्न-भिन्न भाषिक व भिन्न-भिन्न जीवन पद्धती अंगीकारित असलेल्या स्थानिक लोकांचा उत्साह व अभिक्रमशीलता व स्वायत्तता आवश्यक असते. लोकशाही केंद्रीकरण पुढील तत्वावर आधारित असते. मार्गदर्शन करणाऱ्या सर्व संस्था वरील पातळीपासून खालच्या पातळीपर्यंत निवडलेले असतील. संस्था आपल्या कार्याचे हिशोब व अहवाल पक्ष संघटनेकडे वेळोवेळी सादर करतील.

अल्पसंख्यांक हे बहुसंख्यांकाच्या वर्चस्वाखाली काम करतील वरिष्ठ संस्थांकडून दिले गेलेले निर्णय खालच्या संस्था पातळीवर व सभासदांवर बंधनकारक असतील. लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये विकेंद्रीकरण हे तत्व लोकशाहीच्या आधाराने राबविले जाते. विकेंद्रीकरणामुळे निरनिराळ्या पातळीवर निर्णय घेण्याची व त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची सत्ता प्राप्त होत असते. अशा सत्तेचा वापर करणारे सर्व पदाधिकारी लोकशाही मार्गानेच सत्तेवर आलेले असतात. लोकशाही तत्त्वानुसारच आपआपल्या कार्यक्षेत्रात सत्ता व अधिकारांचा वापर त्यांना करावा लागतो. हा खरा लोकशाही विकेंद्रीकरणाचा अर्थ आहे. प्रशासकीय सुसूत्रतेसाठी प्रशासकीय यंत्रणेमध्ये सर्वच स्तरातील लोकांचा सहभाग असणे हे लोकशाहीसाठी तसेच राष्ट्रीय हितासाठी आवश्यक असते. त्यातूनच लोकशाही विकेंद्रीकरणाला स्वतंत्र असा अर्थ प्राप्त झाला आहे.

देशाच्या किंवा घटक राज्याच्या राजधानीतून राज्यकारभाराबाबत व प्रशासनाबाबत सर्व निर्णय घेतले जात असतील तर अशी व्यवस्था केंद्रात्मक असते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास ज्या शासन व्यवस्थेत शासक वर्गाच्या हाती सत्ता म्हणजे निर्णय घेण्याचे अधिकार एकवटलेले असतात त्या ठिकाणी सत्तेचे केंद्रीकरण झालेले असते. सोप्या शब्दात असे म्हणता येईल की, ज्या शासन व्यवस्थेत एका व्यक्तींचा अथवा व्यक्तिगटांच्या हाती सत्ता एकवटलेली असते, त्यास केंद्रीकरण असे म्हणता येईल. या उलट निर्णय घेण्याचे सत्ता व अधिकार एका व्यक्ती पेक्षा ती सत्ता अनेक व्यक्ती किंवा व्यक्ती समूहाकडे असते. त्यास विकेंद्रीकरण असे म्हणता येईल. प्रत्येक स्तरावर निर्णय घेण्याची सत्ता व अधिकार तेथील अधिकाऱ्यांना दिलेले असतात. शासन व्यवस्थेच्या प्रत्येक पातळीवरच सत्ता व अधिकाराच्या बाबतीत स्वातंत्र्य असणे व त्यातूनच निर्णय घेणे व निर्णयाची अंमलबजावणी करणे यालाच लोकशाहीतील सत्तेचे विकेंद्रीकरण असे म्हटले जाते.

### लोकशाही विकेंद्रीकरणाचे स्वरूप :-

लोकशाहीमध्ये विकेंद्रीकरणाच्या कल्पनेला एक स्वतंत्र असे महत्त्व प्राप्त झाले आहे. सत्ताविकेंद्रीकरण हे लोकशाहीतील तत्त्व मानले जाते. साम्यवादी देशात सत्तेचे राजकीय सोयीसाठी प्रांत किंवा विभाग पाडलेले असतात. पण सत्तेचे विकेंद्रीकरण केलेले नसल्यामुळे साम्यवादी देशात सत्तेचे लोकशाही विकेंद्रीकरण आढळत नाही. रशियात केवळ प्रशासकीय सोयीसाठी अशी रचना असते. अधिकारी हे निवडून दिलेले नसतात. म्हणून ते अधिकारी

लोकांना जबाबदार नसतात. इंग्लंडमध्ये स्थानिक संस्था आहेत. परंतु सत्ता व अधिकारांच्या बाबतीत संपूर्ण सत्ता व अधिकारांचे केंद्रीकरण हे केंद्र सरकारकडे झालेले आहे. इंग्लंडने एकात्म शासन व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. लोकशाहीमध्ये विकेंद्रीकरण या तत्वाला एक स्वतंत्र असा सामाजिक, आर्थिक, व राजकीय असा अर्थ प्राप्त होतो. वेगवेगळ्या स्तरावर शासन व्यवस्था निर्माण केलेली असते, या विविध स्तरांवर स्वतंत्र शासन अधिकारी असून त्यांच्या हाती स्वतंत्र अधिकार व सत्ता असतात. या अर्थाने लोकशाही स्थानिक स्वराज्य शासन संस्था स्वतंत्रपणे काम करीत असतात. त्यातूनच त्यांना स्वायत्तता प्राप्त होत असते. ही शासन व्यवस्था लोकांनी निवडलेली असते. स्थानिक पातळीवर स्थानिक लोकांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य हे शासनाचे अधिकारी करीत असतात. स्थानिक लोकांना शासन व्यवस्थेच्या कार्याबद्दल आत्मीयता वाटत असते. त्यामुळे प्रत्यक्षात अशा शासन व्यवस्थेच्या ठिकाणी लोकशाही विकेंद्रीकरण हे तत्व नक्कीच आढळत असते.

**भारतातील लोकशाही विकेंद्रीकरण प्रक्रिया:-**

भारतामध्ये खऱ्या अर्थाने सत्तेचे विकेंद्रीकरण या तत्त्वाला स्वातंत्र्यानंतर सुरुवात झाली. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने अधिकृतपणे लिखित राज्यघटनेचा स्वीकार केला. भारताच्या

राज्यघटनेचने विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाला कायदेशीर मान्यता दिली आहे. राज्यघटनेमध्ये केंद्र सरकार व घटक राज्य सरकार यांच्याकडे स्वतंत्र विषयानुसार सत्ता व अधिकार यांचे वाटप केलेले आहे. भारतीय राज्यघटनेच्या सातव्या परिशिष्टांमध्ये स्वतंत्र अशा विषयांच्या तीन याद्या दिलेल्या आहेत. म्हणून खऱ्या अर्थाने भारतात कायदेशीर दृष्टीने लोकशाही पद्धतीने सत्तेचे विकेंद्रीकरण झालेले आहे. **प्रा. एल. डी. व्हाईट** यांच्या मतानुसार, "निवडणुकीच्या माध्यमातून स्थापन झालेले जे सरकार असते, ते सरकार वेगवेगळ्या पातळीवर स्वतंत्रपणे प्राप्त झालेल्या सत्ता व अधिकारातून कार्य करत असते. शासन अधिकाऱ्यांप्रमाणे प्रशासकीय अधिकाऱ्यांना देखील स्वतंत्रपणे स्वतः अधिकार प्राप्त होत असतात. अशा स्थितीला लोकशाही विकेंद्रीकरण असे म्हटले जाते." भारतात (१) केंद्र सूची (२) राज्य सूची आणि (३) समवर्ती सूची अशा तीन भागांमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी वेगवेगळ्या विषयांचे अधिकार क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. भारताने लोकशाही पद्धतीने सत्ताविकेंद्रीकरणाची संकल्पना स्वीकारलेली आहे. सत्ता व अधिकाराचा प्रत्यक्षरीत्या वापर करीत असताना गाव, खेडे, तालुका, जिल्हा, नगरपालिका व महानगरपालिका अशा सर्व स्तरावर त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या स्थानिक जनतेला या प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेतले आहे. स्थानिक शासन व्यवस्था हा राज्य शासनाच्या अधिकारातील एक प्रमुख विषय आहे. स्थानिक शासन व्यवस्थेला सत्ता व अधिकार दिलेले असतात, तसेच हे सत्ता व अधिकार काढूनही घेतले जाऊ शकतात. स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये केवळ लोकशाही शासनपद्धतीलाच सुरुवात झाली नाही, तर खऱ्या अर्थाने लोकशाही जीवन पद्धतीला देखील सुरुवात झालेली आहे. अशा व्यापक अर्थाने लोकशाहीमध्ये सत्ता व अधिकारांचे विकेंद्रीकरण झालेले दिसून येते.

**लोकशाही विकेंद्रीकरणाच्या विविध समित्या :-**

स्वातंत्र्यानंतर स्थानिक शासन संस्थांना स्वशासनाचा दर्जा कशा पद्धतीने प्राप्त करून देता येईल. याचा अनेक वेगवेगळ्या अंगांनी विचार करण्यात आला आहे. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्येच याबाबत राज्यसंस्थेला अधिकार देण्यात आले आहेत. ग्रामपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा परिषद किंवा जिल्हा बोर्ड अशा शासन व्यवस्थेच्या सत्ता व अधिकारामध्ये वाढ करून विकासाच्या दृष्टीने त्यांच्यावर कोणत्या जबाबदाऱ्या टाकता येतील, याच्या सर्वांगीण अभ्यासाच्या दृष्टीने स्वातंत्र्यानंतर केंद्र सरकारने अनेक महत्त्वाच्या समित्या नेमलेल्या आहेत. सत्ता विकेंद्रीकरण या तत्वाशी बांधिलकी मानूनच या समित्यांनी आपला अहवाल निष्पृहपणे शासनाला सादर केलेला आहे. त्यांनी वेळोवेळी ज्या महत्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत. त्या शिफारशींची अंमलबजावणी देखील आवश्यकतेप्रमाणे करण्यात आली आहे.

**१.३.२ (अ) स्थानिक सक्षमीकरनासाठी शासकीय पातळीवरील पुढाकार / प्रयत्न : आरक्षण आणि सामाजिक लेखापरीक्षण (Government Initiative to Empower Local: Reservation & Social Audit)**

**सामुदायिक विकास कार्यक्रम** १९५२ **(Community Development Programme-CDP**)

भारतातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासकीय पातळीवरील पहिला प्रयत्न म्हणजे १८८२ चा लॉर्ड रिपन यांचा स्थानिक स्वराज्य संस्थेचा ठराव होय. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात वैयक्तिक पातळीवर राबविले गेलेले काही कार्यक्रम योजना या भाविकाळातील सामुदायिक विकास कार्यक्रमाचा पाया मानला जातो. महात्मा गांधींनी खरा भारत हा खेड्यात आहे. खेड्याकडे चला हा संदेश त्यांनी दिला. त्यामुळे गांधी जयंतीच्या निमित्ताने २ ऑक्टोबर १९५२ रोजी सामुदायिक विकास कार्यक्रम राबविण्याचे ठरले. यापूर्वी इंग्रज कालीन राजवटीत भारतातील ग्रामीण भागातील पारंपारिक उद्योगधंदे बुडाल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडलेली होती. याचे वर्णन अर्थतज्ञ दादाभाई नौरोजी यांनी आपल्या 'पॉवर्टी अँड अन ब्रिटिश रुल इन इंडिया' या ग्रंथात केले आहे.

**सामुदायिक विकासाचा अर्थ व व्याख्या:-**

**(१) संयुक्त राष्ट्र संघ (UNO):** “स्थानिक समाजाचे आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक स्थिती सुधारण्यासाठी आणि राष्ट्रीय प्रगतीला त्यांनी पूर्णतः हातभार लावावा, म्हणून ज्या प्रक्रियेद्वारे जनतेच्याच प्रयत्नांची शासकीय प्राधिकरणांच्या प्रयत्नांशी सांगड घातली जाते, त्यास सामुदायिक विकास असे म्हणतात”.

**(२) नियोजन आयोग :-** “सामुदायिक विकास हे राष्ट्रीय प्रसाराचे असे साधन आहे की, ज्याच्या माध्यमातून पंचवार्षिक योजना गावातील सामाजिक किंवा आर्थिक जीवनात परिवर्तन आणू पहात आहे.”

**(३) कार्ल टेलर** यांच्या **मते:-** “स्थानिक जनतेची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी त्या जनतेने प्रवृत्त होण्याची प्रक्रिया म्हणजे सामूहिक विकास होय.”

(४) **डेव्हिड पॉटर** यांच्या मते:- "सामूहिक विकास योजना म्हणजे ग्रामीण समुदायाने स्वयंस्फूर्तीने स्वतःला मदत करणे होय."

**सामुदायिक विकास कार्यक्रमाची उद्दिष्टे:-**

भारतात सामाजिक दृष्टिकोनातून निरक्षरता, लोकसंख्या वाढ, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, प्रथा, जात, धर्म, वंश व भाषा इत्यादी. अनेक समस्यांनी समाजव्यवस्था पूर्णतः पोखरली होती. या समाजाचा राष्ट्रीय राजकारणात कोणताही सहभाग नव्हता. या पार्श्वभूमीवर संपूर्ण ग्रामीण समुदायात जागृती घडवून आणणे शासनाचे आद्य कर्तव्य आहे. म्हणूनच सामुदायिक विकास कार्यक्रम हा व्यापक व मोठी वित्तीय तरतूद असलेला कार्यक्रम याच उद्देशाने भारतात सुरू करण्यात आला. यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय पातळीपासून ग्राम पातळीपर्यंत सुव्यवस्थित संघटन निर्माण केले होते.

**बलवंतराय मेहता समिती (१९५७)**

सामूहिक विकास कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्याच्यादृष्टीने आणि स्थानिक शासन व्यवस्थेच्या कार्यपद्धतीमध्ये निश्चितपणे काही सुधारणा घडाव्यात या उद्देशाने गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन मंडळाच्या प्रकल्प समितीने बलवंतराय मेहता समितीची स्थापना केली. लोकशाही या तत्त्वाला धरूनच स्थानिक शासन व्यवस्थेबाबत या समितीने अभ्यास करून आपला अहवाल शासनाला सादर करावा अशी योजना या पाठीमागे होती. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लोकशाही विकेंद्रीकरण या संकल्पनेचे पंचायतीराज असे नामकरण केलेले होते बलवंत राय मेहता यांच्या बरोबरीनेच बी.जी. राव व डी.पी. सिंग असे इतर सदस्य य समितीमध्ये होते. बलवंतराय मेहता समिती समोर नियोजन मंडळाच्या प्रकल्प समितीने महत्त्वाचे उद्देश स्पष्ट केलेले होते.

**मेहता समितीचे उद्देश :-**

(१) सामूहिक विकास कार्यक्रम व राष्ट्रीय विस्तार योजना यांच्यामार्फत खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास घडला गेला आहे किंवा नाही याचा अभ्यास करणे.

(२) ग्रामीण विकासाच्यादृष्टीने कृषी उत्पादन वाढविण्यासाठी कोणते कार्यक्रम हाती घेता येतील याची पाहणी करणे.

(३) ग्रामीण विकास कार्याचा वेग वाढविण्याच्यादृष्टीने निश्चितपणे कोणती कार्यपद्धती वापरण्यात येईल, स्थानिक शासनावर यातून कोणत्या जबाबदाऱ्या टाकता येतील याचा अभ्यास करणे.

(४) शासनाचा वेगवेगळ्या विकास योजना, ग्रामीण भागात किती प्रमाणात यशस्वी झालेल्या आहेत तसेच अशा योजना ग्रामीण विकासाला उपकारक ठरविण्याच्यादृष्टीने योग्य त्या उपाययोजना सुचविणे.

(५) शासकीय विकास योजनांच्या कार्यक्रमांमध्ये शासकीय नोकर वर्गाचे अधिकार कोणते असावेत, त्यांना प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने योग्य त्या शिफारशी करणे.

(६) शासकीय विकास योजनांच्या बाबतीत खर्चामध्ये काटकसर करणे, तसेच अशा विकास योजना कार्यक्षम ठेवण्यासाठी कोणत्या यंत्रणा निर्माण करता येतील यांचा अहवाल तयार करणे.

(७) जिल्हा, तालुका, व ग्रामपंचायत अशा शासकीय स्तरावर सत्तेचे विकेंद्रीकरण कसे करता येईल, याबाबत योग्य त्या उपाययोजना करणे.

वरील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून मेहता समितीने काही शिफारशी केल्या आहेत.

**मेहता समितीने केलेल्या प्रमुख शिफारशी:-**

बलवंतराय मेहता समितीने १२ जानेवारी १९५८ साली आपला अहवाल नियोजन मंडळाला म्हणजेच, पंचवार्षिक योजना समितीला सादर केला. केंद्र सरकार व पंचवार्षिक योजना समिती यांनी बलवंतराय मेहता कमिटीने ज्या शिफारशी केलेल्या होत्या त्या शिफारशींचा कायदेशीरदृष्ट्या योग्य तो विचार करून स्वीकार केला. यातील प्रमुख शिफारशींचा उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल.

**(१) त्रिस्तरीय ग्रामीण शासन व्यवस्था :-**

मेहता समितीने आर्थिक, राजकीय, व सामाजिक विकासाच्या दृष्टीने सत्ता व अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्यासाठी स्वतंत्रपणे शहरी शासनाप्रमाणेच ग्रामीण शासन व्यवस्था निर्माण करावी व त्यादृष्टीने शासनाची रचना ही त्रिस्तरीय असावी, असे सुचविले. शासनाने मेहता कमिटीची ही शिफारस मान्य केली. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी सत्ता व अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने संपूर्ण जिल्ह्यासाठी जिल्हा परिषद, प्रत्येक तालुक्यासाठी तालुका पंचायत व खेड्यांसाठी ग्रामपंचायत असे तीन स्वतंत्र स्तर ग्रामीण व्यवस्थेसाठी स्वीकारले आहेत.

**(२) लोकशाही विकेंद्रीकरणासाठी स्वतंत्र छोटे स्तर:-**

लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने या शासन व्यवस्थेमध्ये लोकांचा अधिक-अधिक सहभाग शासनाच्या प्रत्येक स्तरांमध्ये झाला पाहिजे, त्यादृष्टीने काम करणाऱ्या स्तरांवर व संस्थावर विकासाची जबाबदारी सोपवली पाहिजे, असे सांगण्यात आले. शासनाने ही शिफारस मान्य केली.

**(३) ग्रामपंचायत सदस्यांची अप्रत्यक्ष निवड :-**

ग्रामीण विकासाच्या दृष्टीने जिल्हा परिषद, तालुका पंचायत व ग्रामपंचायत असे तीन स्वतंत्र स्तर निर्माण करावे, या स्वतंत्र शासनामार्फत वेगवेगळ्या विकास योजना राबवाव्यात तसेच, या शासन व्यवस्थेमध्ये काम करणाऱ्या सदस्यांची निवड अप्रत्यक्षरीत्या करावी. अशी शिफारस मेहता समितीने केली. ही शिफारशी शासनाने स्वीकारली आहेत.

munotes.in

**(४) अंदाजपत्रकांची तपासणी:-**

स्थानिक शासन व्यवस्थेवर विकासाच्या दृष्टीने काही जबाबदाऱ्या टाकण्यात आल्या होत्या. त्यासाठी आर्थिक सत्ता देत असताना आर्थिक नियंत्रण करणे आवश्यक आहे. यासाठी अंदाजपत्रकाची तपासणी करण्यात यावी. अशी शिफारस मेहता कमिटीने केली होती. त्यानुसार ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक मंजूर करण्याचा अथवा तपासणीचा अधिकार हा तालुका पंचायतीला देण्यात आला. तर तालुका पंचायतीचे अंदाजपत्रक मंजूर करण्याचा व तपासण्याचा अधिकार जिल्हा परिषदेला देण्यात आला. शासनाने मेहता समितीची ही शिफारस देखील स्वीकारली.

**(५) जिल्हा बोर्ड रद्द केले :-**

पूर्वी जिल्हा पातळीवर असणारे जिल्हा बोर्ड रद्द करून नवीन जिल्हा परिषदेची स्थापना करावी. तसेच, तालुका पंचायत व ग्रामपंचायतीची जबाबदारी जिल्हा परिषदेवर सोपवावी. शासनाने ही शिफारस मान्य केली. जिल्हा बोर्ड रद्द करून जिल्हा पातळीवर स्वतंत्रपणे जिल्हा परिषद निर्माण करण्यात आली आणि तालुका पंचायत व ग्रामपंचायत यांच्याही जबाबदाऱ्या जिल्हा परिषदेवर टाकण्यात आल्या.

**(६) जिल्हा परिषदेत विविध घटकांना प्रतिनिधित्व :-**

जिल्हा परिषदेमध्ये सर्व पंचायतीचे सभापती, स्थानिक आमदार, व खासदार यांना प्रतिनिधित्व असावे. तसेच शासकीय अधिकाऱ्यांनाही प्रतिनिधित्व असावे. जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद अध्यक्ष पद स्वतंत्र असावे. शासनाने मेहता समितीच्या शिफारशींचा विचार करून जिल्ह्याच्या क्षेत्रातील आमदार, खासदार आणि पंचायत समितीचे सभापती यांना जिल्हा परिषदेवर प्रतिनिधित्व दिले आहे. तर सहकार, शिक्षण, आरोग्य, समाज कल्याण, व कृषी या क्षेत्रातील तज्ञांना देखील प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. तसेच जिल्हा परिषदेत स्वतंत्रपणे मुख्य कार्यकारी अधिकारयाची नियुक्ती केलेली आहे.

**(७) अनुदानाची पाहणी :-**

स्थानिक विकासाच्या दृष्टीने त्या-त्या क्षेत्रातील महसूल उत्पन्नाच्या ७५ % इतकी रक्कम स्थानिक शासनाला द्यावी. तसेच विकास योजनेसाठी योग्य त्या अनुदानाचे वाटप व्हावे. मेहता समितीची ही शिफारस शासनाने स्वीकारली. त्यानुसार शासकीय अनुदानाची वाटणी जिल्हा परिषदेकडून पंचायत समिती व ग्रामपंचायत अशी करण्यात आली. महसुलाचे वाटप देखील निश्चित केलेले आहे. सोबतच शासकीय अनुदानाचे प्रमाणही निश्चित करण्यात आलेले आहे.

**(८) ग्रामपंचायतीची न्यायदान प्रक्रिया व भूमिका :-**

जिल्हा मॅजिस्ट्रेट सारख्या उच्चपदस्थ व्यक्तींची न्यायपंचायत स्थापन करावी. काही खेड्यांपुरते हे कोर्ट मर्यादित असावे. अशी शिफारस न्यायदानाच्या दृष्टीने मेहता समितीने केली. शासनाने मात्र ही शिफारस स्वीकारली नाही. शासनाने

न्यायदानासाठी जिल्हा पातळीवर आणि तालुका पातळीवर स्वतंत्र न्यायदानाची व्यवस्था केली आहे. कायदेशीर दृष्टीने शासनाने न्यायदान व्यवस्थेला महत्त्व दिलेले आहे.

बलवंतराय मेहता समितीने केलेल्या शिफारशी तसेच राष्ट्रीय विकास परिषद, स्थानिक शासन परिषद आणि केंद्र सरकार या सर्वांनी स्वीकारल्या आहेत. त्यानुसार घटक राज्यांनी पंचायतराज व्यवस्था स्थापन करावी. असे सुचित करण्यात आले. सर्वप्रथम भारतामध्ये २ ऑक्टोबर १९५८ साली राजस्थान आणि १ नोव्हेंबर १९५८ साली आंध्रप्रदेश या राज्यांनी मेहता समितीच्या शिफारशीनुसार पंचायत राज्यांची स्थापना केली.

द्विभाषिक राज्याच्या संकल्पनेमुळे मुंबई राज्यात १ मे १९६० साली मुंबई सहित स्वतंत्र महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर तत्कालीन महसूल मंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली मेहता समितीच्या शिफारशीचा अभ्यास करण्यासाठी एक अभ्यास समिती नेमली गेली होती.

**वसंतराव नाईक समिती (१९६०)**

या समितीला महाराष्ट्रातील लोकशाही विकेंद्रीकरण समिती म्हणून ओळखले जाते. राष्ट्रीय स्तरावरील बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनंतर त्यावर पुनर्विचार करण्यासाठी व राज्यात स्थानिक स्वशासनाचे प्रारूप सुचविण्यासाठी गुजरातमध्ये श्री. रसिकलाल पारिक व महाराष्ट्रात श्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली ही अभ्यास समिती गठित करण्यात आली. भाषावार प्रांतरचनेनुसार १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्रात तत्कालीन महसूलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही विकेंद्रीकरण समिती २२ जून १९६० रोजी नियुक्त करण्यात आली. या समितीने आपला अहवाल १५ मार्च १९६१ रोजी महाराष्ट्र शासनाकडे सादर केला. या समितीने आपल्या अहवालात एकूण २२६ शिफारशी केल्या होत्या. या समितीला आपला अहवाल तयार करण्यासाठी तीन महिन्यांचा अवधी देण्यात आला. या समितीचा अहवाल महाराष्ट्राच्या सहकार व ग्रामीण विकास विभागाने लोकशाही विकेंद्रीकरण समितीचा अहवाल या शिर्षकाखाली प्रसिद्ध केला होता. या अहवालाला अनुसरून महाराष्ट्रात नवीन पंचायतराजची स्थापना करण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ संमत करण्यात आला. या अधिनियमाची अंमलबजावणी महाराष्ट्र दिनि पासून म्हणजेच, १ मे १९६२ पासून करण्यात आली. या समितीच्या महत्त्वपूर्ण शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

**(१) जिल्हा हा ग्रामीण व्यवस्थेचा प्रमुख घटक असावा :-**

जिल्हा पातळीवर स्वतंत्रपणे स्थानिक शासन व्यवस्थेची निर्मिती करावी. त्या शासनाला जिल्हा परिषद असे नाव द्यावे. जिल्ह्याच्या विकासासाठी आवश्यक ती साधनसामुग्री व प्रशासक वर्ग शासन व्यवस्थेने निर्माण करावा. जिल्हा परिषद जिल्हा पातळीवरील शक्तिमान कार्यकारी अशी संस्था बनावी. या दृष्टीने राज्य शासनाने प्रयत्न करावेत. महाराष्ट्र शासनाने या समितीची ही शिफारस मान्य करून प्रत्येक

जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्रपणे जिल्हा परिषदांची निर्मिती केली आहे. जिल्हा परिषदेची पदाधिकारी व प्रशासकीय यंत्रणा स्वतंत्रपणे निर्माण केलेली आहे.

**(२) जिल्हा परिषदेसाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची तरतूद :-**

पंचायत राज्याची प्रशासकीय व्यवस्था जिल्हा परिषदेकडे सोपवून प्रशासकीय सुसूत्रता निर्माण होण्यासाठी स्वतंत्रपणे जिल्हा परिषदेमध्ये मुख्य अधिकाऱ्याची नेमणूक करावी. महाराष्ट्र शासनाने नाईक समितीने केलेली ही शिफारस स्वीकारली आणि जिल्हा परिषदेमध्ये स्वतंत्रपणे मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद निर्माण करण्यात आले. आय.ए.एस. परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवाराची या पदावर नियुक्ती केली जाते. यामुळेच प्रशासकीय नियंत्रण निर्माण होते.

**(३) प्रत्यक्ष निवडणूक पद्धत :-**

पंचायत राज्यातील निवडणुका प्रत्यक्षरीत्या जनतेमार्फतच घेतल्या जाव्यात. अशी शिफारस या समितीने केली होती. ही शिफारस शासनाने मान्य करून त्यानुसार जिल्हा परिषद,  पंचायत समिती व ग्रामपंचायत अशी रचना करण्यात आली. शासन व्यवस्थेतील बहुसंख्य सभासदांची निवड आजही प्रत्यक्षरीत्या जनतेकडूनच केली जाते.

**(४) स्त्रियांना प्रतिनिधित्व :-**

या समितीने शासन व्यवस्थेमध्ये एकही स्त्री प्रतिनिधित्व म्हणून आली नसेल, तर एक स्त्री सहयोगी सदस्य म्हणून नियुक्त करावी, अशी शिफारस केली. महाराष्ट्र शासनाने ही शिफारस मान्य केली आणि जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या ग्रामीण शासन व्यवस्थेमध्ये आणि महापालिका व नगरपालिका या शहरी शासन व्यवस्थेमध्ये देखील स्त्रियांना सदस्यत्व दिलेले आहे. तसेच पुढील काळात ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार महिलांसाठी ३३ % राखीव जागांची तरतूद करण्यात आली. आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काही राज्यात महिलांना ५० टक्के प्रतिनिधित्व दिले आहे.

**(५) अनुसूचित जाती-जमातींना प्रतिनिधित्व :-**

त्रिस्तरीय शासन व्यवस्थेमध्ये अनुसूचित जाती-जमातीसाठी राखीव जागा असाव्यात. जर असे सदस्य निवडून आले नाहीत, तर शासन व्यवस्थेत सहयोगी सभासद म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात यावी. ७३ व्या घटनादुरुस्तीने महाराष्ट्र शासनाने लोकसंख्येच्या प्रमाणानुसार जिल्हा परिषद, ग्रामपंचायत आणि पंचायत समिती तसेच महापालिका, व नगरपालिका अशा सर्वच शासन व्यवस्थेमध्ये अनुसूचित जाती-जमातींना प्रतिनिधित्व दिलेले आहे. मंडळ आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांसाठी देखील राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे.

**(६) स्थानिक नेतृत्व निर्मितीस संधी :-**

या शासन व्यवस्थेतील सत्ता व अधिकार पदे स्थानिक कार्यकर्त्यांच्या हाती असावीत. तसेच त्यांच्या अधिकारांचे रक्षणही केले जावे. नाईक समितीने केलेली ही शिफारस शासनाने मान्य केली. आणि खऱ्या अर्थाने स्थानिक नेतृत्वाला सत्ता व अधिकार देऊन काम करण्याची संधी निर्माण करून दिली. तसेच अशा अधिकाराना कायदेशीर दृष्टीने संरक्षणही दिले गेले आहे.

**(७) विकासाबाबत स्थानिक पदाधिकाऱ्यांवर जबाबदारी :-**

ग्रामीण शासन व्यवस्थेत विशेषतः ग्रामपंचायत क्षेत्रबाबत सरपंच व इतर सदस्य यांना स्थानिक विकासाबाबत जबाबदार धरण्यात यावे, अशी शिफारस या समितीने केली होती. महाराष्ट्र शासनाने ही शिफारस मान्य करून, ग्रामीण विकासाला सुरुवात याच पातळीपासून होत असते, म्हणून सरपंच व इतर सदस्यांना विकासाच्या बाबतीत शासनाने अधिकार दिल्यामुळे नैतिकदृष्ट्या त्यांनाच विकास कार्याच्या बाबतीत जबाबदार धरण्यात येते. त्याबाबतीत शासन कार्याचा अहवाल ही मागवीत असते.

**(८) विभागीय आयुक्तांचे प्रशासकीय नियंत्रण :-**

वसंतराव नाईक समितीची ही शिफारस महाराष्ट्र शासनाने पूर्णतः स्वीकारली आहे. शहरी तसेच ग्रामीण स्थानिक शासन व्यवस्थेवर प्रशासकीय दृष्टीने पूर्णतः नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने हा अधिकार विभागीय आयुक्तांना दिलेला आहे. शासनाचा प्रतिनिधी म्हणून विभागीय आयुक्त या शासन व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पार पाडत आहे.

वरील प्रमाणे नाईक समितीने केलेल्या शिफारसी तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या सरकारने स्वीकारल्या. आणि १९६१ साली महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाने महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम बहुमताने पास केला. व त्यातूनच महाराष्ट्रामध्ये १ मे १९६२ पासून पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली.

**ल. न. बोंगीरवार समिती १९७०**

बोंगीरवार समितीस महाराष्ट्रातील पंचायतराज पुनर्विलोकन समिती असे देखील संबोधले जाते. वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीनंतर महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली. महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्थेच्या अंमलबजावणीतील त्रुटी शोधण्यासाठी व त्यावरील उपाय योजनांच्या शिफारसीसाठी महाराष्ट्र शासनाने २६ फेब्रुवारी १९७० रोजी एका मूल्यमापन समितीचे गठन करावयाचे ठरविले. या ठरावाला मूर्त रूप देण्यासाठी २ एप्रिल १९७० रोजी श्री. एल. एन. बोंगीरवार यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्य समितीची स्थापना करण्यात आली. या समितीचे सदस्य सचिव म्हणून श्री. व. व. मंडलेकर हे होते. या समितीने महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्थेचे व मागील दहा

munotes.in

वर्षाच्या अनुभवाचे सखोल चिंतन केले. या अध्ययानात त्यांना असे आढळून आले की, प्रचलित पंचायतराज व्यवस्थेत अमुलाग्र परिवर्तनाची आवश्यकता नाही. मात्र काही सुधारणातून पंचायतराजचे कार्य आणखी प्रभावी करता येऊ शकेल. या समितीने आपला एकूण २०२ शिफारशी असलेला अहवाल १५ सप्टेंबर १९७१ रोजी महाराष्ट्र शासनास सादर केला. या अहवालात त्यांनी स्पष्टपणे असे सांगितले की, पंचायतराज व्यवस्थेत फारसे दोष नसून त्यांच्या केवळ अंमलबजावणीतच दोष शिरलेले आहेत. बोंगीरवार समितीने पुढील प्रमाणे महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत.

(१) **जिल्हा परिषद संदर्भातील शिफारशी :-**

जिल्हा परिषदेत पशुसंवर्धन व दुग्ध विकास ही नवीन विषय समिती स्थापन करावी. तसेच जिल्हा परिषदेच्या विषय सूचीतून सहकार हा विषय पूर्णतः वगळून ती जबाबदारी राज्य शासनाकडे वर्ग करावी. आश्रमशाळा जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करून त्यांचा शंभर टक्के खर्च राज्य शासनाने उचलावा. शिक्षण समितीस अधिक स्वायत्तता द्यावी. विषय समित्यांवरील तज्ञ व्यक्तींसाठी शैक्षणिक व अनुभवाची आहर्ता असली पाहिजे.

**(२) पंचायत समिती संदर्भातील शिफारशी :-**

पंचायत समितीची वर्गवारी अ, ब, क, अशी करावी. तसेच या समितीत सरपंच परिषदेची स्थापना केली जावी.या परिषदेमध्ये १५ सरपंचांची फेरपालट करून रोटेशन पद्धतीने निवड केली जावी. जिल्हा परिषदेच्या एका मतदारसंघाचे दोन गट तयार करून प्रत्येक गटातून एका सदस्याची निवड पंचायत समितीवर करावी.

**(३) ग्रामपंचायती संदर्भातील शिफारशी :-**

ग्रामपंचायतीच्या स्थापनेसाठी किमान ५०० लोकसंख्या असावी. तसेच दहा हजारांपेक्षा अधिक लोकसंख्येच्या ग्रामपंचायतीचे रूपांतर नगर परिषदेत केले जावे. न्यायपंचायती रद्द कराव्यात. ग्रामपंचायतीस दरडोई दोन रुपयांप्रमाणे समानीकरण अनुदान द्यावे. ग्रामपंचायत सरपंचास मानधन द्यावे. तसेच किमान वर्षातून दोन वेळा ग्रामसभा आयोजित करावी.

**(४) वित्तीय व्यवस्था :-**

पंचायतराज संस्थानां पुरेशी साधन संपत्ती उपलब्ध करून देणे. पंचायतराज संस्थांना आस्थापना अनुदान शंभर टक्के असावे. त्याचा योग्य विनिमय त्यांनी करावा. तसेच प्रत्येक जिल्ह्यात कृषी उद्योग महामंडळ असावेत. या महामंडळां सोबत जिल्हा परिषद व राज्यशासन हे देखील भागधारक असावे. विविध योजनांचे हस्तांतरण जिल्हा परिषदेकडे करून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा.

**(५) ग्रामीण जनतेचे प्रबोधन :-**

समाजातील दुर्बल घटकांच्या विकासाचा प्रश्न, जातीयवाद, साचेबंद व काटेकोर सामाजिक व आर्थिक घडण अशा अनेक समस्यांचे निवारण करण्यासाठी पंचायतराज

नियोजन जागृतीचे कार्यक्रम हाती घेऊन व ग्रामीण लोकांना प्रबोधित करावे. ग्रामीण लहान शेतकऱ्यांच्या मुलांसाठी दुय्यम व लघु उद्योगधंदे निर्माण करून रोजगाराची व्यवस्था करावी.

**(६) नियोजन व मूल्यमापन समिती :-**

जिल्हा पातळीवर जिल्हा नियोजन व मूल्यमापन समितीची स्थापना केली जावी. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष हा या समितीचा अध्यक्ष असावा. तसेच लोकप्रतिनिधींनाही या समितीत सदस्यत्व असावे.

महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्थेच्या मूल्यमापनासाठी बोगीरवार समितीने महत्त्वपूर्ण शिफारशी करून या समितीने पंचायतराज व्यवस्थेच्या रचनेवर विश्वास व्यक्त केला आहे. त्याचबरोबर त्यांच्या मर्यादा हे स्पष्ट केले आहेत. पंचायतराज व्यवस्था आणखी प्रभावी कशी करता येईल. यावरील या समितीच्या शिफारशी महाराष्ट्र शासनाने बऱ्याच प्रमाणात स्वीकारल्या आहेत. एकूणच पंचायतराजच्या भविष्यकालीन विकासात या समितीचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे.

**अशोक मेहता समिती (१९७७)**

बलवंतराय मेहता समितीने १९५७ साली केलेल्या शिफारशीचे मूल्यमापन करण्यासाठी तब्बल वीस वर्षानंतर समाजवादी विचारधारेचे विचारवंत मानले जाणारे श्री. अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली. या समितीस अशोक मेहता समिती असे म्हटले जाते. तसेच राष्ट्रीय

पातळीवरील मूल्यमापन समिती म्हणून देखील या समितीला ओळखले जाते. या समितीची स्थापना १२ डिसेंबर १९७७ रोजी भारत सरकारच्या ठरावाद्वारे करण्यात आले होती. पंचायतराजच्या भारतातील २० वर्षाच्या अंमलबजावणीनंतर देखील या व्यवस्थेत काही दोष व अडचणी असल्याचे आढळले. त्यामुळे यावर सखोल विचार करण्याची गरज तत्कालीन जनता पक्षाचे प्रधानमंत्री श्री. मोरारजी देसाई यांना जाणवली. त्यामुळे या उद्देशाने त्यांनी अशोक मेहता समितीची स्थापना करण्याचे आदेश दिले. भारतीय पंचायतराज संस्थांच्या अभ्यासासाठी नियुक्त झालेल्या या समितीत त्या काळातील राजकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला. या समितीमध्ये एकूण १४ सदस्य कार्यरत होते. त्यामध्ये काही घटक राज्यांचे मुख्यमंत्री तर काही खासदार व सामाजिक कार्यकर्ते इत्यादींचा समावेश होता. या समितीने सर्वेक्षण करून आपला अभ्यासपूर्ण अहवाल ऑगस्ट १९७८ मध्ये भारत सरकारला सादर केला. अशोक मेहता समितीने केलेल्या प्रमुख शिफारशींचा उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल.

**(१) द्विस्तरीय पंचायत व्यवस्था :-**

लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने जिल्हा पातळीवरील जिल्हा परिषद हा पहिला घटक असावा. त्या पाठोपाठ मंडळ पंचायत असावी. या मंडळ पंचायतीत काही

गावांचा किंवा गटांचा समावेश असावा. जेणेकरून त्रिस्तरिय विकेंद्रीकरणाचे प्रारूप द्विस्तरीय असे असावे.

**(२) ग्रामपंचायती व पंचायत समितीची आवश्यकता:-**

पंचायतराज व्यवस्था ही द्विस्तरीय असली तरीही ग्रामपंचायत व पंचायत समिती यांची स्थापना करणे आवश्यक आहे. तसेच मंडळ पंचायतीचे अध्यक्ष हे पंचायत समितीचे पदसिद्ध सदस्य असावेत. गटातील जिल्हा परिषद सदस्य हे पंचायत समितीवर नियुक्त केले जावेत. सभापती हा निर्वाचित किंवा पदसिद्ध सदस्यांमधून निवडला जावा.

**(३) प्रत्यक्ष निवडणूक व प्रतिनिधित्व :-**

या द्विस्तरीय प्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष निवडणुकीला प्राधान्य दिले जावे. तसेच अनुसूचित जाती- जमातीला देखील लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिले जावे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांना प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडले जावे. मात्र मंडळ पंचायतीचे अध्यक्ष प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या  निवडले जातील.

**(४) कार्यकाल :-**

निवडणुकीद्वारे निर्वाचित झालेल्या सदस्यांचा कार्यकाल हा ४ वर्षाचा असावा. त्याचप्रमाणे सर्व स्तरांवर एकाच वेळी निवडणुका घेतल्या जाव्यात.

**(५) राज्य शासनावरील जबाबदारी :-**

प्रत्येक राज्याने आपल्या राज्यातील परिस्थितीला अनुरूप अशी पंचायत राज्याची व्यवस्था करावी. वेळेचा व निधींचा अपव्य थांबविण्यासाठी राज्यांनी अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे. स्थानिक स्वशासन संस्थांच्या निवडणुका ह्या नियमितपणे घ्याव्यात. काही कारणास्तव बरखास्त झालेल्या संस्थेच्या निवडणुका ह्या सहा महिन्याच्या आत घेतल्या जाव्यात. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने केंद्रीय निवडणूक आयोगाशी चर्चा करूनच निवडणुकांचे संचलन करावे. तसेच, पंचायतराज द्वारे लोकशाही विकेंद्रीकरण प्रक्रिया प्रभावी करण्यासाठी आवश्यकतेनुसार भारताच्या राज्यघटनेत देखील दुरुस्ती केली जावी. जेणेकरून बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार अधिकाधिक जनसहभागासाठी पंचायतराजची पुनर्रचना व्हावी.

**(६) जिल्हा परिषद :-**

जिल्हा परिषदेमध्ये निर्वाचक गटातून निवडून आलेले सदस्य असतील. तसेच जिल्हा परिषदेत मोठ्या नगरपालिकेचे नियुक्त सभासद, जिल्ह्यातील सहकारी संस्थांचे नियुक्त सभासद म्हणून स्वीकारले जातील. यामध्ये सर्वाधिक मतदान मिळविणाऱ्या दोन स्त्रिया सभासदांचा समावेश असेल. विद्यापीठ किंवा महाविद्यालयातील शिक्षकातून एक सदस्य नियुक्त केला जावा. जिल्हा परिषद अध्यक्ष हा निर्वाचित

सदस्यातूनच निवडला जावा. विविध विषय समित्यांची स्थापना करून त्यातील सर्व सभापतींची मिळून स्थायी समिती असावी.

**(७) मंडळ पंचायत :-**

प्रत्येक १५ ते २० हजार लोकसंख्येसाठी एका मंडळ पंचायतीची स्थापना करावी. तसेच मंडळ पंचायतीत प्रत्यक्ष निवडून आलेले १५ सदस्य कृषी मंडळाचे प्रतिनिधी आणि सर्वाधिक मताने निवडून आलेल्या दोन स्त्री सभासद असाव्यात. या सर्व सदस्यांतून पंचायतीचा अध्यक्ष निवडावा. सर्व महिला सदस्यांची मिळून एक महिला व बालकल्याण समिती असावी.

**(८) वित्तीय व्यवस्था :-**

शासकीय मर्यादेत पंचायतराज संस्थांना सक्तीने कर बसविण्याचे अधिकार असावेत. जमीन महसूल उपकर आधीभार करमणूक कर इत्यादी उत्पन्न पूर्णतः पंचायतराज संस्थांना द्यावे. शासनाने आवश्यकतेनुसार पंचायतराज संस्थांना अनुदान द्यावे किंवा अल्प व्याजाने कर्ज द्यावे.

वरील प्रमाणे महत्त्वपूर्ण शिफारशीनंतरही या समितीच्या अहवालावर विशेष अशी चर्चा झाली नाही. या समितीने पंचायतराजची द्विस्तरीय पद्धती सांगितली असली, तरीही जिल्हा परिषद व मंडळ पंचायत या दोन स्तरात मध्यस्थांनी पंचायत समिती आणि मंडळ पंचायतीच्या ही खाली ग्रामपातळीवर ग्रामपंचायतचे अस्तित्व मान्य केले होते. या समितीला पंचायतराज संदर्भात चार प्रकारच्या संस्थांची रचना अपेक्षित होती. १९८० मध्ये सत्तांतर होऊन इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. त्यावेळी अशोक मेहता समितीचा अहवाल बाजूला सारला गेला. असे असले तरीही आपल्या अभ्यासपूर्ण अहवालातील पंचायतराज संस्थांना संवैधानिक दर्जा देण्या संदर्भात महत्वपूर्ण शिफारशी या समितीने केल्या होत्या.

**प्रा. पी. बी. पाटील समिती (१९८४) :-**

महाराष्ट्र शासनाने नाईक समितीच्या शिफारशीनंतर १९७० मध्ये एन. बोंगीरवार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून पंचायत राज्याच्या कामकाजाबाबत सुधारणा व प्रशासकीय कार्यक्षमता आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर १८ जून १९८४ मध्ये पी. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र सरकारने पंचायतराज मूल्यमापन समितीची स्थापना केली. या समितीने शहरी व ग्रामीण जनतेच्या विकासाच्या दृष्टीने राज्य शासनाने पंचायतराजच्या माध्यमातून आतापर्यंत कोणते, किती व कसे प्रयत्न केलेले आहेत. तसेच विकास कार्यामध्ये कोणत्या अडचणी निर्माण झाल्या व त्या अडचणी कशा दूर करता येतील, याबाबत समितीने शासनाला योग्य त्या शीफारशी कराव्यात. अशी जबाबदारी या समितीवर टाकण्यात आली होती. या समितीने योग्य तो अभ्यास करून जून १९८६ मध्ये महाराष्ट्र सरकारला आपल्या शिफारशी सादर केल्या आहेत. त्यांचा उल्लेख पुढील प्रमाणे करण्यात येतो.

munotes.in

**(१) स्थानिक शासनाला अधिक स्वायत्त प्रदान करणे :-**

या शिफारशीनुसार राष्ट्र विकासाच्या कल्पनेमध्ये स्थानिक स्वशासन व्यवस्थेला देखील महत्त्व प्राप्त झाले. केंद्र सरकार घटक सरकार यांच्याप्रमाणे जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत पर्यंत विकासाच्या जबाबदाऱ्या स्वतंत्रपणे सोपविण्यात आल्या आहेत. व त्यातूनच स्थानिक कार्याची राष्ट्र विकास अशी सांगड घातली गेली आहे.

**(२) आदर्श ग्रामीण समाजाची निर्मिती करणे :-**

ग्रामीण भागातील राहणीमान जीवनमान सुधारण्यासाठी आदर्श स्वरूपाच्या ग्रामीण समाजाची निर्मिती करावी. शासनाने पाटील समितीच्या शिफारशीची दखल घेऊन विशेषतः ग्रामीण समाजामध्ये अस्तित्वात असणाऱ्या धार्मिक, जातीय, संकुचित, विधवंसक अशा प्रवृत्तीचा बिमोड करून परस्पर सहकार्य व बंधुभावातून आदर्श समाज निर्माण करण्याची जबाबदारी पार पाडली.

**(३) पदाधिकारी व शासकीय अधिकारी यांच्यातील संबंध :-**

प्रशासकीय कार्यक्षमतेसाठी तसेच ग्रामीण विकासासाठी शासन व अधिकारी व या शासन व्यवस्थेत काम करणारे पदाधिकारी यांचे संबंध हे सहकार्याचे असले पाहिजेत. अशी शिफारस पाटील समितीने केलेली होती. प्रशासकीय कार्यक्षमता व विकासाच्या दृष्टीने शासन, अधिकारी व पदाधिकारी यांच्यात सुसंवाद निर्माण करण्याचा अनेक वेळा प्रयत्न करण्यात आलेला आहे. परंतु या शिफारशीला म्हणावे तसे यश प्राप्त होऊ शकले नाही.

**(४) आर्थिक अनुदानामध्ये वाढ :-**

ग्रामीण शासन व्यवस्थेने शिक्षण, आरोग्य, समाज कल्याण व कृषी विकास अशा विकासाबरोबरच शेतीपूरक असणारे लघुउद्योग, कुकुटपालन, शेळ्या, मेंढ्या पालन, दुग्ध व्यवसाय अशा व्यवसायांनाही प्रोत्साहन द्यावे. त्यासाठी भरीव आर्थिक निधी शासनाने उपलब्ध करावा. शासनाने ही शिफारस मान्य करून विकास कार्यासाठी तसेच ग्रामीण आर्थिक विकासासाठी अनेक विकास योजनांची निर्मिती केली आहे. तसेच विकास पूरक निधी उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न केलेला आहे.

**(५) ग्रामपंचायतची आर्थिक वर्गवारी :-**

प्रत्येक ग्रामपंचायतीची लोकसंख्या भिन्न असल्याने मिळणाऱ्या उत्पन्नाचेही प्रमाण भिन्न आहे. त्यानुसार वर्गवारी करून शासनाने आर्थिक अनुदान द्यावे. महाराष्ट्र शासनाने अ, ब, क, ड, अशी वर्गवारी करण्याचे मान्य केले आहे. व त्यानुसार विकास कार्यासाठी योग्य ते अनुदान देण्याचे मान्य केले आहे.

**(६) अनुसूचित जाती-जमाती व महिलांना प्रतिनिधित्व :-**

या शासन व्यवस्थेमध्ये महिला तसेच अनुसूचित जाती-जमाती यांना सहभागी करून घ्यावे. तसेच जिल्हा परिषदेतील निर्वाचित सदस्य संख्या ४० पेक्षा कमी व ७५ पेक्षा

जास्त असू नये, तसेच २५ % जागा स्त्रियांसाठी राखीव असाव्यात. शासनाने ही शिफारस मान्य केली. असून अनुसूचित जाती-जमातींसाठी स्वतंत्र राखीव मतदार संघाची निर्मिती केलेली आहे. तसेच ३३ % इतक्या राखीव जागांची तरतूद स्त्रियांसाठी केलेली आहे. तसेच स्त्री मतदार संघ चक्राकार पद्धतीने बनविले गेले आहे.

**(७) जिल्हा नियोजन मंडळामध्ये ग्रामीण शासन व्यवस्थेला प्रतिनिधित्व :-**

जिल्हा नियोजन मंडळामध्ये या ग्रामीण शासन व्यवस्थेतील पदाधिकाऱ्यांचा समावेश असावा. अशी शिफारस पाटील समितीने केलेली होती. जिल्हा नियोजन मंडळामध्ये या शासन व्यवस्थेतील शासकीय अधिकाऱ्यांना व पदाधिकाऱ्यांना सदस्यत्व दिलेले आहे. कार्यक्षम विकासासाठी स्थानिक शासन व्यवस्थेला विश्वासात घेऊनच जिल्हा नियोजन मंडळ कार्य करीत असते.

वरील प्रमाणे अशा विविध समित्यांच्या शिफारशी महाराष्ट्र शासनाने स्वीकारून खऱ्या अर्थाने लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना प्रत्यक्षामध्ये उतरविली आहे. लोकशाही विकेंद्रीकरणांमध्ये स्थानिक विकासाची सांगड राष्ट्रीय विकासाशी घालण्यात येते. या दृष्टिकोनातून केंद्र सरकार तसेच महाराष्ट्र सरकार यांनी पंचायतराज व्यवस्थेमध्ये विकास कार्याबाबत कार्यक्षमता निर्माण होण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या कालखंडामध्ये निर्माण केलेल्या समितींचे योगदान निश्चितच महत्त्वाचे आहे. कारण महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्था अशा अभ्यासपूर्ण मार्गदर्शनातूनच अधिक पारदर्शक होईल, असा विश्वास वाटतो.

**जी. व्ही. के. राव समिती (१९८५)**

भारतातील ग्रामीण विकास व दारिद्र्य निर्मूलन करण्याच्या उद्देशाने नियोजन आयोगाने राष्ट्रीय पातळीवर जी. व्ही. के. राव यांच्या अध्यक्षतेखाली २५ मार्च १९८५ रोजी या समितीची स्थापना केली. या समितीने प्रामुख्याने विविध राज्यातील अभ्यास गटांनी केलेल्या शिफारशींचा आढावा घेऊन, आपल्या चाळीस शिफारशींचा अहवाल २४ डिसेंबर १९८५ रोजी नियोजन आयोग भारत सरकार यांना सादर केला. या समितीने केलेल्या काही महत्त्वपूर्ण शिफारशींचा उल्लेख पुढील प्रमाणे करण्यात येईल.

(१) नियोजनाच्या दृष्टीने जिल्हा हा पायाभूत मानला जावा. जिल्ह्यातील नियोजन व अंमलबजावणीचे काम जिल्हापरिषदेकडे सोपविण्यात यावे.

(२) वेगवेगळ्या यंत्रणेमार्फत राबविल्या जाणाऱ्या दारिद्र्य निर्मुलणाचे कार्यक्रम एका छत्राखाली आणले जावेत.

(३) आर्थिक विकास व सामाजिक न्याय हा पूर्णतः प्रशासकीय यंत्रणेवर न सोपविता लोकप्रतिनिधींच्या प्रत्यक्ष सहभागाने साध्य करावा.

(४) पंचायतराज संस्थांना सक्षम करण्यासाठी त्यांच्या निवडणुका वेळेवर घेऊन कोणत्याही अपरिहार्य कारणाशिवाय त्यांना बरखास्त करू नये.

(५) जिल्हा परिषद अध्यक्ष हा प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निर्वाचित केला जावा.

(६) राज्यस्तरावर विकास प्रशासनामध्ये मुख्य सचिव दर्जाचा आयुक्त असावा. तसेच जिल्ह्यासाठी जिल्हा विकास आयुक्ताची नेमणूक करून तोच जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी असावा.

(७) गटविकास अधिकाऱ्यास सहाय्यक आयुक्ताचा दर्जा देण्यात यावा. तसेच त्याचा दर्जा उपविभागीय प्रमुखाचा देखील असावा. विकास गटाची पुनर्स्थापना करून सामान्यपणे एक लाख लोकसंख्येस व मागास भागासाठी पन्नास हजार लोकसंख्येसाठी त्याची स्थापना करावी.

(८) जिल्ह्याचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी जिल्हास्तरावर एक मुख्य लेखा व वित्त अधिकारी व त्याच्या मदतीसाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग नेमला जावा.

अशाप्रकारे वरील प्रमाणे जी.व्ही.के. राव समितीने अत्यंत महत्त्वपूर्ण शिफारशींचा अहवाल सादर केला. अनेक राज्यांनी या शिफारशींची अंमलबजावणी केली. प्रामुख्याने दारिद्र्य निर्मूलनासाठी पंचायतराज प्रभावी माध्यम असल्याचे या समितीने सांगितले होते.

### डॉ. एल. एम. सिंघवी समिती १९८६

लोकशाही विकेंद्रीकरण आणि विकासासाठी पंचायतराजचे पुनर्गठन करण्याच्या हेतूने राष्ट्रीय स्तरावर पंतप्रधान राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने १९८६ साली श्री. लक्ष्मीमल सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना केली. या समितीने घटनात्मक दृष्ट्या पंचायत राज्यास सक्षम करण्यासाठी खालील प्रमाणे महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या होत्या.

(१) पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त व्हावा तसेच त्यांना राज्यघटनेचे संरक्षण प्राप्त व्हावे.

(२) पंचायतराजच्या विस्तृत विवरणासाठी राज्यघटनेत नवीन प्रकरणाचा समावेश केला जावा.

(३) पंचायतराज व्यवस्थेत नियमित व निपक्षपाती निवडणुका होण्यासाठी घटनात्मक तरतूद असावी.

(४) ग्रामीण भागात खेड्यांसाठी नवीन पंचायतीची स्थापना करावी. तसेच अधिक सक्षम ग्रामपंचायतीची स्थापना करावी. ग्रामपंचायतींना जास्तीचे अधिकार प्रदान करावेत. ग्रामपंचायती साठी वित्तीय संसाधनांची व्यवस्था करावी.

(५) पंचायतराज संस्थांच्या निवडणुकीसंबंधी वाद विवाद मीटविण्यासाठी प्रत्येक राज्यात एक न्यायिक प्राधिकरणाची स्थापना करावी.

सिंघवी समितीने वरील प्रमाणे महत्त्वपूर्ण शिफारशींचा अहवाल शासनास सादर केला. या शिफारशींच्या आधारे राज्यघटना दुरुस्तीचे विधेयक तयार करण्यात आले. पुढील काळात पंचायतराज व्यवस्थेस घटनात्मक दर्जा प्राप्त करून देण्यात या समितीच्या शिफारशी महत्वपूर्ण ठरल्या आहेत.

## ७३ वी घटनादुरुस्ती

भारतात लोकशाही विकेंद्रीकरण आणि पंचायतराज व्यवस्था राबविण्याच्या दृष्टिकोनातून १९९२ साली राज्यघटनेत ७३ वी दुरुस्ती विधेयक संमत करण्यात आले. डॉ. लक्ष्मीमल सिंघवी समितीच्या शिफारशींना अनुसरून तत्कालीन पंतप्रधान स्व. राजीव गांधी सरकारने पंचायतराज व्यवस्थेसाठी घटनादुरुस्ती विधेयक मांडले.

### पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांचा कालखंड :-

राजीव गांधी यांनी नया पंचायतराज या घोषणेला वास्तवात आणण्यासाठी सिंघवी समितीच्या अहवालावरून ६४ वे पंचायतराज घटना दुरुस्ती विधेयक तयार केले. १५ मे १९८९ ला ते संसदेत सादर करण्यात आले. पुढे १० ऑगस्ट १९८९ रोजी हे विधेयक लोकसभेत ३४३ विरुद्ध शून्य मतांनी पारित झाले. राज्यसभेत केवळ तीन मतांनी ते फेटाळले गेले. हे विधेयक राज्य सूचीतील विषयावरील घटनादुरुस्ती संदर्भात असल्यामुळे संसदेतील दोन्ही सभागृहात दोन तृतीयांश विशेष बहुमत व अर्ध्यापेक्षा अधिक राज्यांच्या विधिमंडळाची मान्यता त्यासाठी आवश्यक होती. ही प्रक्रिया पूर्ण न होऊ शकल्याने हा पहिला प्रयत्न अयशस्वी ठरला.

### पंतप्रधान व्ही. पी. सिंग व चंद्रशेखर यांचा कालखंड :-

१९८९ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला आवश्यक बहुमत न मिळाल्याने जनता दलाचे श्री. व्ही. पी. सिंग हे पंतप्रधान झाले. पुढे सरकारमधून बाहेर पडून श्री. चंद्रशेखर यांनी आपला वेगळा गट स्थापन केला आणि काँग्रेसच्या पाठिंब्यावर ते पंतप्रधान झाले. या दोन्ही पंतप्रधानांच्या काळात या विधेयकावर संसदेत चर्चा होऊ शकली नाही. आणि सप्टेंबर १९९० साली लोकसभा भंग करण्यात आली. हा दुसरा प्रयत्नही या विधेयकाच्या संदर्भामध्ये अयशस्वी ठरला.

### पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांचा कालखंड :-

भारतात मध्यवर्ती सार्वत्रिक निवडणुका नंतर २१ जून १९९१ रोजी पी. व्ही. नरसिंहराव पंतप्रधान पदी विराजमान झाले. सर्वप्रथम त्यांनी लोकसभा व राज्यसभा यांची एक सर्वपक्षीय सदस्य समितीचे गठन केले. या समितीच्या सूचनेनुसार घटनादुरुस्ती विधेयक २२ डिसेंबर १९९२ साली संसदेला सादर करण्यात आले. या विधेयकास २२ डिसेंबर १९९२ ला लोकसभेने तर २३ डिसेंबर १९९२ ला राज्यसभेने मान्यता दिली. त्यानंतर या विधेयकास १७ राज्यांच्या विधिमंडळांनी संमती दिली. आणि विशेष म्हणजे यापैकी बिहार आणि पश्चिम बंगाल ही दोन विरोधी पक्ष सत्तेत असणारी राज्य होती.

या घटनादुरुस्तीचा शेवटचा टप्पा म्हणजे २० एप्रिल १९९३ ला राष्ट्रपतींनी यावर स्वाक्षरी केली. तेंव्हा पासून पंचायत राज संस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. २४ एप्रिल १९९३ पासून ७३ वी घटनादुरुस्ती अधिनियम १९९२ ची अंमलबजावणी सुरू झाली. आणि स्थानिक स्वशासन हा राज्य सूचीतील विषय असल्याने २४ एप्रिल १९९४ पर्यंत अर्थात एका वर्षाची मुद्दत सर्व घटक राज्यांना अंमलबजावणी करण्यासाठी देण्यात आली होती.

munotes.in

**७३ व्या घटनादुरुस्तीतील मुख्य तरतुदी :-**

**(१) पंचायतराजला संवैधानिक दर्जा :-**

७३ व्या घटनादुरुस्तीनुसार भारतीय संविधानात नऊ या भागाचा विस्तार करण्यात आला. या भागात कलम २४३ (ए) ते कलम २४३ (ओ) मध्ये पंचायत राज्यासंबंधी आवश्यक तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे पंचायतराजला संवैधानिक दर्जा प्राप्त झाला आहे. तसेच कार्य सूचीसाठी नवीन परिशिष्ट देखील जोडण्यात आले आहे. पंचायतराजचे कार्य व जबाबदारी स्पष्ट करण्यासाठी भारतीय संविधानात नवीन अकरावे परिशिष्ट जोडण्यात आले. या परिशिष्टात पंचायतराजला करावी लागणारी २९ कार्यांची सूची देण्यात आली आहे.

**(२) ग्रामसभा :-**

भारतीय राज्यघटनेच्या कलम २४३ (ए) मध्ये ग्रामसभेचा उल्लेख केला आहे. ग्रामसभा ही गावातील सर्व प्रौढ नागरिकांची मिळून तयार होईल. तसेच ग्रामसभा हा पंचायतराज व्यवस्थेचा आधारभूत घटक असेल. असे या घटना दुरुस्तीत म्हटले आहे. अशा ग्रामसभेचे अधिकार व कार्य त्या-त्या राज्यांच्या विधिमंडळाच्या मान्यतेवर अवलंबून असतील.

**(३) त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था :-**

भारतीय राज्यघटनेतील कलम २४३ (बी) नुसार जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद विकास गट, तालुकास्तरावर पंचायत समिती आणि गाव स्तरावर ग्रामपंचायत अशा त्रिस्त्रीय व्यवस्थेची रचना अपेक्षित आहे. अशी त्रिस्तरीय रचना संपूर्ण भारतात सुरू करण्यात यावी. मात्र वीस लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या राज्यात पंचायत समितीची स्थापना न करता केवळ जिल्हा परिषद व ग्रामपंचायत अशा दोनच स्तरात रचना करावी.

**(४) पंचायतराजची रचनात्मक बांधणी :-**

पंचायतराज संस्थांची संरचना राज्याच्या विधिमंडळाने पारित केलेल्या कायद्यानुसार निश्चित केली जाईल. हा अधिकार राज्यघटनेतील कलम २४३ (सी) नुसार घटक राज्यांना दिला आहे. पंचायत राजच्या तिन्ही स्तरावर प्रत्यक्ष निवडणुकीचा अवलंब करावा. सरपंचला पंचायत समितीवर किंवा जिल्हा परिषदेवर तर पंचायत समिती सभापती यांना जिल्हा परिषदेवर सदस्यत्व तसेच आमदार व खासदारांना देखील जिल्हा परिषदेवर सदस्यत्व द्यावे की नाही, हे त्या-त्या राज्याच्या विधिमंडळांनी ठरवावे पंचायत समिती सभापती व जिल्हा परिषद अध्यक्ष यांची निवड अप्रत्यक्षपणे अर्थात निर्वाचित सदस्यांच्या द्वारे केली जावी. सरपंचांची निवड प्रत्यक्ष की, अप्रत्यक्ष यासंबंधी त्या-त्या राज्यांच्या विधिमंडळाने निश्चित करावी. अशी तरतूद करण्यात आली.

**(५) पंचायतराज व्यवस्थेतील आरक्षण :-**

सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने पंचायतराज संस्थांमध्ये कलम २४३ (डी) अन्वये तिन्ही स्तरांवर आरक्षण धोरणाची तरतूद करण्यात आली आहे. पदाधिकारी व सदस्य अशा दोन्ही पातळीवर आरक्षण धोरण लागू करण्यात आले आहे.

(१) अनुसूचित जाती व जमातीला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण असेल व त्यापैकी १/३ पेक्षा कमी नाही, इतके त्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षण असेल.

(२) इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षण द्यावयाचे की नाही आणि किती हे राज्यांच्या इच्छेवर अवलंबून असेल मात्र त्यापैकी १/३ पेक्षा कमी नाही, इतके आरक्षण महिलांसाठी ठेवावे लागेल.

(३) एकूण सदस्य व पदाधिकारी संख्येच्या कमीत कमी १/३ पेक्षा कमी नसेल, इतके आरक्षण महिलांसाठी असेल.

वरील प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आरक्षणापैकी अनुसूचित जाती-जमातीसाठी असणारे आरक्षण संविधान लागू झाल्यापासून ६० वर्षापर्यंत म्हणजेच २६ जानेवारी २०१० पर्यंत असेल, मात्र महिला आरक्षणाच्या बाबतीत असा कोणताही उल्लेख राज्यघटनेत आढळत नाही.

**(६) पंचायतराज संस्थांचा कार्यकाल :-**

भारतीय राज्यघटनेतील कलम २४३ (ई) अन्वये पंचायतराज मधील तिन्ही स्तरांचा कार्यकाल सर्व भारतातील घटक राज्यात पाच वर्षांचा निश्चित करण्यात आला आहे. परंतु कार्यकाळ पूर्ण होण्याअगोदर एखादी संस्था बरखास्त केली जाऊ शकेल. मात्र बरखास्तती नंतर सहा महिन्याच्या आत निवडणुका घेणे बंधनकारक असेल. नवनिर्वाचित संस्थेचा कार्यकाल पूर्ण निर्धारित संस्थांच्या कार्यकाल एव्हढाच असेल.

**(७) सदस्य व पदाधिकाऱ्यांची अपात्रता :-**

भारतीय राज्यघटनेतील कलम २४३ (एफ) नुसार जी व्यक्ती राज्य विधिमंडळाच्या निवडणुकीसाठी अपात्र असेल, ती व्यक्ती पंचायतराज संस्थांच्या निवडणुकीसाठी ही अपात्र समजली जाईल, या सोबतच म्हणजे पंचायतराज संस्थांच्या निवडणुकीसाठी वयोमर्यादा २१ वर्षे इतकी असेल, या व्यतिरिक्त इतर अटी वेळोवेळी राज्य विधिमंडळ निर्धारित करेल.

**(८) पंचायतराज संस्थांचे अधिकार व कार्याची जबाबदारी :-**

भारतीय घटनेचे कलम २४३ (जी) नुसार संविधानाच्या ११ व्या परिशिष्टात २९ विषयांची यादी दिली आहे. या विषयांच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने राज्य विधिमंडळाने पंचायतराज संस्थांना अधिकार व कार्याची विभागणी करावी. यातून

munotes.in

पंचतराजचा मुख्य उद्देश आर्थिक विकास व सामाजिक न्याय प्रस्थापित करणे अभिप्रेत आहे.

**(९) वित्तव्यवस्था व तरतूद :-**

अनुदान क्षमता, कर आकारणी कर वसुली आणि वित्तीय विनियोजन याबाबतीत कलम २४३ (एच) अन्वये राज्यव्यवस्था करील. राज्य शासनाच्या संचित निधीतून विकास अनुदानाची व्यवस्था केली जाईल. या व्यतिरिक्त काही माध्यमांद्वारे पंचायतराज संस्थांना स्वतः निधी उभारण्याचा अधिकार असेल.

**(१०) राज्य वित्त आयोग :-**

भारतीय संविधानातील कलम २४३ (आय) नुसार राज्याचा राज्यपाल घटना दुरुस्तीच्या अंमलबजावणी पासून एका वर्षाच्या आत म्हणजे २४ एप्रिल १९९४ पूर्वी राज्य वित्त आयोगाचे गठन करील. त्याचा कार्यकाल पाच वर्षाचा असेल व प्रत्येक पाच वर्षासाठी नवीन वित्त आयोगाचे गठन केले जाईल. राज्य वित्त आयोग ही एक सल्लागार संस्था असेल. आयोग आपला अहवाल राज्यपालाकडे सादर करेल, तर राज्यपाल हा अहवाल विधिमंडळात सादर करील. महाराष्ट्रात १९९४ पासून राज्य वित्त आयोगाचे गठन केले जाते.

**(११) पंचायतराज संस्थांचे लेखापरीक्षण :-**

पंचायतराज संस्थांना नियमितपणे लेखांकन व परीक्षण करावे लागेल. असे भारतीय राज्यघटनेच्या कलम २४३ (जे) नुसार तरतूद करण्यात आली आहे. राज्यांच्या विधिमंडळाने पंचायतराज संस्था कशा प्रकारे हिशोब ठेवतील व त्याचे लेखापरीक्षण कसे करावे, याची तरतूद करावी. प्रामुख्याने निश्चित नियमबद्ध आणि नियमित लेखांकन व लेखापरीक्षण असावे. अशी अपेक्षा या घटना दुरुस्तीने केली आहे.

**(१२) राज्य निवडणूक आयोग** :-

भारतीय राज्यघटनेतील कलम २४३ (के) अन्वये प्रत्येक राज्यासाठी राज्य निवडणूक आयोग असेल. स्थानिक स्वशासन संस्थेच्या निवडणुका पार पाडणे, निवडणुकीची तारीख निश्चित करणे, मतदार यादी तयार करणे, इत्यादी. निवडणूक विषयक कार्य पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना केली जाईल. राज्य निवडणूक आयोगासाठी निवडणूक आयुक्त असेल, ज्यांची नियुक्ती राज्यपाल करेल. आयोगाची स्वायत्तता जपण्यासाठी आयुक्ताचा कार्यकालात, त्या पदाला हानी पोहोचेल असे बदल करता येणार नाहीत. निवडणूक आयुक्तांना पदावरून दूर करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना बडतर्फी करण्यासाठी असलेली प्रक्रिया लागू राहील. महाराष्ट्रातील १९९४ पासून राज्य निवडणूक आयोग कार्यरत आहे.

munotes.in

### (१३) केंद्रशासित प्रदेशा बाबत तरतूद :-

या घटनादुरुस्तीतील सर्व तरतुदी कलम २४३ (एल) यानुसार घटक राज्यांबरोबर सर्व केंद्रशासित प्रदेशांनाही लागू असतील. ज्या केंद्रशासित प्रदेशात विधिमंडळ अस्तित्वात आहे. तेथे विधिमंडळ कायदा पारित करेल व जेथे विधिमंडळ नाही. तेथील प्रशासकीय प्रमुख राष्ट्रपतींच्या आदेशानुसार या तरतुदींची अंमलबजावणी करेल.

### (१४) दुर्गम व पर्वतीय प्रदेशांना सूट :-

भारतीय राज्यघटनेतील कलम २४३ (एम) नुसार काही राज्य आणि काही प्रदेशांना ७३ व्या घटना दुरुस्तीतील तरतुदीपासून सूट देण्यात आली आहे. दुर्गमय पर्वती क्षेत्र म्हणून मिझोराम, मेघालय व नागालँड या तीन राज्यांना या घटनादुरुस्तीतून सूट देण्यात आली आहे. पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील काही भाग व इतर ठिकाणच्या काही अनुसूचित क्षेत्रात ही घटनादुरुस्ती लागू होत नाही.

अशाप्रकारे वरील प्रमाणे महत्त्वपूर्ण तरतुदी ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार भारतीय राज्यघटनेमध्ये करण्यात आलेले आहे. या घटना दुरुस्तीची अंमलबजावणी करणारे पहिले राज्य मध्य प्रदेश हे ठरले आहे. तर महाराष्ट्रात २२ एप्रिल १९९४ रोजी मुंबई ग्रामपंचायत, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती दुरुस्ती अधिनियम १९९४ संमत झाला. त्याची अंमलबजावणी मात्र २३ एप्रिल १९९४ पासून सुरू झाली. आणि महाराष्ट्रात पंचायतराजच्या नवीन पर्वाची सुरुवात झाली.

### २.३.३(ब) वित्तीय विकेंद्रीकरण :- (Fiscal decentralization) (पंचायतराजची अर्थव्यवस्था)

भारतात लोकशाही विकेंद्रीकरणाबरोबरच पंचायतराज व्यवस्थेतील आर्थिक किंवा वित्तीय विकेंद्रीकरण होणे देखील आवश्यक आहे. त्रिस्तरी योजना आर्थिक दृष्ट्या सक्षम होणे गरजेचे आहे. विविध विकास कामांसाठी स्थानिक स्वशासन संस्थांना अनुदाने व निधी उपलब्ध करून देणे ही केंद्र व राज्य शासनाची जबाबदारी आहे. अर्थात, ग्रामीण विकासाची संकल्पना पंचायत राज्याच्या आर्थिक विकासाशी संबंधित अशी आहे. पंचायत राज्याला आर्थिक उत्पन्नाची कोणती साधने आहेत. तसेच सरकारी अनुदानाचे प्रमाण किती आहे व कर्जरुपाने पंचायतराज व्यवस्था किती पैसा उभारू शकते. अशा वेगवेगळ्या बाजूंनी आर्थिक स्थितीचा विचार करावा लागतो. जिल्हा परिषद, तालुका पंचायत व ग्रामपंचायत या तिन्ही शासन व्यवस्था आपणाकडे उपलब्ध असणाऱ्या साधनसामुग्रीच्या आधारे व पुढील वर्षी कोणत्या योजनांची पूर्तता करावयाची आहे. त्याला किती खर्च अपेक्षित आहे. या आधारावरच अंदाजपत्रकाची मांडणी केली जाते. या अंदाजपत्रकांना मंजुरी मिळाल्यानंतरच विकास योजनांना सुरुवात होत असते.

पंचायती राज्यांना करापासून मिळणारे उत्पन्न हे मर्यादित असल्यामुळे सरकारच्या आर्थिक अनुदानावर अवलंबून राहावे लागते. विकास योजनांच्या बरोबरीने प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन यासाठी देखील या शासन व्यवस्थेला आर्थिक अनुदान मिळत असते. आर्थिक अनुदानाच्या बरोबरीने आपल्या विकासासाठी राज्य शासनाच्या परवानगीने

राज्यसंस्थेकडून तसेच इतर आर्थिक संस्थेकडून पंचायतराज संस्थांना कर्ज घेता येते. सरकारी अनुदान व कर्ज घेत असताना, सरकारचे आर्थिक नियंत्रणही या शासन व्यवस्थेवर असलेले दिसते. शासन आर्थिक खर्चाचे लेखापरीक्षण करत असते. त्यामुळे ज्या योजनांसाठी सरकारी अनुदान अथवा कर्ज घेतले असेल, त्याच योजनांवर या शासन व्यवस्थेला पैसा खर्च

करावा लागतो. त्या दृष्टीने या शासन व्यवस्थेवर राज्य शासनाचे आर्थिक नियंत्रण असलेले दिसते. ग्रामीण विकासामध्ये प्रत्यक्ष जनतेचा आर्थिक वाटाही महत्त्वाचा ठरत असतो. कारण लोकांच्या आर्थिक देणगीतूनही ग्रामीण भागात अनेक विकास योजना पूर्णत्वास जात असतात. पंचायतराजच्या विकासासाठी वित्तीय विकेंद्रीकरण तरतुदी घडून आणण्यासाठी केंद्रीय वित्त आयोग, राज्य वित्त आयोग, वित्तीय चौकशी समिती-१९५१, कर आकारणी चौकशी समिती-१९६३, अशोक मेहता समिती-१९७८ आणि सिंघवी समिती इत्यादींनी वेळोवेळी वित्तीय संदर्भातील तरतुदी आणि शिफारशी महत्वपूर्ण ठरल्या आहेत. या सर्वांचाच विचार पंचायतराजच्या आर्थिक विकेंद्रीकरण प्रक्रिया संदर्भात करता येईल.

**पंचायतराजच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप :-**

केंद्र शासन विकासाच्या दृष्टीने राज्य शासनाकडे अनुदान देत असते. तर राज्य शासन ग्रामीण भागातील विकासासाठी जिल्हा परिषदेला आर्थिक अनुदान देत असते. ग्रामीण भागाच्या विकासा साठी जिल्हा परिषदेची अर्थव्यवस्था देखील सधन व संपन्न असावी लागते. ग्रामीण भागाचा सर्व विकास हा आर्थिक विकासावर अवलंबून असतो. त्यातून त्रिस्तरीय शासन व्यवस्थेचा स्वीकार केल्यानंतर जिल्हा परिषदेला राज्य शासनाकडून आर्थिक सत्ता प्रदान करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदेच्या आर्थिक स्थितीचा अहवाल घेण्यासाठी बलवंतरार मेहता समिती, बोंगीरवार समिती, सादिक आली समिती अशा प्रमुख तीन समित्या नेमल्या होत्या. या तीन समित्यांनी ग्रामीण विकासाच्या दृष्टिकोनातून जिल्हा परिषदेची आर्थिक व्यवस्था मजबूत असावी. असा अहवाल शासनाला सादर केला. गुजरात, महाराष्ट्र व उत्तर प्रदेश अशा राज्यांनी आर्थिक नियंत्रणा बाबत शासनाला विरोध केला. इतर राज्यांनी मात्र राज्य शासनाने निश्चित केलेली अर्थव्यवस्था स्वीकारली. महाराष्ट्रात १९६१ च्या अधिनियमाने जिल्हा परिषदेचे उत्पन्न निश्चित केल्याने जिल्हा परिषदेला पुढील मार्गाने आर्थिक विकासासाठी आर्थिक उत्पन्न व शासकीय अनुदान निश्चित करून दिले आहे.

**जिल्हा परिषदेची अर्थव्यवस्था :-**

पंचायत राज मधील आर्थिक विकेंद्रीकरणाचा पहिला स्थर म्हणजे जिल्हा परिषद होय. जिल्हा परिषदेच्या अर्थव्यवस्थेचे विवरण पुढील प्रमाणे सांगता येईल.

(१) जिल्हा परिषदेच्या हद्दीत जो शेतसारा वसूल केला जातो, त्या शेतकऱ्याबरोबर एक रुपयातील वीस पैसे एवढा उपकर जिल्हा परिषदेला प्राप्त होतो.

(२) जिल्ह्याच्या हद्दीतील असणाऱ्या व्यापार, व्यवसाय, नोकरी या सर्वांवर कर बसवण्याचा अधिकार जिल्हा परिषदेला आहे. या करा मधून जिल्हा परिषदेला आर्थिक उत्पन्न मिळते.

(३) पाणीपट्टी कर म्हणून जिल्हा परिषदला उत्पन्न मिळते. पाटबंधारे प्रकल्पात पाण्याचे जे वाटप होते, त्यातील प्रत्येक रुपयातील वीस पैसे याप्रमाणे जिल्हा परिषदेला उत्पन्न मिळत असते.

(४) जिल्ह्याच्या हद्दीत असणारी सिनेमागृहे, नाट्यगृहे यातून निश्चित असा सार्वजनिक व मनोरंजन कर जिल्हा परिषदेला मिळतो. यातून जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढत असते.

(५) जिल्ह्याच्या हद्दीतील जमिनी, इमारती यावर कर लावून जिल्हा परिषद उत्पन्न मिळवत असते.

(६) बाजारातील दलाल, व्यापारी, अडते यांना परवानगी देऊन त्यातून जिल्हा परिषद उत्पन्न मिळविते.

(७) बाजारातील ओटे, इमारती यावर निश्चित कर लावून जिल्हा परिषद उत्पन्न मिळते.

**जिल्हा परिषदेला मिळणारे शासकीय अनुदान :-**

पंचायत राज १९६१ अधिनियम कलम- १८० नुसार जिल्हा परिषदेला वेगवेगळ्या विकास कामासाठी राज्य शासन अनुदान देत असते. त्याचे विवरण पुढील प्रमाणे करता येईल.

(१) दरडोई दोन रुपये इतका शासकीय अनुदानाचा खर्च जिल्हा परिषदेला एकूण जिल्ह्याच्या महसुलाच्या ५ % इतकी रक्कम जिल्हा परिषदस मिळते.

(२) जिल्ह्यातील बांधकाम तसेच वेगवेगळ्या विकास योजना यासाठी ९०% इतकी रक्कम जिल्हा परिषदेला राज्य शासनाकडून अनुदान म्हणून मिळते.

(३) जिल्हा परिषदेच्या प्रशासन व्यवस्थेचे कर्मचारी असतात. त्यांच्या वेतनासाठी ७५% इतकी रक्कम राज्य शासनाकडून जिल्हा परिषदेला मिळते.

(४) जिल्हा परिषद ज्या योजना राबवत असते, तसेच नवीन योजनांची आखणी करते, त्यासाठी राज्य शासनाकडून जिल्हा परिषदेला अनुदान मिळते.

(५) दरवर्षी विकास योजनांसाठी जे अनुदान ठरवण्यात येईल, ते अनुदान राज्य शासन ठरविते. त्यामुळे शासकीय अनुदान व जिल्हा परिषदेला मिळणारे उत्पन्न यातून जिल्हा परिषदेचे उत्पन्न निश्चित होते.

**पंचायत समितीची अर्थव्यवस्था :-**

राज्य शासनाकडून आर्थिक अनुदान जिल्हा परिषदेला मिळते व जिल्हा परिषदे कडून आर्थिक अनुदान पंचायत समितीला मिळते. तालुका पंचायतीच्या आर्थिक व्यवस्थेचा विचार करताना वेगवेगळ्या राज्यांमध्ये फरक असलेला दिसतो. महाराष्ट्र, गुजरात, उत्तरप्रदेश या राज्यातील तालुका पंचायतीचे अर्थव्यवस्था व इतर राज्यांचे अर्थव्यवस्था यात काही फरक आहे. सर्वसाधारणपणे पंचायत समितीला मिळणारे आर्थिक उत्पन्न व शासकीय अनुदान यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

(१) पंचायत समितीच्या हद्दीतील एकूण महसुलाच्या शेतसाऱ्यावर २०% इतका उपकर मिळतो.

(२) रस्त्यावरील वाहनांचा कर पंचायत समितीला मिळतो.

(३) पंचायत समितीच्या हद्दीत असणाऱ्या यात्रांवर काही कर पंचायत समितीला मिळतो.

(४) तालुका क्षेत्रातील सिनेमागृह, नाट्यग्रह यावर जो मनोरंजन कर लावला जातो. त्या करातून पंचायत समितीला उत्पन्न मिळते.

(५) तालुका क्षेत्रातील प्राथमिक शिक्षण व्यवस्थेतून काही कर पंचायत समितीला प्राप्त होतो.

(६) पंचायत समितीच्या हद्दीमध्ये राहणाऱ्या जनतेकडून विकास योजनांच्या बाबतीत आर्थिक मदत मिळत असते. त्यामुळे जनतेकडून मिळणारया अनुदानाचा समावेश पंचायत समितीला आर्थिक उत्पन्नात करता येतो. पंचायत समितीला वेगवेगळ्या मार्गाने जे उत्पन्न मिळते, ते जिल्हा परिषदेकडून शासकीय अनुदान म्हणून मिळते. कारण हे अनुदान निव्वळ व निश्चित अशा स्वरूपाचे असते.

(अ) पंचायत समितीच्या विकासासंदर्भात शासनाने अशी तरतूद केली की, एकूण खर्चाचे ६० % इतकी रक्कम समितीने जमा करावी. आणि उरलेली ४० % इतकी रक्कम शासनाने जमा करावी. त्यातून पंचायत समितीने विकास योजना राबव्यात. या पद्धतीने आर्थिक नियोजन व विकेंद्रीकरण केल्याचे दिसते.

(ब) प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यासाठी दरमहा ७५ % इतके रक्कम पंचायत समितीला मिळते.

(क) बांधकामासाठी तसेच विकास योजना राबविण्यासाठी ९० % इतकी रक्कम पंचायत समितीला द्यावी लागते.

(ड) पंचायत समितीच्या हद्दीमध्ये ज्या वेगवेगळ्या नावीन्यपूर्ण योजना राबविण्यात येतील. त्यासाठी शासनाकडून प्रोत्साहनपर अनुदान मिळत असते.

**ग्रामपंचायतचची अर्थव्यवस्था :-**

केंद्र शासन विकासाच्या दृष्टीने राज्य शासनाला वार्षिक अनुदान देत असते. तर राज्य शासन जिल्हा परिषदेला आर्थिक अनुदान देत असते. जिल्हा परिषद पंचायत समितीला आर्थिक अनुदान देत असते. तर तालुका पंचायत समिती ग्रामपंचायतीला आर्थिक अनुदान देते. याप्रमाणे अनुदानाचे आर्थिक विकेंद्रीकरण केले जाते. त्याचप्रमाणे शासनाने जे करांचे वाटप केले आहे. त्यातील वाटा ग्रामपंचायतीला देखील मिळतो. त्यामुळे जिल्हा परिषद कर लावत असते. त्यातूनही ग्रामपंचायतला आर्थिक उत्पन्न मिळत असते. ग्रामपंचायतीच्या आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत पुढील प्रमाणे सांगता येतील.

(१) निश्चित अशा शेतसाऱ्यापैकी एक रुपयातील वीस पैसे या दराने उपकर ग्रामपंचायतला मिळतो.

(२) ग्रामपंचायत हद्दीमध्ये प्राथमिक विभागाच्या शाळा असतात, त्या शाळांपासून निश्चित असा शिक्षण कर ग्रामपंचायतीला मिळतो.

(३) ग्रामपंचायत हद्दीत जे रस्ते असतात, त्यावर कर लावून त्यातून ग्रामपंचायतीला उत्पन्न मिळते.

(४) ग्रामपंचायत हद्दीत मनोरंजनाची केंद्र असतात, त्यापासून मनोरंजन कर ग्रामपंचायतीला मिळतो.

(५) वाहनावरील निश्चित असा करातील भाग ग्रामपंचायतीला मिळतो.

**ग्रामपंचायतीला मिळणारे शासकीय अनुदान :-**

(१) ग्रामपंचायत मध्ये काम करणारे जे कर्मचारी असतात, त्यांच्या वेतनाची ७५ % इतकी रक्कम शासनाकडून अनुदान म्हणून मिळते. त्या व्यतिरिक्त पंचायत समिती कडून आर्थिक मदत ग्रामपंचायतला मिळत असते.

(२) विकास योजनांसाठी ३० % इतकी रक्कम ग्रामपंचायतीला मिळत असते.

(३) पंचायत समितीकडून विकास कार्याची पाहणी करून प्रोत्साहन पर अनुदान म्हणून काही रक्कम ग्रामपंचायतला मिळत असते.

(४) ग्रामीण भागात राहणारे नागरिक हे आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार विकासासाठी मोठ्या प्रमाणात ग्रामपंचायतीला लोकसहभागातून मदत करतात.

अशाप्रकारे भारतात पंचायतराज व्यवस्थेमध्ये आर्थिक विकेंद्रीकरण घडून आणण्यात आले आहे. त्याची अंमलबजावणी प्रकर्षाने होत असताना दिसते.

## सारांश :-

प्रस्तुत प्रकरणांमध्ये आपण भारतातील लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया, कशी तळागाळापर्यंत रुजत गेली आहे. ते समजून घेतले आहे. तसेच, त्या लोकशाही विकेंद्रीकरणाचे स्वरूप त्याची व्यापकता याचा विचार देखील केला आहे. लोकशाही विकेंद्रीकरण घडवून आणण्यासाठी केंद्र सरकारने वेळोवेळी ज्या विविध समित्या गठीत केल्या आहेत. त्या सर्व समित्यांच्या शिफारशींच्या आधारे लोकशाही विकेंद्रीकरण प्रक्रिया ग्रामीण पातळीपर्यंत रुजवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळेच खऱ्या अर्थाने भारतात लोकशाही यशस्वी होताना दिसत आहे. जागतिक पातळीवर भारताला जे महत्त्व आज प्राप्त झाले आहे ते केवळ ग्रामीण पातळीपर्यंत लोकशाही विकेंद्रीकरण घडून आल्यामुळेच शक्य झाले आहे. एवढेच नव्हे तर जागतिक पातळीवर भारत आज D-१० या लोकशाहीवादी गटाचे नेतृत्व करत आहे. यावरून भारतातील लोकशाही प्रक्रियेची प्रचिती नक्कीच आपल्याला येत आहे.

**आपली प्रगती तपासा :- (सरावासाठी महत्वपूर्ण प्रश्न)**

(१) भारतातील लोकशाही विकेंद्रीकरण प्रक्रियेचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा?

(२) भारतातील लोकशाही विकेंद्रीकरण समित्याची भूमिका यावर भाष्य करा?

(३) सामुदायिक विकास कार्यक्रम समजावून सांगा?

(४) ७३ व्या घटनादुरुस्तीतील प्रमुख तरतुदी स्पष्ट करा?

(५) त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेतील वित्तीय विकेंद्रीकरण याची चर्चा करा?

munotes.in

## संदर्भ :-

(१) Surat Singh, (2004) Decentralised Governance In India MYTH AND Reality, New Delhi.

(२) Dr. T.M. Joseph, (2009) Decentralised Governsnce and Devlopment, New Delhi.

(३) अशोक शर्मा, (२०२२) भारत में स्थानीय प्रशासन, आर. बी. एस. ए. पब्लिशर्स, जयपुर.

(४) डॉ. श्याम शिरसाट व प्रा. भगवानसिंग बैनाडे, (२०१४) पंचायती राज आणि नागरी प्रशासन, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

(५) डॉ. पंडित नलावडे, (२००८) सत्ता विकेंद्रीकरण आणि ७३ वी संविधान दुरूस्ती, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

(६) प्रा. बिराजदार व प्रा. घोडके, (१९९९) भारतातील स्थानिक स्वशासन संस्था, अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर.

❊❊❊❊❊❊

munotes.in

# ३

# पंचायतराज आणि ग्रामीण विकास

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

३.३.१ पंचायतराज आणि ग्रामीण विकास

३.३.२ ग्रामीण विकासाचे महत्त्वाचे कार्यक्रम

## ३.१ उद्दिष्टे

**पंचायतराज आणि ग्रामीण विकास** या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. ग्रामीण विकासाची उद्दिष्टे समजण्यास मदत होईल.

२.ग्रामीण विकासाची संकल्पना समजण्यास मदत होईल.

३.ग्रामीण विकासाच्या विविध योजनांची माहिती होईल.

## ३.२ प्रास्ताविक

खरा भारत ग्रामीण भारतात आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था हा भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया आहे. ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट पाहता ज्यामध्ये विविध ग्रामीण आर्थिक विभागांचा एकाचवेळी विकास समाविष्ट आहे. शेतीची नफा वाढवणे, परंपरागत ग्रामीण उपक्रमांचे संरक्षण, निराधारपणा दूर करणे, बेरोजगारी दूर करणे, ग्रामीण लोकांच्या पगाराची पातळी वाढणे, ग्रामीण भागात दळणवळणाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देणे हे ग्रामीण विकासाचे भाग आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुव्यवस्थित विकासाच्या पहिल्या दीर्घकालीन योजनेची सुरुवात ग्रामीण विकासावर करून समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि स्वावलंबनाच्या तत्त्वावर अवलंबून असलेल्या आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या पूर्ततेसाठी ग्रामीण पुनरुत्पादन आणि विकासासाठी वेळोवेळी प्रयत्न केले जातात.

महात्मा गांधींचा ग्रामीण विकास कार्यक्रम "सर्वोदय" वर अवलंबून आहे.ग्रामीण विकासाचे त्यांचे आराखडे मुद्दे, पाहता त्यांना अपेक्षित असलेलज "ग्राम स्वराज" हे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेवर आधारित आहे. त्यासाठी व्यक्तींच्या सहभागासह, पंचायतींना अधिकार, क्षमता देऊन सरकारने आपले दायित्व निभावले पाहिजे हा हा विचार डोळ्यापुढे ठेवून ग्रामपंचायती, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांचा समावेश असलेल्या पंचायतीराज संस्थां ह्या ग्रामीण विकास कार्यक्रमांच्या फलदायी अंमलबजावणीसाठी कशा सक्षम होतील याचा विचार शासनाने आज केलेला आहे. त्यामुळे ग्रामीण विकास आणि पंचायतराज यांचा जवळचा सहसंबंध येतो.

## ३.३ विषय विवेचन

भारतातील ग्रामीण जीवनाचा विकास पंचायतींवर अवलंबून आहे. पंचायतींच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा आर्थिक, सामाजिक आणि राजकीय विकास अनन्यसाधारणपणे होऊ शकतो. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी समर्पकपणे सांगितले आहे की भारताच्या एकतेसाठी तीन घटक आवश्यक आहेत, लोक गट विकास उपक्रम, उत्कृष्ट पंचायती आणि चांगली गावे जे की सह-रोजगारची सामाजिक व्यवस्था निर्माण करतील. या तीन घटकांवर आपल्या राष्ट्राची विकासाची स्थिती इतकी भक्कम आणि मजबूत होईल की ते विविध प्रकारच्या राजकीय आणि आर्थिक संकटांवर मात करू शकेल. त्यासाठी आपणास प्रशासकीय अधिकाराचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे.त्यासाठी पंचायतराजच्या माध्यमातून ग्रामपंचायतीने लोकांच्या गटांमध्ये एकत्र काम करण्याची, जबाबदारीची जाणीव करून देऊन, सार्वजनिक हिताच्या गोष्टी समजून घेणे आणि सहकार्य यातून ग्रामविकास होऊ शकेल. त्यामुळे ग्रामविकासाच्या दृष्टिकोनातून रस्ते, नाले, शाळा, प्राथमिक आरोग्य, निवासस्थान आणि घरांच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याच्या सामूहिक बांधिलकीमुळे संपूर्ण गावाकडे एक कुटुंब म्हणून पाहण्याची प्रवृत्ती लोकांमध्ये निर्माण झाली तरच खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास होऊ शकतो ह्या दृष्टिकोनाचा विचार करून आज ग्रामीण विकास आणि पंचायतराज या दोन्ही संकल्पना एकत्र आलेल्या आहेत. त्यामुळे महात्मा गांधी यांच्या स्वराज्य आणि रामराज्याच्या कल्पनांना यातूनच काही प्रमाणात आकार मिळू शकणार आहे.

### ३.३.१ पंचायतराज आणि ग्रामीण विकास

आर्थिक विकास व विकासाची फळे जोपर्यंत ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुतांश जनतेला मिळण्यासाठी चांगल्या सोयी - सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे तेव्हाच त्यांना सन्मानाने जीवन जगता येईल. तोपर्यंत त्यांना विकासाची फळे चाखायला मिळणार नाहीत. तोपर्यंत त्यांचा विकास पूर्ण होऊ शकणार नाही हे आता एक वास्तव झाले आहे.आज ग्रामीण आणि शहरी भागातील विकासाची दरी वाढत असून ती कमी करण्यासाठी झपाट्याने ग्रामीण विकास करणे आवश्यक आहे. मागील काही दशकांत प्रयत्न करूनही भारतातील गरिबीचे प्रमाण ग्रामीण भागात जास्त आहे. ते प्रमाण कमी करण्यासाठी स्वयंरोजगार कार्यक्रमाला महत्त्व देणे फार महत्त्वाचे आहे.

ग्रामीण विकास म्हणजे लोकांची आर्थिक उन्नतीद्वारे मोठे सामाजिक परिवर्तन करणे होय. ग्रामीण विकास कार्यक्रमांमध्ये लोकांचा वाढता सहभाग, नियोजनाचे विकेंद्रीकरण, जमीन सुधारणांची उत्तम अंमलबजावणी आणि ग्रामीण जनतेला चांगल्या सेवा व संधी उपलब्ध करून देण्यासाठी अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया ग्रामीण विकासात समाविष्ट आहे.

सुरुवातीला काळात विकासाचे मुख्य लक्ष्य कृषी, उद्योग, दळणवळण, शिक्षण, आरोग्य आणि संबंधित क्षेत्रांवर ठेवण्यात आला होते. नंतरच्या काळात, तळागाळातील लोकांच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभागाने सरकारी प्रयत्नांना पुरेशा प्रमाणात पूरक ठरले तरच वेगवान विकास होऊ शकतो, हे लक्षात आल्याने आता देशातील प्रत्येक सरकार ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेचे स्वरूप बदलत आहे.

ग्रामीण विकासाच्या संदर्भात ३१ मार्च १९५२ रोजी, समुदाय विकासाशी संबंधित कार्यक्रमांचे व्यवस्थापन करण्यासाठी नियोजन आयोगाच्या अंतर्गत समुदाय प्रकल्प प्रशासन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्थेची स्थापना करण्यात आली. २ ऑक्टोबर १९५२ रोजी उदघाटन करण्यात आलेला समुदाय विकास कार्यक्रम हा ग्रामीण विकासाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा होता. वर्षानुवर्षे मिळालेल्या अनुभवाने ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत आणि गरिबांच्या गरजा लक्षात घेऊन, अनेक कार्यक्रमांमध्ये बदल केले गेले आणि नवीन कार्यक्रम सादर केले गेले. ग्रामीण गरिबी दूर करणे आणि ग्रामीण लोकसंख्येचे विशेषतः दारिद्र्यरेषेखालील लोकांचे जीवनमान सुधारणे हा ग्रामीण विकासातील महत्त्वाचा टप्पा ठरतो. त्यामुळे सरकारने आर्थिक सुधारणेची फळे समाजातील सर्व विभागांना मिळतील याची खात्री करण्यासाठी, ग्रामीण भागातील जीवनमानासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या सामाजिक आणि आर्थिक पायाभूत सुविधांचे पाच घटक

ओळखुन त्यात आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी, घर आणि रस्ते याला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे .या क्षेत्रातील प्रयत्नांना अधिक गती देण्यासाठी सरकारने प्रधानमंत्री ग्रामोदय योजना (PMGY) सुरू केली आणि PMGY च्या पिण्याचे पाणी, घरे आणि ग्रामीण रस्ते या घटकांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ग्रामीण विकास मंत्रालयाकडे सोपवलेली आहे.

नवव्या योजनेच्या कालावधीत, ग्रामीण गरिबांना वाढीव लाभ देण्यासाठी कार्यक्रमांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी अनेक दारिद्र्य-विरोधी कार्यक्रमांची पुनर्रचना करण्यात आली. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP), ग्रामीण भागातील महिला आणि मुलांचा विकास (DWCRA), ग्रामीण कारागिरांना सुधारित टूल-किट्सचा पुरवठा (SITRA), ग्रामीण युवकांना स्वयंसाठी प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगार कार्यक्रमांची पुनर्रचना करण्यात आली. रोजगार (TRYSEM), गंगा कल्याण योजना (GKY) आणि दशलक्ष विहिरी योजना (MWS) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (SGSY) अशा अनेक योजना भारत सरकारने ग्रामीण विकासासाठी राबवलेल्या आहेत.

स्थानिक लोकांच्या गरजा आणि आकांक्षा लक्षात घेऊन, पंचायतीराज संस्था शासनाच्या ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी झाल्या आहेत. पंचायतराज संस्था या योजना आणि त्याच्या अंमलबजावणीच्या विकेंद्रित विकासाचा मुख्य गाभा ठरत आहेत.भारतीय राज्यघटनेच्या ७३ व्या दुरुस्ती कायद्यानुसार पंचायतराजला आवश्यक प्रशासकीय आणि आर्थिक अधिकार त्वरीत हस्तांतरित करण्यासाठी ग्रामीण विकास मंत्रालय राज्य सरकारांशी जोरदारपणे पाठपुरावा करत आहे. तसेच २५ डिसेंबर २००२ रोजी शासनाने पेयजल क्षेत्रांतर्गत, 'स्वजल धारा' हा नवीन उपक्रम सुरू करून तो पंचायतींना पिण्याच्या पाण्याचे प्रकल्प तयार करणे, कार्यान्वित करणे, चालवणे आणि देखरेख करण्याचे अधिकार देतो. विकास प्रक्रियेत पंचायतराजचा आणखी समावेश करण्यासाठी, २७ जानेवारी २००३ रोजी माननीय पंतप्रधानांनी 'हरियाली' हा नवीन उपक्रम सुरू केला.

ग्रामीण भारताच्या विकासासाठी ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण महत्त्वाचे आहे हे लक्षात घेऊन, या विभागाला पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यासाठी गरिबी निर्मूलनाच्या कार्यक्रमांमध्ये महिला घटकाची ओळख करून दिली जाते. ७३ वी घटनादुरुस्तीने पंचायतराजमध्ये महिलांसाठी निवडक पदांवर आरक्षणाची तरतूद केली आहे. राज्यघटनेने आर्थिक विकास



munotes.in

आणि सामाजिक न्यायाचे विविध कार्यक्रम तयार करण्याची आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी पंचायतींवर मोठी जबाबदारी टाकली आहे आणि पंचायतींच्या माध्यमातून अनेक केंद्र पुरस्कृत योजना राबवल्या जात आहेत. अशा प्रकारे, महिला सदस्य आणि पंचायतींच्या अध्यक्षांना, जे मुळात पंचायतीमध्ये नवीन प्रवेश करतात, त्यांना आवश्यक कौशल्ये आत्मसात करावी लागतात आणि त्यांना नेते आणि निर्णयकर्ते म्हणून त्यांची योग्य भूमिका स्वीकारण्यासाठी योग्य दिशा दिली पाहिजे. म्हणून पंचायतराजच्या निवडून आलेल्या प्रतिनिधींना प्रशिक्षण देणे ही मुख्यतः राज्य सरकारे/केंद्रशासित प्रदेश प्रशासनाची जबाबदारी आहे. ती जबाबदारी ओळखून ग्रामीण विकास मंत्रालय प्रशिक्षण कार्यक्रमांची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि पंचायतराजच्या निवडून आलेल्या सदस्यांसाठी आणि कार्यकर्त्यांसाठी क्षमता निर्माण उपक्रमांना उत्प्रेरित करण्यासाठी राज्ये/केंद्रशासित प्रदेशांना काही आर्थिक सहाय्य देखील करत आहे.अकराव्या योजनेत केंद्रीय अर्थसंकल्पातून ग्रामीण आणि शेती क्षेत्राला प्रचंड संसाधने देण्यात आली. या जोरामुळे भारत निर्माण कार्यक्रमाचे मूलतत्त्व तयार झाले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याने ग्रामीण विकासाला मोठा आधार दिला आहे.

खेड्याच्या विकासाकरीता म.गांधीजींनी “खेड्याकडे चला” हा नारा दिला त्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागाच्या विकासासाठी पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आणली. पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासाकरीता २ ऑक्टोबर २००० च्या शासन निर्णयानुसार शासनाच्या विविध विभागातील महत्त्वाच्या योजना जिल्हा परिषदाकडे हस्तांतर करण्याबाबत आदेश दिले आहेत. ग्रामीण भागाच्या विकासाकरीता कृषी,नियोजन, समाजकल्याण, महिला व बालकल्याण, सार्वजनिक आरोग्य, पाणी पुरवठा व स्वच्छता, सांस्कृतिक कार्य, यांच्या १२९ योजना जिल्हा परिषदाकडे हस्तांतरीत केल्या आहेत. त्या योजनाच्या माध्यमातून महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील सार्वजनिक आरोग्य व वैयक्तिक स्वच्छतेबाबत "संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी" शुद्ध पाणी स्वच्छ गाव "हा ध्येय असलेला ग्रामीण जनतेसाठी व जनतेने राबवायचा प्रकल्प म्हणजे "जलस्वराज्य प्रकल्प" यशस्वीरित्या राबविले आहेत." जल स्वराज्यच्या माध्यमातून पाणी पुरवठा , ग्रामीण स्वच्छता , महिला

सबलीकरणावर विशेष भर देण्यात आला आह . संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत "दारिद्र रेषेखालील लोकांना अतिरिक्त रोजगार पुरवून"धान्याच्या मोबदल्यात काम " उपलब्ध करून देऊन रोजगार उपलब्ध करून दिला आहे. त्यातून जलभुमी संधारणाची कामे,शेततळ्याची काम फार मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहेत. स्वर्ण ग्राम जयंती ग्राम स्वयंरोजागर योजने अंतर्गत ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर लहान उद्योग स्थापन करून देऊन तेथील गरीब जनतेला स्थिर व कायमस्वरूपी उत्पन्न मिळवून दिले आहे. वैयक्तिक लाभाच्या योजनामध्ये जिल्हा परिषदेच्या " महिला व बालकल्याण समितीमार्फत शाळेत जाणाऱ्या मुलींना सायकली पुरविणे,अंगणवाड्या सुरू करणे, स्त्रियांसाठी मोफत शिलाई मशीन वाटप, गावात वाचनालय, प्रौढ शिक्षण शिबीरे,रोगनिदान शिबीरे, महिलांसाठी सुलभ शौचालये, अशा एकूण २४ योजना राबविण्यात येत आहेत.शालेय शिक्षण विभागाअंतर्गत, अहिल्यादेवी होळकर मुलींना मोफत प्रवास योजना, दुर्बल घटकातील मुलींना उपस्थितीभत्ता,आदर्श स्त्री शिक्षका पुरस्कार, योजना राबविण्यात येत आहेत.सार्वजनिक आरोग्य विभागातंर्गत,मातृत्व अनुदान

munotes.in

योजना,राष्ट्रीय पुनरूत्पादीत व बाल आरोग्य कार्यक्रम , सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना,२४ तास प्रसुती सेवा अवघड प्रसुतीसाठी वाहन सुविधा, सामाजिक न्याय , सांस्कृतिक कार्य , क्रीडा विभागामार्फत ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलांना शिष्यवृत्ती , आर्थिकदृष्ट्या मागास मुलांकरीता शासकीय वसतिगृह , मागासवर्गीय मुलां - मुलीकरीता शासकीय वसतिगृह ग्रामविकास योजनेअंतर्गत इंदिरा आवस योजना, कृषी व पशुसंवर्धन विभागांतर्गत दुधाळ जनावरांची वाटप , शेळ्याचे वाटप, कृषी अवजारे यांची वाटप करण्यात येत आहे. ग्रामीण विकासाच्या अनेक योजना पंचायतराजच्या माध्यमातून आज राज्यात व देशात राबवल्या जात आहेत त्यामुळे पंचायतराज व ग्रामीण विकासाचा सहसंबंध अत्यंत जवळचा असल्याचे दिसून येते.

**ग्रामीण विकास म्हणजे काय?**

ग्रामीण विकासाच्या संकल्पनेचा अर्थ अनेक वेगवेगळ्या प्रकारे लावला जाऊ शकतो, परंतु त्याच्या केंद्रस्थानी विकासाचा असा एक दृष्टीकोन आहे तो म्हणजे समाज म्हणून आपल्याला भेडसावणाऱ्या गरिबी, असमानता, हवामान बदल, पर्यावरणाचा ऱ्हास,सामाजिक आणि आर्थिक मर्यादा, शांतता आणि न्याय याचा विचार करता आपण आज ज्या पद्धतीने विकासाकडे पाहतो त्याचा प्रत्येकावर परिणाम होतो. एक समाज म्हणून आपल्या स्वतःच्या निर्णयांचे परिणाम लोकांच्या जीवनावर खूप परिणाम करतात. ग्रामीण भागात विविध वैशिष्ट्ये आणि भौगोलिक विविधता असते. शहरी भागांजवळील चांगल्या सेवा असलेल्या समुदायांपासून ते मूलभूत सेवांपर्यंत वंचित राहताना आपल्याला दिसून येतात.ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था आणि स्थानिकांना सक्षम करणे आणि वेगाने बदलणाऱ्या जगात त्यांना सामावून घेण्यासाठी ग्रामीण विकास हा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. आरोग्य सेवा, शिक्षण आणि रहिवासी कोठे राहतात याची पर्वा न करता त्यांना सामान्य हिताच्या इतर सेवा देणे हे ग्रामीण विकासात अभिप्रेत आहे.म्हणून ग्रामीण विकासाची संकल्पना ही सर्वसमावेशक आहे.

**कार्ल टेलर यांच्या मते** "ग्रामीण विकास ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये ग्रामीण लोक आपली आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती सुधारावी यासाठी प्रयत्नशील राहून आणि त्या प्रक्रियेत सहभागी होऊन आपल्या राष्ट्रीय विकासाच्या कार्यक्रमात आपल्या समूहाला एक प्रभावशाली समूह बनवतात."

**जी . पार्थसारथी यांच्या मते** "ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या निम्नवर्गातील लोकांना त्यांच्या भौतिक आणि मानवी साधनसंपत्तीचा योग्यप्रकारे उपयोग करण्याच्या संधी देऊन त्यांचे जीवनमान उंचावणे हा ग्रामीण विकासाचा निर्णायक घटक असून ग्रामीण साधनसंपत्तीच्या आपल्या विकासात योग्य तो उपयोग करून घेणे हा आहे."

**रॉबर्ट मॅकनामारा यांच्या मते** "ग्रामीण भागातील दुर्बल घटक म्हणजे छोटे शेतकरी, भूमीहीन शेतमजूर आणि ग्रामीण कारागीर यांच्या विकासावर भर देऊन ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे म्हणजे ग्रामीण विकास होय."

**डॉ . स्वामीनाथन यांच्या मते** "ग्रामीण भागातील दुर्बल घटकांना सक्षम करण्याची प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय" .

**योजना आयोगाच्या मते** " ग्रामीण विकास योजना ही अशी विकास पद्धती आहे की , जिच्याद्वारे पंचवार्षिक योजना खेड्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात संपूर्ण बदल घडवून आणण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा प्रयत्न करते. "

**जागतिक बँक आणि विकास क्षेत्रीय धोरण प्रबंध :** ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात सुधारणा करण्यासाठी तयार करण्यात आलेली व्यूहरचना म्हणजे ग्रामीण विकास होय. "

**ग्रामीण विकासात पुढील गोष्टी अभिप्रेत आहेत**

- मानवी संसाधनांचा विकास समावेश
- साक्षरता, विशेषतः, महिला साक्षरता, शिक्षण आणि कौशल्य विकास
- चांगले आरोग्य, आणि स्वच्छतेला प्रोसहित करणे
- सार्वजनिक आरोग्य
- जमीन सुधारणा
- उत्पादकांचा विकास
- पायाभूत सुविधांचा विकास जसे वीज, सिंचन, पत, विपणन, वाहतूक सुविधा गावाच्या बांधकामासह जवळपासचे रस्ते आणि फीडर रस्ते महामार्ग, शेतीसाठी सुविधा संशोधन आणि विस्तार, आणि माहिती प्रसार
- गरीबी निर्मूलनासाठी विशेष उपाय आणि राहणीमानात लक्षणीय सुधारणा घडवून आणणे

ग्रामीण विकास साधण्यासाठी केंद्र पातळीवर व राज्य पातळीवर ग्रामविकास मंत्रालय स्थापन करण्यात आलेली आहेत.

**ग्रामीण विकास मंत्रालय**

ग्रामीण भागातील विकास आणि कल्याणकारी उपक्रमांसाठी स्वतंत्र मंत्रालय असल्याने, ग्रामीण विकास मंत्रालय देशाच्या सर्वांगीण विकास धोरणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. ग्रामीण भारताची शाश्वत आणि सर्वसमावेशक वाढ हे मंत्रालयाचे ध्येय आणि उद्दिष्ट आहे. ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारे गरिबी निर्मूलनाच्या बहुआयामी धोरणाद्वारे उपजीविकेच्या संधी वाढवणे, सामाजिक सुरक्षा जाळे प्रदान करणे आणि विकासासाठी पायाभूत सुविधा विकसित करणे यावर प्रामुख्याने भर आहे. ग्रामीण विकास मंत्रालयाच्या योजनांमुळे ग्रामीण भारतातील जीवनमान सुधारणे आणि विकासात्मक असमतोल दूर करणे करणे अपेक्षित आहे. ग्रामीण विकास मंत्रालयाच्या योजना समाजातील बहुतांश वंचित घटकांपर्यंत पोहचवून सामाजिक न्यायाची भूमिका ग्रामीण विकास मंत्रालय निभवताना दिसते.

**ग्रामीण विकास मंत्रालयाची उद्दिष्टे:**

दारिद्र्यरेषेखालील (BPL) कुटुंबांवर लक्ष केंद्रित करून महिला आणि इतर असुरक्षित घटकांसह गरजूंना उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देणे.

मागणी करणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला प्रत्येक आर्थिक वर्षात किमान १०० दिवसांचा हमी मजुरीचा रोजगार उपलब्ध करून देऊन ग्रामीण भागातील कुटुंबांच्या जीवनमानाची सुरक्षा वाढवणे.

संपर्क नसलेल्या ग्रामीण वस्त्यांसाठी ग्रामीण दळणवळणाची तरतूद आणि बाजारपेठेत प्रवेश देण्यासाठी विद्यमान रस्त्यांची पुनर्बांधणी करणे.

ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना मूलभूत घरे उपलब्ध करून देणे.

वृद्ध, विधवा आणि अपंग व्यक्तींना सामाजिक सहाय्य प्रदान करणे.

ग्रामीण जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी ग्रामीण भागात शहरी सुविधा उपलब्ध करून देणे.

ग्रामीण विकास कर्मचाऱ्यांचा क्षमता विकास आणि प्रशिक्षणावर भर देणे.

ग्रामीण विकासासाठी स्वयंसेवी संस्था आणि व्यक्तींच्या सहभागाला प्रोत्साहन देणे.

**ग्रामीण विकास मंत्रालय मार्फत ग्रामविकासाच्या राबवल्या जाणाऱ्या योजना**

ग्रामीण विकास मंत्रालयामार्फत ग्रामीण भागात खालील प्रमुख कार्यक्रम राबवले जात आहेत,

मजुरी रोजगार देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा),

स्वयंरोजगार आणि कौशल्य विकासासाठी राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (NRLM),

सर्वांसाठी घरे : प्रधानमंत्री आवास योजना - दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना घरे देण्यासाठी ग्रामीण (PMAY-G),

दर्जेदार रस्त्यांच्या बांधकामासाठी प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY),

सामाजिक निवृत्ती वेतनासाठी राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम (NSAP),

श्यामा प्रसाद मुखर्जी मिशन.

जमिनीची उत्पादकता सुधारण्यासाठी एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP).

माहिती, शिक्षण आणि संप्रेषण; आणि देखरेख आणि मूल्यमापन इ.

याव्यतिरिक्त, मंत्रालयाकडे ग्रामीण कार्यकर्त्यांच्या क्षमता विकासासाठी योजना देखील आहेत;

## ३.३.२ ग्रामीण विकासाचे महत्त्वाचे कार्यक्रम

### a) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना




munotes.in

भारत सरकारने प्रत्येकाच्या हाताला रोजगार देण्यासाठी महाराष्ट्र राज्य रोजगार हमी योजनेप्रमाणे देशाच्या ग्रामीण भागात अतिरिक्त रोजगार पुरवून बेकारी व दारिद्र्याची समस्या सोडविणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून भारत सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना विधेयक २००५ मध्ये मंजूर केले आणि २ फेब्रुवारी २००६ पासून या कायद्याची अंमलबजावणीला सुरुवात झाली. आंध्र प्रदेशातील अनंतपुर जिल्ह्यातून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा शुभारंभ करण्यात आला. सर्वप्रथम ही योजना फक्त २०० जिल्ह्यात सुरू करण्यात आली होती. दुसऱ्या टप्प्यात सन २००७- ८ पासून ही योजना देशातील उर्वरित १३० जिल्ह्यांमध्ये लागू करण्यात आली. प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेल्या या योजनेचे यश बघून ०१एप्रिल २००८ पासून या योजनेला संपूर्ण देशभर लागू करण्यात आले आहे. २ ऑक्टोंबर २००९ रोजी या योजनेचे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना असे नामकरण करण्यात आले.

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची वैशिष्ट्ये**

- प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला शंभर दिवसाच्या रोजगाराची संधी.
- राहण्याचे ठिकाणापासून पाच किलोमीटरच्या आत काम उपलब्ध करून देणे.
- कामाच्या ठिकाणी वैयक्तिक सुविधा तसेच कामगारांच्या लहान मुलांना सोयी सुविधा उपलब्ध करून देणे.
- नाव नोंदणी नंतर पंधरा दिवसात काम उपलब्ध करून देणे अन्यथा बेरोजगारी भत्ता पहिल्या महिन्यात १५ रुपये दुसऱ्या महिन्यात ३० रुपये प्रति दिवस देणे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांना सामील करून घेणे व ५० टक्के कामे त्यांच्या देखरेखी खाली करणे.
- रोजगार भत्ता ६० रुपये व प्रत्येक कुटुंबाला जास्तीत जास्त ८००० रुपयांपर्यंत काम उपलब्ध करून देणे.
- कामाची मागणी करणाऱ्या कुटुंबास ग्रामपंचायतीकडे नोंदणी करणे आवश्यक असून नोंदणीनंतर प्रत्येक कुटुंबास रोजगार पत्रक जॉब कार्ड दिले जाते.
- कामाचे व खर्चाचे ग्रामसभेकडून सामाजिक लेखा परीक्षण होत असल्यामुळे कामात पारदर्शकता.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून होणारी कामे**

सिंचनाची कामे, मृद संधारण व भूविकासाची कामे, वनीकरण व सामाजिक वनीकरणाची कामे, ग्रामीण रस्ते व इतर गावांतर्गत रस्ते

**महाराष्ट्रातील राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना**

महाराष्ट्रात रोजगार हमी अधिनियमाची अंमलबजावणी १९७७ पासून महाराष्ट्रात सुरु झाली. राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ नुसार दोन योजना सुरु होत्या.

१. ग्रामीण भागात अकुशल व्यक्तींकरिता रोजगार हमी योजना व

२. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ कलम १२(ई) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना.

सदर योजनांना राज्य शासनाच्या निधीतून अर्थसहाय्य केले जात होते.

सन २००५ मध्ये केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (विद्यमान नाव - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा) लागू केला. तसेच केंद्र शासनाने ज्या राज्यांनी पूर्वीपासून रोजगार हमी अधिनियम मंजूर केला होता, अशा राज्यांना केंद्र शासनाच्या अधिनियमातील कलम २८ अन्वये त्यांचा कायदा राबविण्याची मुभा दिली होती.

त्यानुसार महाराष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये पुर्वीचा कायदा ठेवण्याचा पर्याय स्विकारला आहे. मात्र, विधानमंडळाने केंद्रिय कायद्यास अनुसरुन राज्यास निधी मिळवण्याच्या अनुषंगाने १९७७ च्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपध्दतीत बदल झाला आहे.

सद्य:स्थितीत राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियिम, १९७७ (दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारीत) अंमलात आहे व या कायद्यांतर्गत खालील दोन योजना सुरु आहेत:-

अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र (MGNREGS) या योजनेंतर्गत केंद्र शासन १०० दिवस प्रति कुटुंब रोजगाराची हमी देते व १०० दिवस प्रति कुटुंब मजुरीच्या खर्चासाठी निधी पुरवते. प्रति कुटुंब १०० दिवसावरील प्रत्येक मजुराच्या, मजुरीच्या खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते.

ब) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ सुधारीत कलम (१२) (ई) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना अनुदान तत्वावर प्रतिपूर्ती योजना म्हणून राबविण्यात येतात.

उदा. : १) सिंचन विहिर योजना

२) रोहयोंतर्गत फळबाग लागवड योजना.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्राची वैशिष्टये**

महाराष्ट्रातीली नोंदणीकृत ग्रामीण घरातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीस अकुशल रोजगाराचा हक्क कुटुंबनिहाय (household) जॉब कार्ड.

नोंदणीकृत कुटुंबाला वित्तीय वर्षात किमान १०० दिवस प्रती कुटुंब केंद्रीय निधीतून अकुशल रोजगाराची हमी तसेच आवश्यक ज्यादा दिवसांसाठी राज्यनिधीतून अकुश्ल रोजगाराची हमी.

कायद्याच्या अंमलबजावणीची प्राथमिक जबाबदारी ग्रामपंचायतीची.

प्रतिदिन मजूरीचे दर केंद्रशासन निश्चित करेल.

केंद्रशासनाने ठरविलेल्या दराप्रमाणे मजूरास मजूरी मिळेल. अशा प्रकारचे दरपत्रक राज्यशासन निश्चित करेल. कामाप्रमाणे दाम, स्त्री – पुरुष समान दर.

काम केल्यावर जास्तीतजास्त १५ दिवसात मजूरी वाटप.

कामासाठी नाव नोंदणी केलेल्या मजुराने किमान १४ दिवस सलग काम करणे आवश्यक.

एका ग्रामपंचायत हद्दीत काम सुरु करण्यासाठी किमान १० मजूर आवश्यक ही अट डोंगराळ भाग व वनीकरण कामासाठी शिथिलक्षम.

मजुरीचे वाटप मजुराच्या बँक वा पोस्ट बचतखात्यात.

गावाच्या ५ किमी परिसरात रोजगार देणे. कोणत्याही परिस्थितीत पंचायत समिती क्षेत्राबाहेर नाही.

कामावर कंत्राटदार लावण्यारस बंदी.

मजुरामार्फत करता येण्यासारख्या कामावर मशीनरी लावण्यास बंदी.

राज्यशासनास सल्ला देणारी महाराष्ट्र रोजगार हमी परिषद.

सर्व माहिती कामावर, ग्रामपंचायत व वेबसाईटवर उपलब्ध करुन देणार.

कामाचे सामाजिक अंकेषण (social audit) व पारदर्शकता.

तक्रार निवारण

**महाराष्ट्रातील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना व रोजगार हमी योजनेचा तुलनात्मक अभ्यास**

म.गां.रा.ग्रा.रो. हमी योजना व राज्य रोजगार हमी योजना"म.गां.रा.ग्रा.रो. हमी योजना व राज्य रोजगार हमी योजना

| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | राज्य रोजगार हमी योजना |
|---|---|
| खर्चाच्या किमान 50 टक्के कामे ग्रामपंचायतीमार्फत व त्यास ग्रामसेभेची मान्यता | लाईन डिपार्टमेंटकडून अंमलबजावणी ग्रामपंचायतीची भूमीका |
| कंत्राटदारावर बंद | कुशल कामाकरिता कंत्राटदारांना परवागनी |
| बँक / पोस्टामार्फत ऑनलाईन रिपोटिंग व संनियंत्रण | रोखीने मजुरीवाटप |
| संगणक प्रणालीद्वारेऑनलाईन रिपोर्टिंग व संनियंत्रण | ऑनलाईन रिपोटिंग नाही |
| सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता | सामाजिक अंकेक्षण नाही |
| जॉब कार्डची आवश्यकता | जॉबकार्ड बंधनकारक नाही |
| 100 दिवसांच्या रोजगाराची केंद्रशासनाची हमी व त्यानंतर राज्यशासनाची हमी | 365 दिवसांच्या कामाची हमी |
| लेबर बजेट व जिल्हापरिषदेची मान्यता | |
| भूसंपादनाकरिता स्वतंत्र निधीची तरतूद नाही | |

munotes.in

## महाराष्ट्रातील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना व रोजगार हमी योजनेच्या वैयक्तिक योजनांचा तुलनात्मक अभ्यास

राज्य-रोहयो-अंतर्गत-वैयक्तिक-लाभाच्या-योजना

| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | राज्य रोजगार हमी योजना |
|---|---|
| 1. केंद्रिय कायदयाच्या परिशिष्ट 1 मधील कलम 1(iv) प्रमाणे | 1. राज्य रोहयो कायदयाच्या कलम 7(2)(x) प्रमाणे |
| 2. **योजना**<br>अ) मग्रारोहयो विहिरी<br>ब) शेततळे (यंत्रसामुग्रीचा वापर न करता)<br>क) फळबाग लागवड<br>ड) भूसुधारणा | 2. **योजना**<br>अ) जवाहर विहिरी<br>ब) रोहयो फळबाग लागवड<br>क) रोहयो तुती लागवड<br>ड) खाजगी पडीक जमिनीवर वृक्ष लागवड<br>ई) शेततळे |
| 3. प्रत्यक्ष कामावर येणारा खर्च शासनाकडून करण्यात येतो. | 3. अनुदान पध्दतीची प्रतिपूर्ती योजना |
| 4. जॉब कार्ड आवश्यक आहे | 4. जॉब कार्ड आवश्यक नाही. |
| 5. ग्रामसभेद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येते व गटविकास अधिकारी प्रशासकीय मान्यता देतात | 5. विविध स्तरावर मान्यता |
| 6. सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीकडून अंमलबजावणी | 6. विविध यंत्रणांकडून अंमलबजावणी |
| 7. यंत्रसामुग्री वापण्यास मुभा नाही. | 7. प्रतिपूर्ती योजना असल्याने यंत्रसामुग्री वापण्यास मुभा आहे. |
| 8. 15 दिवसात मजुरी प्रदान करणे | 8. 15 दिवसात अनुदान देणे बंधनकारक नाही |
| 9. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमीकायदयातील तरतुदीनुसार परिच्छेद 2 मधील लाभार्थ्यांची निवड करण्यात येते | 9. राज्यशासनाच्या निकषांप्रमाणे लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. |
| 10. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक | 10. राज्यशासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक. |

munotes.in

### b) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान NRHM

भारताने गेल्या काही दशकांमध्ये आयुर्मान सुधारणे, जन्माच्या वेळी होणारे बाल मृत्यू कमी करणे, तसेच अर्भक मृत्युदर कमी करण्यात लक्षणीय प्रगती नोंदवली आहे. परंतु ही प्रगती होत असतानाही, लोकसंख्येच्या मोठ्या प्रमाणात, विशेषत: ग्रामीण भागात, टाळता येण्याजोगे रोग, गर्भधारणा आणि बाळाच्या जन्माशी संबंधित गुंतागुंत तसेच कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू देशातील आरोग्य यंत्रणा आव्हानात्मक तोंड देत आहे.

संपूर्ण देशात उपचारात्मक आरोग्यापेक्षा प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांवर सार्वजनिक खर्चाला कमी प्राधान्य आहे. आरोग्यावरील भारतीय सार्वजनिक खर्च जगात सर्वात कमी आहे, तर आरोग्यावरील खाजगी खर्चाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. आरोग्यावर घरगुती खर्च म्हणून दरवर्षी १००,००० कोटी रुपये खर्च केले जात आहेत, जे आरोग्यावरील सार्वजनिक खर्चाच्या तिप्पट आहे. खाजगी क्षेत्रातील आरोग्य सेवा अनियंत्रित आहेत ज्यामुळे आरोग्य सेवेची किंमत वाढते आणि ती ग्रामीण गरिबांना परवडणारी नाही.आरोग्य सेवेचा वाढता खर्च आणि लोकांच्या वाढत्या अपेक्षा पाहता दुर्गम ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्य सेवेचे आव्हान गरजेच्या भावनेने पेलले पाहिजे. आरोग्य सेवांच्या समस्येची व्याप्ती आणि विशालता लक्षात घेता, यापुढे मोठया आरोग्य प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.आज सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला दर्जेदार सेवांच्या माध्यमातून सुलभ आणि परवडणाऱ्या प्रणालीमध्ये रूपांतरित करण्याची तातडीची गरज आहे. या समजुतीमुळे देशात एनआरएचएम आरोग्य अभियानाचा सुरुवात झाली आहे.

भारत सरकारने १२ एप्रिल २००५ रोजी सार्वजनिक आरोग्य सेवांची उपलब्धता आणि गुणवत्ता सुधारून समाजातील वंचित आणि

असुरक्षित घटकांना विशेषतः महिला आणि मुलांसाठी एकात्मिक व्यापक आणि प्रभावी प्राथमिक आरोग्य सेवा प्रदान करण्याच्या उद्देशाने एनआरएचएम हा उपक्रम सुरू केले आहे.

मिशनच्या मुख्य धोरणांमध्ये प्रामुख्याने सार्वजनिक आरोग्य पायाभूत सोई सुविधा बळकट करणे, समुदायाचा सहभाग वाढवणे, सार्वजनिक खाजगी भागीदारीला प्रोत्साहन देणे, आरोग्य कर्मचाऱ्यांचे ग्रामीण स्तरावरील आरोग्य कॅडर तयार करणे, दर्जेदार सेवांवर भर देणे यावर भर दिला आहे.

### एनआरएचएमचे उद्देश

कमकुवत सार्वजनिक आरोग्य निर्देशक आणि/किंवा कमकुवत पायाभूत सुविधा असलेल्या १८ राज्यांवर विशेष लक्ष केंद्रित करून देशभरातील ग्रामीण जनतेला प्रभावी आरोग्य सेवा प्रदान करणे.

अरुणाचल प्रदेश, आसाम, बिहार, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, झारखंड, जम्मू आणि काश्मीर, मणिपूर, मिझोराम, मेघालय, मध्य प्रदेश, नागालँड, ओरिसा, राजस्थान, सिक्कीम, त्रिपुरा, उत्तरांचल आणि उत्तर प्रदेश ही १८ विशेष फोकस राज्ये आहेत.

आरोग्यावरील सार्वजनिक खर्च ०.९% GDP वरून GDP च्या २-३% पर्यंत वाढवणे.

देशातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापन आणि सेवा वितरणास बळकटी देणाऱ्या धोरणांना प्रोत्साहन देण्यासाठी आरोग्य प्रणालीची सुधारणा करणे.

स्थानिक आरोग्य परंपरा पुनरुज्जीवित करण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्य प्रणालीमध्ये आयुषला मुख्य प्रवाहात आणणे.

स्वच्छता आणि पोषण, सुरक्षित पिण्याचे पाणी, लिंग आणि सामाजिक चिंता यासारख्या आरोग्याच्या निर्धारकांसह जिल्ह्यात विकेंद्रित व्यवस्थापनाद्वारे आरोग्यविषयक समस्यांचे प्रभावी एकीकरण करणे.

आंतरराज्य आणि आंतरजिल्हा असमानता दूर करा.

कालबद्ध उद्दिष्टे आणि प्रगतीचा सार्वजनिकपणे अहवाल तयार करणे.

ग्रामीण लोकांपर्यंत, विशेषत: गरीब स्त्रिया आणि मुलांसाठी परवडणारी, आणि प्रभावी प्राथमिक आरोग्य सेवा पोहोचवणे.

एनआरएचएम अभियानांतर्गत आवश्यक सुधारणा करण्यासाठी राज्यांचे हात बळकट करण्याचा प्रयत्न आहे. मिशन राज्यांना नागरिकांच्या विविध आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्यास सक्षम करण्यासाठी अतिरिक्त संसाधने देखील प्रदानकरत आहे.

स्थानिक समस्यांना तोंड देण्यासाठी राज्यांना नाविन्यपूर्ण योजना हाती घेण्याचे आवाहन केले जाईल. NRHM अंतर्गत परिकल्पित विकेंद्रीकरण लक्षात घेऊन, राज्यांनी पंचायतराजला पुरेसे प्रशासकीय/आर्थिक अधिकार देणे आवश्यक आहे.

राज्यांनी मिशन कालावधीत दरवर्षी आरोग्य क्षेत्रावरील त्यांचा खर्च किमान १०% वाढवण्यासाठी कारवाई करणे आवश्यक आहे.

MMR (माता मृत्यू दर) आणि IMR (बालमृत्यू दर) अनुक्रमे १००/१००० आणि ३०/१००० कमी करणे.

१५-४९ वर्षे वयोगटातील महिलांमध्ये अशक्तपणाची प्रवृत्ती दूर करणे.

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची (NRHM) वैशिष्ट्ये**

कमी खर्चात आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची सुरुवात करण्यात आलेली आहे.

**ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्य सेवा आणि सेवाचे वितरण**

NRHM च्या काही मूलभूत सुविधांमध्ये ग्रामीण भागातील असुरक्षित लोकसंख्येसाठी उच्च-गुणवत्तेची आणि सुलभ आरोग्यसेवा पायाभूत सुविधा प्रदान करणे समाविष्ट आहे. एम्पॉर्ड ॲक्शन ग्रुप (EAG) राज्यांव्यतिरिक्त, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि ईशान्येकडील राज्यांच्या बहुतांश ग्रामीण भागात देखील कार्यरत आहे. याव्यतिरिक्त, यात

बहु-कुशल डॉक्टर, GDMOs (सामान्य कर्तव्य वैद्यकीय अधिकारी), ANM (सहायक नर्स मिडवाइफ) आणि स्टाफ नर्सेससह १.८८ लाखाहून अधिक इतर आरोग्य मानवी संसाधने जोडली गेली आहेत.

**मोफत औषधे आणि निदान सेवा**

मोफत औषधे सेवा हे NRHM योजनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. औषधांसाठी वाटप केलेल्या निधीवर सरकार अतिरिक्त ५% प्रोत्साहन देते. जेव्हा भारतीय राज्ये/केंद्रशासित प्रदेश विशिष्ट वैशिष्ट्यांची पूर्तता करतात, तेव्हा ते NHM-मुक्त औषध सेवा उपक्रमाचे फायदे वापरू शकतात.या वैशिष्ट्यामध्ये उच्च किमतीच्या निदान सेवा, लॅब तंत्रज्ञ आणि उपकरणे, रेडिओलॉजिस्ट आणि इतर मानवी संसाधने समाविष्ट आहेत.

**मान्यताप्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्ते (आशा)**

भारत सरकारने समुदाय-स्तरीय काळजीचा एक भाग म्हणून सुविधा देण्यासाठी मान्यताप्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्ते नेमलेल्या आहेत. या मान्यताप्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्त्यांची संख्या ९.५ लाखाहून अधिक आहे.

**ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण समिती (VHSNC)**

NRHM द्वारे तळागाळात आरोग्याचे सामुदायिक सक्षमीकरण आणि स्वच्छता सुनिश्चित करण्यास सक्षम करते. पंचायतीराजचे प्रतिनिधी, आशा आणि इतर आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये VHSNC चे सदस्य असतात. NRHM अंतर्गत पात्र नागरिकांच्या स्वच्छता आणि पोषणविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी सरकार दरवर्षी ₹१०,००० चे अनुदान प्रदान करते.

**माता आणि बालमृत्यू दर**

NRHM अंतर्गत JSY (जननी सुरक्षा योजना) चे उद्दिष्ट मातामृत्यू कमी करणे आणि त्यांच्या प्रसूतीदरम्यान सरकारी सुविधा घेण्यास प्रोत्साहन देणे आहे. ही योजना पात्र गर्भवती महिलांना NRHM अंतर्गत बाळंतपणाच्या वेळी रोख मदत देते. दुसरीकडे, JSSK (जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम) पात्र महिलांना स्वत:ला मोफत प्रसूतीचा लाभ घेण्यास सक्षम करते, अगदी सिझेरियन सेक्शन झालेल्या महिलांनाही. मोफत औषधे आणि निदानाव्यतिरिक्त, त्यांना या योजनेतून आहार, रक्त तरतुदी आणि वाहतूक देखील मिळते.

**नॅशनल मोबाईल मेडिकल युनिट्स (NMMUs) आणि राष्ट्रीय रुग्णवाहिका सेवा (NAS)**

NRHM अंतर्गत, NMMU ६७२ पैकी ३३३ जिल्ह्यांमध्ये स्थापन करण्यात आले आहेत. सरकारी आरोग्य सुविधांची दृश्यमानता वाढवणे आणि त्याद्वारे आरोग्यसेवेच्या महत्त्वाबाबत ग्रामीण लोकांमध्ये जागरुकता वाढवणे हा त्यांचा उद्देश आहे. याशिवाय, NAS (राष्ट्रीय रुग्णवाहिका सेवा) लोकांना फक्त १०२ किंवा १०८ डायल करून रुग्णवाहिका सेवा प्राप्त करण्यास सक्षम करते.

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचे (NRHM) फायदे**

ग्रामीण भागातील लोकांना या अभियानातून उच्च दर्जाचे आरोग्य लाभ आणि सुविधा मिळू शकतात.

संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य रोगांवर उपचार घेऊ शकतात.

ग्रामीण भागातील लोकांमध्ये जागरूकता वाढली आहे आणि ते आजारांवर त्वरित उपचार करण्यास प्राधान्य देऊ लागले आहेत.

भारत सरकारकडून व्युत्पन्न केलेल्या निधीने अधिक सुविधा आणि उपकरणांसह सेवा सुधारण्यास मदत केली आहे.

या मिशनच्या योगदानामुळे माता आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे.

आशा, रोगी कल्याण समिती, ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण समिती (VHSNC) आणि इतरांसह NRHM अंतर्गत सर्व उपक्रमांनी उच्च रोजगाराच्या संधी दिल्या आहेत.

**c) सर्व शिक्षा अभियान SSA**




सर्व शिक्षा अभियान हा एक शैक्षणिक कार्यक्रम आहे जो भारतीय संविधानाने अनिवार्य केलेल्या कालमर्यादेत प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण (UEE) साध्य करण्यासाठी मनुष्यबळ विकास मंत्रालय राज्य सरकारांमार्फत हा कार्यक्रम राबवत आहे.

शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचे उदिष्ट पूर्ण करण्यासाठी केंद्रशासनाने २००१-२००२ पासून सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम सुरु केलेला आहे. विशिष्ट कालावधीत एकात्मक पध्दतीने राज्याच्या भागीदारीने या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. ६ ते १४ वयोगटातील सर्व मुला - मुलींना इ.स. २०१० पर्यंत जीवनावश्यक शिक्षण देण्याची ग्वाही सर्व शिक्षा अभियान अंतर्गत आहे.

६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा मुलभूत अधिकार देणा-या भारतीय राज्यघटनेच्या ८६ व्या तरतुदीनुसार प्राथमिक शिक्षणाच्या

सार्वत्रिकीकरणाचे ध्येय गाठण्यासाठी केंद्र सरकार सर्व शिक्षा अभियान हा पथदर्शी कार्यक्रम राबवत आहे. १.१ दशलक्ष वसाहतींमधील १९२ दशलक्ष मुलांच्या प्राथमिक शिक्षणाची गरज भागवण्यासाठी राज्य शासनांच्या भागीदारीसह सर्व शिक्षा अभियान राबवले जात आहे.शाळा नसलेल्या भागांमध्ये नव्या शाळा सुरु करणे आणि शाळा असतील त्या ठिकाणी अतिरिक्त वर्गखोल्या, प्रसाधनगृहे, पेयजल, देखभाल अनुदान आणि शाळेत सुधारणा घडवून आणण्यासाठी अनुदान प्राप्त करून देणे असे उपक्रम या कार्यक्रमांर्गत राबवले जातात.

शालेय शिक्षण व्यवस्थापनात पंचायतीराज संस्था, शालेय व्यवस्थापन समिती, ग्रामशिक्षण समिती, पालक-शिक्षक संघटना, माता-शिक्षक संघटना, जमातींच्या स्वायत्त परिषदा यांना प्रभावीरित्या सहभागी करून घेण्याचा हा एक प्रयत्न आहे.शासनाने सर्व शिक्षा अभियानाला वेळोवेळी मुदत वाढ दिलेली आहे.

**सर्व शिक्षा अभियान योजनेची वैशिष्ट्ये**

१. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी कालमर्यादेत अंमलबजावणी करण्यासाठी हा कार्यक्रम तयार करण्यात आला होता.

२. देशभरातील सर्व अल्पवयीन मुलांना मोफत मूलभूत शिक्षण प्रदान करते.

३. देशभरात दर्जेदार शिक्षणाच्या गरजेला प्रतिसाद देणारा हा शैक्षणिक उपक्रम आहे.

४. सर्व शिक्षा अभियान हा कार्यक्रम मुलांना मूलभूत शिक्षण उपलब्ध करून देऊन भारताला समानता आणि सामाजिक न्यायाचा मानदंड साध्य करण्यात मदत करतो.

५. मुलभूत शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक न्यायाला प्रोत्साहन देण्याची संधी उपलब्ध करून देणे.

६. उच्च स्तरावर प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठीचे सक्रीय पाऊल.

७. केंद्र, राज्य आणि स्थानिक प्रशासनामध्ये चांगली भागीदारी.

८. ज़िल्हा / राज्यांना प्राथमिक शिक्षणासंदर्भात स्वतंत्र दृष्टी विकसीत करण्याची संधी

**सर्व शिक्षा अभियान योजनेची उद्दिष्टे**

१. शौचालये, वर्गखोल्या उभारून आणि पिण्याचे पाणी उपलब्ध करून सध्याच्या शाळांच्या पायाभूत सुविधांना बळकट करणे.

२. विद्यार्थ्यांना पर्यायी शालेय सुविधा उपलब्ध करून देणे .

३. ज्या वस्त्यांमध्ये शालेय शिक्षणाची सोय नाही अशा वस्त्यांसाठी नवीन शैक्षणिक संस्था बांधणे.

४. शाळांच्या देखभाल आणि सुधारणेसाठी शाळेला अनुदान देणे.

५. शाळेतील शिक्षकांची संख्या वाढवणे.

६. गणवेश, पाठ्यपुस्तके आणि दर्जेदार प्राथमिक शिक्षण विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध करून देणे.

munotes.in

७. शारीरिकदृष्ट्या अपंग आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या मुलांसाठी शिक्षण उपलब्ध करून देणे.

८. व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध करून शिकवण्याची कौशल्ये वाढविणे.

**सर्व शिक्षा अभियानासाठी कोण पात्र आहे?**

६ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थी सर्व शिक्षण अभियानासाठी पात्र आहेत.

**सर्व शिक्षा अभियान या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना मिळू शकणारे फायदे**

१. मोफत आणि सक्तीचे प्राथमिक दर्जेदार मूलभूत शिक्षण.

२. पाठ्यपुस्तके आणि शालेय गणवेशाचा वेळेवर पुरवठा.

३. डिजिटल अंतर भरून काढण्यासाठी संगणक शिक्षण.

४. SC,ST, मुस्लिम अल्पसंख्याक आणि भूमिहीन शेतमजुरांच्या मुलांना समान शिक्षण आणि सुविधा.

५. शिकवण्याचे कौशल्य सुधारण्यासाठी मार्गदर्शन आणि व्यावसायिक अभ्यासक्रम.

६. अतिरिक्त वर्गखोल्या, अत्याधुनिक आणि स्वच्छ शौचालये आणि पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासह सुधारित पायाभूत सुविधा.

७. शाळेच्या देखभाल खर्चासाठी अनुदान.

सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम सर्व वर्गातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी कटिबद्ध आहे. भारतातील ग्रामीण भागातील शाळांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करतो. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना कोणत्याही खर्चाशिवाय दर्जेदार शिक्षण मिळण्यास मदत होत आहे. पढे भारत बढे भारत हा SSA चा उप-कार्यक्रम आहे.'शगुन' नावाने एक सरकारी पोर्टल आहे जे SSA कार्यक्रमावर लक्ष ठेवण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. जागतिक बँकेने मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या सहकार्याने ते विकसित केले आहे.

**समकालीन स्थितीमध्ये सर्व शिक्षा अभियान हे समग्र शिक्षा अभियानात वर्ग करण्यात आलेले आहे.**

**समग्र शिक्षा**



munotes.in

समग्र शिक्षा योजना ही शालेय शिक्षणासाठी एक एकीकृत योजना आहे. ज्यामध्ये प्री-स्कूल ते बारावीपर्यंतचा संपूर्ण भाग समाविष्ट आहे. ही योजना शालेय शिक्षणाला सातत्य मानते आणि शिक्षणासाठी शाश्वत विकास ध्येय (SDG-४) नुसार आहे . ही योजना बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा, २००९ च्या अंमलबजावणीसाठी केवळ समर्थनच पुरवत नाही तर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० च्या शिफारशींशी सुसंगत देखील आहे. या योजनेचे उद्दिष्ट असे आहे की सर्व मुलांना समान आणि सर्वसमावेशक वर्गातील वातावरणासह दर्जेदार शिक्षण मिळावे ज्याने त्यांची वैविध्यपूर्ण पार्श्वभूमी, बहुभाषिक गरजा, विविध शैक्षणिक क्षमतांची काळजी घेतली पाहिजे आणि त्यांना शिकण्याच्या प्रक्रियेत सक्रिय सहभागी बनवले पाहिजे. ही योजना पाच वर्षांच्या कालावधीसाठी म्हणजे २०२१-२२ ते २०२५-२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. समग्र शिक्षा योजनेत सर्व शिक्षा अभियान (SSA), राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA) आणि शिक्षक शिक्षण (TE) या तीन पूर्वीच्या योजनांचा समावेश आहे.

शाश्वत विकास ध्येय SDG-४.१ असे सांगते की "२०३० पर्यंत, सर्व मुले आणि मुली मोफत, न्याय्य आणि दर्जेदार प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पूर्ण करतील याची खात्री करा ज्यामुळे संबंधित आणि प्रभावी शिक्षण परिणाम प्राप्त होतील" .

SDG ४.५ म्हणते की "२०३० पर्यंत, शिक्षणातील लैंगिक असमानता दूर करा आणि सर्व स्तरावरील शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षणात समान प्रवेश सुनिश्चित करा, ज्यात अपंग व्यक्ती, स्थानिक लोक आणि असुरक्षित परिस्थितीतील मुलांचा समावेश आहे"

एकंदरीतच शाश्वत विकास कार्यक्रमावर आधारित ही योजना आहे.

**व्हिजन**

सर्व मुलांना समान आणि सर्वसमावेशक वर्गातील वातावरणात दर्जेदार शिक्षण मिळावे याची खात्री करणे जे त्यांच्या विविध पार्श्वभूमी, बहुभाषिक गरजा, विविध शैक्षणिक क्षमतांची काळजी घेते आणि त्यांना शिकण्याच्या प्रक्रियेत सक्रिय सहभागी बनवते.

**उद्दिष्टे**


- NEP २०२० च्या शिफारशींची अंमलबजावणी करणे.
- RTE कायदा, २००९ लागू करण्यात राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सहाय्य करणे.
- अर्ली चाइल्डहुड केअर आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करा.
- पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्रावर भर.
- समग्र, एकात्मिक, सर्वसमावेशक आणि क्रियाकलाप आधारित अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्रावर भर.
- दर्जेदार शिक्षणाची तरतूद आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक परिणाम वाढवणे.
- शालेय शिक्षणातील सामाजिक आणि लैंगिक अंतर भरून काढणे.
- शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरांवर समानता आणि समावेश सुनिश्चित करणे.

- SCERTs/SIE आणि DIETs चे बळकटीकरण आणि अपग्रेडेशन.
- सुरक्षित, सुरक्षित आणि अनुकूल शिक्षण वातावरण आणि शालेय शिक्षणाच्या तरतुदींमध्ये किमान मानकांची खात्री करणे.
- शिक्षणाच्या व्यावसायिकीकरणाला चालना देणे.

**लक्ष गट**

या योजनेत १.१६ दशलक्ष शाळा, १५६ दशलक्ष विद्यार्थी आणि ५.७ दशलक्ष शिक्षक यांचा समावेश आहे. अनुदानित शाळा (पूर्व-प्राथमिक ते वरिष्ठ माध्यमिक स्तरापर्यंत) शालेय परिसंस्थेच्या सर्व भागधारकांचा समावेश करून, म्हणजे शिक्षक, शिक्षक शिक्षक, विद्यार्थी, पालक, समुदाय, शाळा व्यवस्थापन समित्या, SCERTs, DIETs, BITEs, ब्लॉक संसाधन व्यक्ती, क्लस्टर संसाधन व्यक्ती , दर्जेदार, सर्वसमावेशक आणि न्याय्य शिक्षण देण्यासाठी स्वयंसेवक यांचा विचार केलेला आहे.

**समग्र शिक्षा शालेय शिक्षणाच्या नवीन शैक्षणिक आणि अभ्यासक्रमाच्या संरचनेचे समर्थन करते (५+३+३+४)**



- अंगणवाडी/प्री-स्कूलमध्ये ३ वर्षे आणि शाळेत १२ वर्षे
- पायाभूत टप्पा (५): बहुस्तरीय, खेळ/क्रियाकलाप-आधारित शिक्षण
- तयारीचा टप्पा (३): खेळ, शोध आणि क्रियाकलाप-आधारित आणि परस्परसंवादी वर्ग शिक्षण
- मधला टप्पा (३): विज्ञान, गणित, कला, सामाजिक विज्ञान आणि मानविकी यातील प्रायोगिक शिक्षण
- माध्यमिक टप्पा (४) : बहुविद्याशाखीय अभ्यास, अधिक गंभीर विचार, लवचिकता आणि विद्यार्थ्यांची विषयांची निवड

**समग्र शिक्षा योजनेचे फायदे**

हा क्षेत्र-व्यापी विकास कार्यक्रम/योजना असून सर्व स्तरांवर, विशेषत: राज्य, जिल्हा आणि उप-जिल्हा स्तरावर वापरताना  अंमलबजावणीची यंत्रणा आणि व्यवहारीक खर्चात सुसूत्रता आणण्यास मदत करेल.

जिल्हा स्तरावर शालेय शिक्षणाच्या विकासासाठी एक सर्वसमावेशक धोरणात्मक आराखडा तयार करण्याबरोबरच स्तरावरील प्रणाली आणि संसाधने ह्याचा विचार करून  शालेय शिक्षणाचे परिणाम सुधारण्याकडे लक्ष केंद्रित केले जाणार आहे  जे शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी राज्यांना प्रोत्साहन देणारा असेल.

या योजनेत 'शाळा' ही प्री-स्कूल, प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक ते वरिष्ठ माध्यमिक स्तर अशी एक सातत्यपूर्ण रचना आहे.

शिक्षणासाठी शाश्वत विकास लक्ष्य (SDG) नुसार प्री-स्कूल ते वरिष्ठ माध्यमिक टप्प्यापर्यंत सर्वसमावेशक आणि न्याय्य दर्जाचे शिक्षण सुनिश्चित करणे हे या योजनेचे ध्येय असल्याने शाश्वत विकासाच्ये लक्ष लवकर साध्य करता येईल.

या योजनेची प्रमुख उद्दिष्टे गुणवत्तापूर्ण शिक्षणाची तरतूद आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक परिणाम वाढवणे आहे. शालेय शिक्षणातील सामाजिक आणि लैंगिक अंतर भरून काढणे; शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरांवर समानता आणि समावेश सुनिश्चित करणे; शालेय शिक्षणाच्या तरतुदींमध्ये किमान मानकांची खात्री करणे; शिक्षणाच्या व्यावसायिकीकरणाला प्रोत्साहन देणे; बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (RTE) कायदा, २००९ च्या अंमलबजावणीसाठी राज्यांना पाठिंबा; आणि शिक्षक प्रशिक्षणासाठी नोडल एजन्सी म्हणून SCERTs/राज्य शिक्षण संस्था आणि DIET यांचे बळकटीकरण आणि अपग्रेडेशन करण्यावर भर दिला जाणार आहे.

समग्र शिक्षा योजनेच्या माध्यमातून सार्वत्रिक प्रवेश, समानता आणि गुणवत्ता, शिक्षणाच्या व्यावसायिकीकरणाला चालना देणे आणि शिक्षक शिक्षण संस्था (TEIs) चे बळकटीकरण प्रोत्साहन दिल्या जाणार आहे.

ही योजना राज्य/केंद्रशासित प्रदेश स्तरावर एकल राज्य अंमलबजावणी सोसायटी (SIS) मार्फत विभागाद्वारे केंद्र प्रायोजित योजना म्हणून लागू केली जाईल. राष्ट्रीय स्तरावर, मनुष्यबळ विकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक गव्हर्निंग कौन्सिल असेल आणि शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक प्रकल्प मंजूरी मंडळ (PAB) असेल. गव्हर्निंग कौन्सिलला आर्थिक आणि कार्यक्रमात्मक निकषांमध्ये बदल करण्याचा आणि योजनेच्या संपूर्ण फ्रेमवर्कमध्ये अंमलबजावणीसाठी तपशीलवार मार्गदर्शक तत्त्वे मंजूर करण्याचा अधिकार दिला जाईल.

केंद्र आणि राज्यांमधील योजनेसाठी निधी वाटपाची पद्धत सध्या ८ ईशान्येकडील राज्यांसाठी ९०:१० च्या प्रमाणात आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम आणि त्रिपुरा आणि ३ हिमालयीन राज्ये उदा. जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड आणि विधानमंडळासह इतर सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी ६०:४० अशी आहे. तर विधानमंडळ नसलेल्या केंद्रशासित प्रदेशांसाठी १००% केंद्र प्रायोजित आहे.

या योजनेंतर्गत प्रस्तावित शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरांवर विचार करून पुढील बाबींना महत्त्व देण्यात आले आहे. (i) पायाभूत सुविधांचा विकास आणि धारणा यासह सार्वत्रिक प्रवेश; (ii) लिंग आणि समानता; (iii) सर्वसमावेशक शिक्षण; (iv) गुणवत्ता; (v) शिक्षकांच्या पगारासाठी आर्थिक सहाय्य; (vi) डिजिटल उपक्रम; (vii) गणवेश, पाठ्यपुस्तके इत्यादींसह RTE हक्क;(viii) प्री-स्कूल शिक्षण; (ix) व्यावसायिक शिक्षण; (x) क्रीडा आणि शारीरिक शिक्षण; (xi) शिक्षक शिक्षण आणि प्रशिक्षणाचे बळकटीकरण; (xii) देखरेख; (xiii) कार्यक्रम व्यवस्थापन; आणि (xiii) राष्ट्रीय घटक इ. या योजनेंतर्गत शैक्षणिकदृष्ट्या मागास गट (EBBs), LWE प्रभावित जिल्हे, विशेष फोकस जिल्हे (SFDs), सीमा क्षेत्रे आणि ११७ महत्वाकांक्षी जिल्ह्यांना प्राधान्य दिले जाईल.

या योजनेचा मुख्य भर म्हणजे शिक्षक आणि तंत्रज्ञान या दोन गोष्टींवर लक्ष केंद्रित करून शालेय शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे यावर आहे.

ही योजना शालेय शिक्षणाच्या विविध स्तरांवरील संक्रमण दर सुधारण्यास मदत करेल आणि शालेय शिक्षण पूर्ण करण्यासाठी मुलांना सार्वत्रिक प्रवेशास प्रोत्साहन देण्यासाठी मदत करेल.

**सारांश**

ग्रामीण विकास आणि पंचायतराजचा सहसंबंध या दोन्ही संकल्पना एकमेकास पूरक व एकमेकांवर अवलंबून आहेत. पंचायतराज व्यवस्थेचा मूळ उद्देश स्थानिक विभागात स्वतःचे सरकार स्थापन करणे हा आहे. त्याचा आधारावर या सरकारने आर्थिक सामाजिक न्यायाच्या

योजना राबवायच्या आहेत आज केंद्र सरकारने व राज्य सरकारने आपल्या अनेक योजना ह्या पंचायतराजकडे सुपूर्द केल्यामुळे ग्रामीण विकास आणि पंचायतराजचा सहसंबंध हा अत्यंत जवळचा असल्याचे दिसून येते.

**आपली प्रगती तपासा**

**१. पंचायतराज आणि ग्रामीण विकासाचा सहसंबंध स्पष्ट करा?**

**२. ग्रामीण विकासाची संकल्पना सांगा?**

**३. ग्रामीण विकासाचा केंद्र शासनाच्या योजना सांगा?**

**अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ**

१) खडसे. भा. कि.१९९५.भारतीय समाज - हिमालया पब्लिकेशन , मुंबई

२) माने माणिक. १९९६. समाजशास्त्रीय संकल्पना , विदया प्रकाशन , नागपूर -

३ ) नाडगोंडे गु.द.२००५.भारतीय समाज आणि समस्या , पिंपळपुरे प्रकाशन , नागपूर

❄❄❄❄❄❄❄

munotes.in

# ४

# समकालीन समस्या

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.३.१ तळागळात क्षमता निर्माण करणे

४.३.२ स्वयंसेवी संस्था किंवा संघटना

४.३.३ जागतिकीकरण

४.३.४ नागरीकरण किंवा शहरीकरण

४.३.५ स्थानिकीकरण

**समकालीन मुद्दे**

## ४.१ उद्दिष्टे

समकालीन मुद्दे या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. भारतातील पंचायतराज मधील समकालीन समस्या सांगता येतील.

२. स्वयंसेवी संस्था म्हणजे काय व त्यांची भूमिका सांगता येईल.

३. जागतिकीकरण म्हणजे काय व त्यांच्या भूमिका  सांगता येतील.

४. नागरीकरण म्हणजे काय व त्याचे स्वरूप सांगता येईल

## ४.२ प्रास्ताविक

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात कायदा व सुव्यवस्थे बरोबरच आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व  सांस्कृतिक विकासाला प्राधान्य देऊन लोकांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने लोकांचे मूलभूत प्रश्न सोडविण्याची जबाबदारी केंद्र सरकार व राज्य सरकारवर येऊन पडली. पोलादांचे उत्पादन, वीज उत्पादन, मोठ्या यंत्रांचे उत्पादन, पाठबंधारे प्रकल्प, शास्त्रीय व तांत्रिक प्रगती, शेती व पाणी पुरवठ्याच्या योजना, राष्ट्रीय महामार्ग, जमिनीचे मोठ्या प्रमाणात संरक्षण, पशुपालन व दुग्धव्यवसाय तसेच, आरोग्य विषयक सुविधा इत्यादी. मूलभूत प्रश्नांबाबत राष्ट्रीय कार्यक्रमंची  आखणी करून त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्थानिक शासनव्यवस्थेवर सोपविण्यात आली.

## ४.३ विषय विवेचन

ग्रामीण जनतेकडून येणाऱ्या वेगवेगळ्या प्रश्नांच्या सोडवण्यासाठी सरकारला स्थानिक स्वरूपाच्या विविध विकास कार्यक्रमांची सुरुवात करावी लागली. अशा प्रकारच्या योजना व कार्यक्रम राबविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात होत्या. परंतु स्थानिक स्वशासाना समोर काही समकालीन समस्या व आव्हाने होती. उदा. पुरेसा पैसा, मनुष्यबळ, स्थानिकीकरण, शहरीकरण, जागतिकीकरण, स्वयं सेवी संघटनांना अर्थ सहायता, त्यांच्या कार्यावर नियंत्रण, विविध क्षमता वाढविणे व शिस्तबद्ध संघटना इत्यादींच्या अभावामुळे स्थानिक स्वशासन संस्थांना सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडण्यास काही अंशी अपयश आले आहे. या संस्था आपल्या कार्यक्षेत्रात असमर्थ ठरल्या आहेत.

### ४.३.१ तळागळात क्षमता निर्माण करणे (Capacity Building at the Grassroots)

भारतीय समाज व्यवस्थेला खऱ्या अर्थाने ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीनेच स्थानिक स्वशासनाची ओळख झाली आहे. लोकशाहीचा परिचय देशातील तळागाळापर्यंत व्हावा. या उद्देशाने नवनवीन प्रयोग स्थानिक पातळीवर केले जातात. विविध संस्थांच्या माध्यमातून क्षमतेप्रमाणे कार्यक्रम राबविले जातात. अशा संस्थांना स्वयंसेवी संस्था किंवा स्वयंसहायता गट असे म्हटले जाते. उपलब्ध संसाधने पायाभूत सुविधा आणि तांत्रिक कौशल्य यावर अवलंबून असलेल्या अशा संस्थान मधील कर्मचाऱ्यांसह निवडून आलेले पदाधिकारी, विशेषज्ञ आणि नोकरशाही यांच्यामार्फत ग्रामीण पातळीवर विविध योजना राबविल्या जातात.

तसेच राज्य वित्त आयोग आणि जिल्हा नियोजन समिती या संस्थांकडे भविष्यात विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणारा घटक म्हणून पाहिले जाते. या संस्था स्थानिक प्रशासनातील इच्छित बदलांसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. ग्रामीण पातळीवर अनेक नवनवीन योजना राबवित असताना अनेक अडचणी निर्माण होतात. भ्रष्टाचार, बेहिशेबी अधिकारांचा वापर, अनिष्ट प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, विवेक बुद्धीचा अभाव, नोकरशाहीची दिरंगाई अशा अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.

**संस्थात्मक क्षमता निर्माण करणे :-**

ग्रामीण भागाच्या अलीकडील सुधारणांसाठी राज्य वित्त आयोग आणि जिल्हा नियोजन समिती या दोन नवीन संस्था अस्तित्वात आल्या आहेत. प्रत्येक राज्यातील वित्त आयोग हा भिन्न आहे. उत्तर प्रदेश आणि बिहार सारख्या मोठ्या राज्यात केवळ तीन सदस्यी वित्त आयोग आहे. तर आसाम आणि बिहार या राज्यांमध्ये आयोगाच्या अध्यक्षां संदर्भात पात्रता निश्चित केली नाही. तसेच, हरियाणा, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांमध्ये आयोगाच्या कार्यासंदर्भात कोणताही तपशील देण्यात आला नाही. संविधानिक तरतुदीनुसार केंद्रीय वित्त आयोग हा राज्य वित्त आयोगाच्या निधीचे हस्तांतरण इतरत्र करू शकते. राज्य त्याच्या विशिष्ट गरजानुसार निधीची मागणी करू शकेल, असे संविधानाच्या अकराव्या अनुसूची मध्ये नमूद करण्यात आले आहे. यावरून असे दिसून येते की, निधीच्या संदर्भामध्ये राज्य वित्त आयोग हा दुबळा आहे. संस्थात्मक दृष्ट्या तो सक्षम नाही. त्यासाठी विशेष तरतुदी करणे गरजेचे आहे.

**निवडून आलेल्या कार्यकर्त्यांची क्षमता वाढविणे :-**

स्थानिक स्वशासनामध्ये त्रिस्तरीय पातळीवर निवडून आलेले सदस्य, आमदार, खासदार, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समितीचे सभापती, ग्रामपंचायत सरपंच, महापौर व नगराध्यक्ष व जिल्ह्याच्या मुख्यालयावर असलेल्या कार्यक्षेत्रातील महामंडळे यातील सदस्य, यांचा जिल्हा नियोजन समितीमध्ये राज्य शासनाने या सदस्यांना समाविष्ट केल्याचा कोणत्याही पद्धतीचा उल्लेख आढळत नाही. या निवडून आलेल्या सदस्यांचे नामनिर्देशन करून घेतल्याची विशिष्ट यादी किंवा नोंदणी जिल्हा नियोजन समितीकडे नाही, किंवा ती राज्याकडे सोपविण्यात येताना दिसत नाही. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीला विपणन, बँकिंग व महामंडळे इत्यादी. घटकांचा उपयोग व अनुभव घेता येणे शक्य होत नाही. शिवाय स्थानिक संस्थांचे वारंवार विसर्जन व निलंबन होते. यावरून असे दिसून येते की, स्थानिक पातळीवर निवडून आलेल्या कार्यकर्त्यांना प्रशासनामध्ये सहभागी करून घेऊन त्यांची प्रशासकीय व राजकीय इच्छाशक्ती किंवा क्षमता वाढविण्याची आवश्यकता आहे. ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे या बाबींचे सक्षमीकरण होत असताना दिसून येते.

**उदयोन्मुख समस्या किंवा ट्रेंड :-**

राज्य सरकारकडून सत्तेचा दुरुपयोग रोखण्यासाठी पुरेशी सुरक्षा व्यवस्था करणे गरजेचे आहे. ग्रामपंचायती व पंचायत समितीचे विसर्जन करण्याच्या प्रस्तावाला प्रत्येक कार्य गटाने आणि जिल्हा परिषदेने सविस्तर चर्चा केल्याशिवाय त्या विसर्जन करण्यासाठी टोकाचे पाऊल उचलू नये. यासंदर्भात सर्वोच्च प्रशासकीय मंडळांनी त्या ठरावास मंजुरी दिल्यानंतरच विधानसभेने देखील विसर्जनाचा हा ठराव चर्चा करूनच संमत करावा. तसेच मध्यवर्ती आणि जिल्हा पंचायतीने देखील योग्य चौकशी करावी. ग्रामपंचायत विसर्जित करण्यासंदर्भात दंडाधिकारी आणि आयुक्तांनी देखील मध्यवर्ती किंवा जिल्हा पंचायतीच्या चर्चेनंतरच मंजुरी द्यावी. आजपर्यंत या विसर्जनाच्या समस्येला गांभीर्यपूर्वक हाताळले गेलेले दिसत नाही. या घटकातील समाजशास्त्रीय गतिमानता समजून लोकशाही स्वशासनासाठी आवश्यक बाब आहे. सामाजिक दृष्ट्या उपेक्षित जाती आणि महिला आरक्षणासंदर्भात ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार व तरतुदीनुसार स्थानिक संस्थांच्या विसर्जना संदर्भातील बाब लक्षात घेणे गरजेचे आहे. या संस्थांकडे पोलीस प्रशासनाने देखील गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. तामिळनाडू राज्या प्रमाणे 'फ्रेंड्स ऑफ पोलीस प्रोग्राम' ही संकल्पना राबविली जावी. त्यातून स्थानिक पातळीवरील गुन्ह्यांस प्रतिबंध केले जाईल. या माध्यमातून कौटुंबिक आणि सामुदायिक संघर्ष देखील सौहार्दपूर्ण सोडविले जातील. स्थानिक संस्थांमधील होणारा भ्रष्टाचार यास देखील प्रतिबंध केला जाईल. अशा उदयोन्मुख समस्यांकडे अधिक लक्ष केंद्रित केले जावे.

**स्थानिक प्रशासनाची क्षमता वाढविणे :-**

प्रशासनाची वर्धित क्षमता राजकीय विकेंद्रीकरणाच्या पुढाकारांशी जुळली गेली पाहिजे. दहाव्या पंचवार्षिक योजनेत नमूद केल्याप्रमाणे स्वशासनासंदर्भात इच्छित असे परिणाम दिसून आले नाहीत. राजकीय आघाडीवर देखील गेल्या काही वर्षात लोकशाही

विकेंद्रीकरणातून ते साध्य झाल्याचे दिसत नाही. आर्थिक आघाडीवरील प्रगतीमध्ये अजूनही बरीच नियंत्रणे आणि निर्बंध आहेत. स्थानिक पातळीवर वैयक्तिक उपक्रम आणि अनेक विकास संस्थांचे प्रदर्शन होत असल्याचे आजही दिसून येते. या बाबीकडे गांभीर्यपूर्वक लक्ष केंद्रित करून स्थानिक प्रशासनाला अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. तसेच स्थानिक प्रशासनाची क्षमता अधिक गतीने वाढविणे गरजेचे आहे.

**स्थानिक कार्यकर्त्यांची क्षमता वाढविणे :-**

स्थानिक पातळीवरील पितृसत्ताक वर्तन जे आजही अनाकालवादी बनलेले आहे. ज्या की, खाजगी कॉर्पोरेट क्षेत्रातील अनेक क्षेत्रांमध्ये उतप्रेरक आणि प्रवर्तक म्हणून कार्य करते. त्या ठिकाणी स्थानिक कार्यकर्त्यांना संधी देऊन त्यांचे विकेंद्रीकरण घडून आणणे आवश्यक आहे. तसेच ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे. स्थानिक पातळीवरील पायाभूत सुविधांची तरतूद, जिथे की खाजगी सहभाग नगण्य असा आहे. उदा. बांधकाम, रस्ते, पूल, ग्रामीण विद्युतीकरण, कृषी व्यापार, गरिबांसाठी घरे, आरोग्य, शिक्षण इत्यादी. प्रक्रियात्मक विलंबावर परिणाम होताना दिसतो. या कामामध्ये निधीची कमतरता असल्याचे जाणवते. या सर्व बाबतीमध्ये स्थानिक कार्यकर्त्यांना काम करण्याची संधी देऊन त्यांना पुरेसा निधी देण्याची तरतूद करने आवश्यक आहे.

**ज्ञान नेटवर्किंग :-** (माहितीचे आदान प्रदान किंवा प्रसारण)

माहिती प्रसारण हा सर्वात महत्त्वाचा स्त्रोत असल्याने त्याचे जलद आणि कार्यक्षम प्रसारण स्थानिक संस्थांमध्ये होणे गरजेचे आहे. स्थानिक केंद्रांना उपयुक्त ठरणारी माहितीच्या प्राप्तीसाठी कार्यक्षम धोरने तयार करण्यासाठी सरकार आणि नागरिक यांच्यातील (संप्रेषण) माहितीचे आदान-प्रदान होणे महत्त्वाचे आहे. तसेच डिजिटल भाषेतील शब्द व्यावहारिक पातळीवर सोप्या भाषेत सांगावेत. तर डिजिटल गव्हर्नन्स मध्ये दोन्ही डिजिटल सरकारचा समावेश करावा. सार्वजनिक सेवेचे वितरण, प्रशासनात नागरिकांचा सहभाग आणि डिजिटल लोकशाही इत्यादीचा प्रयोग यशस्वीपणे राबविणे. या संदर्भात 'अमेरिकन सोसायटी ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन' द्वारे २००३ मध्ये सर्वेक्षण केले गेले असून, त्या माध्यमातून माहिती संप्रेषण आणि प्रसारणाचे अत्याधुनिकीकरण करण्यात आले आहे. २००५ मध्ये विकसित आणि अविकसित देशांमधील 'डिजिटल डिव्हाईस' माहिती प्रसारणासाठी खुले करण्यात आले आहे. या सर्व घटकांचा उपयोग भारतातील स्थानिक स्वशासनाला पुरेपूर व्हावा असे अपेक्षित आहे. त्यादृष्टीने स्थानिक स्वशासनाची वाटचाल गतिमान होत असल्याचे दिसून येत आहे.

**सामुदायिक सक्षमीकरण करणे :-**

जागतिक स्तरावर ‘सिव्हिल सोसायटी’ ही नवी संकल्पना राबविली जात आहे. विशेषतः राजकीय क्षेत्रात देखील ही संकल्पना कार्यरत आहे. ग्रामीण विकासामध्ये राज्याद्वारे केले जाणारे आर्थिक नियंत्रण व बाजारपेठेचे नियोजन, सेवा तरतुदीचे व्यवस्थापन करणे, सार्वजनिक आणि खाजगी अशा सर्व प्रकारच्या वस्तूंच्या वितरणाच्या बाबतीत स्थानिक क्षेत्रात पुरेशी स्वायत्तता दिली जावी. यामुळे स्थानिक पातळीवरील जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीवर स्थानिकांना नियंत्रण ठेवणे शक्य होईल. तसेच सर्वसामान्यांना माफक दरामध्ये

वस्तूंचे वितरण व उपभोग घेता येईल. यामुळे स्थानिक व ग्रामीण समुदायाचे सक्षमीकरण निश्चितपणे घडून येईल.

स्थानिक पातळीवरील सर्वसमावेशक असे सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी आणि अपेक्षित असलेले वातावरण निर्माण करण्यासाठी प्रथमतः लोकांच्या हक्कांबद्दल जागरूकता महत्त्वाची आहे. सातत्याने या बदलत्या प्रवाहांमध्ये स्थानिक पातळीवर लोकशाही विकेंद्रीकरण प्रक्रिया घडवून आणताना अनेक अडचणींना व आव्हानांचा सामना करावा लागतो आहे. आर्थिक आणि इतर संस्थात्मक अडचणींच्या व्यतिरिक्त स्थानिक लोकांमध्ये समजूतदारपणाचा अभाव, गरिबी, निरक्षरता, व्यसनाधीनता, जातीयता, इत्यादी समस्या असून त्या लोकशाही विकेंद्रीकरणाला संकुचित करतात. भाषणबाजी आणि आश्वासनांमुळे अनेक वेळा जनमताचा विपर्यास होतो. त्यामुळे लोकशाहीच्या विश्वासहार्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होतात. माहिती हस्तांतरणासाठी पैसे द्यावे लागतात. चुकीची माहिती, माहितीचा अभाव ही देखील एक मोठी समस्या आहे. या मुळे अनेक राजकीय उच्चभ्रू लोकांसाठी अनुकूल वातावरण निर्माण होते. यावर उपाययोजना म्हणून माहिती तंत्रज्ञान प्रचारातुन ई-गव्हर्नन्स, ई-प्रशासन सिव्हिल सोसायटीसाठी राजकीय जागृती प्रभावीपणे घडून आणू शकते.एककेंद्रीत स्वरूपाला तोडण्यासाठी नागरी समाज महत्त्वाचा आहे.तसेच सहकारी संस्थाना पुनरुजजीवीत करण्याची गरज आहे.

भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये जेथे यासंदर्भात भविष्यातील पूर्वसूचना आधीच व्यक्त झाल्या आहेत. लोकांना त्यांच्या धोरण निर्मात्यापर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी मार्ग क्षमता निर्धारणातुन करता येतील ज्यामुळे त्यांचे सक्षमीकरण घडून येईल. तसेच लोकशाहीला चुकीच्या माहितीच्या विळख्यातून मुक्त करावयाचे असेल तर सर्वमान्य वस्तुस्थिती प्रकाश झोतात आणून चांगली धोरणे अंमलात आणण्यासाठी क्षमता निर्धारण उपक्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत.

### ४.३.२ स्वयंसेवी संस्था किंवा संघटना (NGOS)

देशातील शासन प्रशासन अद्यापही समाजातील दारिद्र्य, गरिबी, बेकारी, निरक्षरता, अन्याय, अत्याचार, जातीभेद आणि आर्थिक विषमता इत्यादी. प्रश्न व समस्यांची सोडवणूक करू शकले नाहीत. त्याकरिता शासनाने अनेक कायदे, नियम, योजना, कार्यक्रम व उपायोजना केले आहेत. परंतु शासनाची निष्क्रियता व प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे अपेक्षित यश प्राप्त होऊ शकले नाही. परिणामी ग्रामीण व शहरी समाजाच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी आणि विविध सामाजिक समस्या सोडविण्यासाठी समाजातूनच स्वयंप्रेरणेने स्वयंसेवी संघटनांची निर्मिती झालेली आहे. त्यातूनच जगातील विविध देशांमध्ये काही व्यक्ती व स्वयंसेवी संस्था निस्वार्थपणे सामाजिक कार्य करीत आहेत.

आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्र संघाने सामाजिक, आर्थिक व मानवतावादी दृष्टिकोनातून देशा देशातील दारिद्र्य, शोषण व आर्थिक विषमता इत्यादींची सोडवणूक करण्याकरिता सामाजिक आणि आर्थिक विकास मंडळाची तरतूद करून या संस्थांना समाज कल्याण व विकासात्मक कार्य करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यामुळे आज अशा संस्था

जगातील अमेरिका, जपान, फ्रान्स, इंग्लंड व जर्मनी या विकसित तर पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका व भारत या विकसनशील तसेच, आफ्रिका खंडातील मागासलेल्या राष्ट्रातही प्रकर्षाने उदयास आल्या आहेत. त्याचप्रमाणे विविध देशातील राज्य, प्रदेश, जिल्हा व ग्रामस्थरावरही स्वयंसेवी संघटनांचे जाळे निर्माण झाले आहे.

**स्वयंसेवी संघटना संकल्पना :-**

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. व्यक्तीच्या गरजा कितीही शुल्लक असल्या तरीही तो एकटा राहू शकत नाही. मनाच्या समाधानकारकता, आपला आनंद आणि दुःख यात इतरांना सहभागी करून घेण्याकरता त्याला इतरांच्या सहवासाची आवश्यकता असते. इतकच काय पण एखाद्या स्वार्थी, आत्मकेंद्रित माणसाला सुद्धा त्याच्या श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यासाठी ते बघणाऱ्यांची आवश्यकता भासतेच, जेव्हा इतर लोक त्यांच्या श्रीमंतीची वाहवा करतात, तेव्हाच त्याला खरा आनंद होतो. थोडक्यात माणसाला त्याच्या अवती भोवती सतत माणसे हवी असतात. म्हणूनच त्याला कळप करून राहणारा प्राणी असे म्हटले जाते.

समाजात एकत्र राहणाऱ्या काही व्यक्तींना आपले विचार समान असल्याचे जाणवते तेव्हा अशी समविचारी माणसे एकाच ध्येयाने प्रेरित होऊन सामाजिक काम करणाऱ्या संघटना निर्माण करतात. सामाजिक काम करणाऱ्या संघटनांमुळे व्यक्तीची ओळख, ती व्यक्ती कोणत्या संघटनेत कार्य करते यावरून होते. आधुनिक युगात प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या प्रकारे एखाद्या संघटनेच्या कार्याशी संबंधित असते. संघटना अनेक प्रकारच्या असतात सामूहिक स्वरूपाचे कार्य करण्यासाठी संघटना आवश्यक असते. कारण एकटी व्यक्ती कार्य करू शकत नाही. अनेक व्यक्ती एकत्र येऊन जेव्हा एखादे समान उद्दिष्ट पार पाडत असतात, तेव्हा त्यांच्यातील परस्पर संबंध निर्माण होऊन औपचारिक संघटना तयार होते.

समाजातील विविध प्रश्न व समस्या याची सोडवणूक करण्याची आपली इच्छा असते. त्याचबरोबर समाजात राहणारे दुर्लक्षित उपेक्षित घटकाच्या स्थितीत सुधारणा व्हावी, अशी आपली इच्छा असते. तेव्हा आपल्या मनातील मानवता इतरांसाठी कार्य करण्याची प्रेरणा निर्माण करते. अशा प्रकारची लोकहिताची प्रेरणा प्रत्येक व्यक्तीत मुलत: असतेच म्हणूनच सामाजिक कार्यकर्त्यांनी नेहमी हे लक्षात ठेवले पाहिजे की, कार्यकर्ता हा तयार करता येत नाही. तर तो शोधून काढावा लागतो. समाजात असे काही कार्यकर्ते असतात. की, त्यांच्यातील सामाजिक चेतना प्रज्वलित करण्याची गरज असते. आणि अशा या मनुष्याच्या समूह जीवनातूनच स्वयंसेवी संघटनांची निर्मिती होते. एकत्रित येऊन परस्परांच्या सहकार्यातून व्यक्तीला स्वतःच्या विकासासाठी चालना मिळते. यावरून असे लक्षात येते की, स्वयंसेवी संघटना म्हणजे विकासाचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे.

**भारतातील स्वयंसेवी क्षेत्र :-**

भारतातील प्राचीन काळापासून स्वयंसेवी संघटना मठ, धर्मशाळा, आश्रम व गुरुकुल या स्वरूपात अस्तित्वात होत्या. या संस्था त्या

munotes.in

काळात जनकल्याणाचे कार्य करीत असत. भारतीय तत्त्वज्ञान व संस्कृतीत 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' हे गीता वचन प्रसिद्ध आहे. त्यानुसार निष्काम कर्मणी त्याग व सेवा ही जीवनमूल्य मानली गेली आहेत. समाजातील रोगीत, पिडीत, दिन, दुबळ्यांची सेवा करण्याची परंपरा भारतीय जीवनाचा अविभाज्य भाग आहे.

संत कबीर, गुरुनानक, गुरुदयाल, चैतन्य महाप्रभू, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, लॉर्ड बुद्धा व भगवान महावीर या युगपुरुषांनी आपल्या कृतीतून मानवाची सेवा करण्याचा संदेश जगाला दिला आहे.

प्राचीन काळातील भारतीय ग्रंथातही व्यक्तीच्या अर्थार्जनाच्या विनियोगासंबंधी स्मृति ग्रंथात म्हटले आहे की," आपल्या धनप्राप्तीचे आठ भाग करावे, त्यातील एक भाग सामाजिक कार्या करिता आणि एक भाग दिन, दुबळे, पीडित लोकांच्या सेवेसाठी खर्च करावा." तसेच विविध धर्माच्या ग्रंथातूनही परोपकार, दान, धर्म व मानव कल्याणाची शिकवण समाजाला दिली आहे. समाजातील अनाथ व अपंगांची सेवा करणे हे पुण्य कर्म मानले आहे. 'समाज सेवा हीच ईश्वर सेवा' मानून निष्काम सेवेच्या माध्यमातून संत गाडगेबाबांनी समाजातील तहानलेल्या भुकेलेल्या उघड्या, नागड्या आणि कुष्ठरोग यांची निरपेक्ष वृत्तीने सेवा केली. तसेच प्राप्त झालेल्या समाज दानातून गरिबांकरीता वस्तीगृह , धर्मशाळा, कुष्ठधामे व अन्नछत्रे उभी केली.

भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा प्रारंभ स्वातंत्र्यपूर्व कालखंडात झालेला दिसून येतो. तात्कालीन समाजात प्रचलित असलेल्या चाली, रीती, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड, सती प्रथा, जातीभेद, केशवपण, बालविवाह, कन्या हत्या, बहुपत्नीत्व व स्त्रीदास्यत्व, इत्यादी. कुप्रथे विरोधात समाजात जनजागृती करून सामाजिक पुनर्रचनेचा लढा उभारला. त्यात राजाराम मोहन रॉय, दादोबा पांडुरंग तरखडकर, न्यायमूर्ती महादेव रानडे, डॉ. आत्माराम पांडुरंग, महात्मा फुले, स्वामी दयानंद सरस्वती, पंडिता रमाबाई, महर्षी धोंडो केशव कर्वे, गोपाळकृष्ण गोखले आणि विठ्ठल रामजी शिंदे, इत्यादी. समाज सुधारकांनी स्थापन केलेल्या समाजसेवी संस्थांच्या माध्यमातून समाजातील कुप्रथा व समस्यांविषयी विविध आंदोलने व लढ्यातून जनजागृती करण्यात आली.

देशात स्वातंत्र्य चळवळ सुरू झाली. गांधीयुगातील स्वयंसेवी संघटना या मूलतः गांधीजींच्या विचारांची प्रेरणा घेऊन स्थापन करण्यात आल्या होत्या. या संघटनांनी समाजातील नशाबंदी, विधवापुनर्विवाह, हरिजन कल्याण, ग्राम सुधार व ग्राम स्वराज्य इत्यादींबाबत सर्वतोपरी प्रयत्न केले. तर हरिजन सेवक समाज, आदिवासी सेवा मंडळ आणि कस्तुरबा गांधी मेमोरियल ट्रस्ट, या संस्थांनी देशातील ग्रामीण भागाच्या उन्नती करता व ग्रामीण पुनर्रचने करिता सहकार, विकेंद्रीकरण, स्वदेशी आणि ग्राम उद्योगास चालना दिली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वर्ग विरहित, शोषणमुक्त व समताधीष्ठीत समाज निर्माण करणे, आणि कल्याणकारी राज्याच्या निर्मितीचे स्वप्न साकार करण्यासाठी देशात विकासाची एक नवी पहाट सुरू झाली. त्याकरिता भारतीय संविधानात राज्यव्यवस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासाच्या तत्त्वांचा समावेश करण्यात आला आहे. भारतीय नागरिकाला त्यांच्या मूलभूत अधिकारांतर्गत नागरिकांना संघटना, संस्था व संघ स्थापन

करण्याचा घटनात्मक अधिकार प्राप्त झाला आहे. त्यामुळे सेवाभावी, समाजसेवी, स्वयंसेवी, व स्वयंसहायता संस्थांना घटनात्मक कायद्याचे अधिष्ठान प्राप्त झाले आहे.

**भारत सरकारने स्वयंसेवी संस्थांना दिलेले प्रोत्साहन :-**

भारत सरकारने देशातील समाज कल्याण कार्यक्रमांना संचलित करणे, स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देणे आणि या संस्थांना आर्थिक मदत करण्यासाठी, सन. १९५३ मध्ये प्रसिद्ध समाजसेविका डॉ. दुर्गाबाई भागवत यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय समाज कल्याण मंडळाची स्थापना केली. तसेच देशातील ग्रामीण विकासाचे कार्य करणाऱ्या सर्व सेवादायी एन.जी.ओ. स्वयंसेवी संस्थांच्या कार्यात सुसूत्रता निर्माण करण्याकरिता सन. १९५८ मध्ये 'असोसिएशन फॉर वॉलेट्री एजन्सी फॉर रुरल डेव्हलपमेंट' (Association for voiunatary Agecies for Rural Development-**'AVARD')** ही संस्था स्थापन केली.

त्यानंतरच्या कालखंडात नियोजन आयोगाने समाज कल्याण विषयक कार्य स्वयंसेवी संस्थांकडून करण्यात यावे, अशी सरकारला शिफारस केली. पहिल्या पंचवार्षिक योजनेत स्वयंसेवी संस्थांचा विकासात्मक कार्यातील सहभाग व महत्त्व अधोरेखित करून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत १९६२ -६६ साली समाजकल्याण

कार्यासाठी १९ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली. तसेच सातव्या पंचवार्षिक योजनेत १९८५-९० स्वयंसेवी संघटनांना अधिकृत स्थान प्राप्त करून दिले. देशातील ग्रामीण समुदायाला स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर बनविण्याकरिता सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना आर्थिक अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी १९७३ मध्ये (People's Action for Development of India-**'PADI')** ही स्वायत्त संस्था स्थापन केली. त्याचबरोबर ग्रामीण भागात अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध व्हावे, याकरिता १९८३ मध्ये (Council for Advancement of Rural Techonology-**'CART')** या संस्थेची निर्मिती करून तिच्याकडे ही जबाबदारी देण्यात आली. दरम्यानच्या काळात भारत सरकारने या दोन्ही संस्थांचे एकत्रीकरण करून (Council for Advanement of People's Action and Rural Techonology-**'CAPART')** ही संस्था १९८३ साली स्थापन करून बहुविध क्षेत्रात विस्तारलेल्या स्वयंसेवी क्षेत्राच्या कार्याला अधिक गतिमान व आर्थिक सक्षमता प्राप्त करून दिली. 'Capart' या संस्थेद्वारे ग्रामीण भारतातील आर्थिक व सामाजिक दृष्ट्या दुबळ्या घटकांचे सशक्तिकरण करण्यात येत आहे. त्याकरिता प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी जैवग्राम (Bio-Village Society) उभारण्यात येत आहे. तसेच देशातील १७ राज्यातील १२,००० स्वयंसेवी संस्थांद्वारे २६,००० विकास प्रकल्प हाती घेऊन ग्रामीण भागाच्या उद्धाराची मुहूर्तमेढ रोवण्यात आली आहे.

देशातील शासन व्यवस्था आणि स्वयंसेवी क्षेत्रात उभय पक्षी दुवा म्हणून (Volantory Action Network India -**VANI**-१९८८) 'वाणी' ही संस्था कार्य करते. जागतिक क्षेत्रात स्वयंसेवी क्षेत्रात होणारे बदल, नवी आव्हाने, बदलते संदर्भ, समता वृद्धी, इत्यादी कार्याची दिशा व स्वयंसेवी संस्थांचे भवितव्य याविषयी सतत देशभरात विविध चर्चासत्रे व कार्यशाळांचे आयोजन 'वाणी' या संस्थेकडून करण्यात येते. याशिवाय स्वयंसेवी क्षेत्रातील 'शीर्ष' संशोधन संस्था म्हणूनही वाणी या संस्थेला ओळखले जाते. सरकार, खाजगी व स्वयंसेवी क्षेत्रात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सुशासन निर्माण करण्यात पुढाकार घेणारी व त्याकरिता

कटिबद्ध असणारी संस्था म्हणून वाणी या संस्थेकडे पाहिले जाते. आज देशभरातील स्वयंसेवी क्षेत्रातील २५ राज्यातील ८००० स्वयंसेवी समाजसेवी संस्थांचे नेटवर्क वाणी या संस्थेने उभे केले आहे. ग्रामीण स्तरावर देखील ही संस्था कल्याणकारी धोरणे राबविण्यात आघाडीवर आहे.

**स्वयंसेवी संस्थांबाबतचे राष्ट्रीय धोरण :-**

स्वातंत्र्यपूर्व ते स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात देखील सामाजिक क्षेत्रासह मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्वयंसेवी संघटनांचा कार्यविस्तार झाला आहे. त्यांची नोंदणी व्यवस्थापन व नियंत्रण याबाबत राज्यनिहाय वेगवेगळे कायदे व नियम करण्यात आले होते. या कायद्यांतर्गत या संस्थांचे कार्य चालत असे, परंतु देश पातळीवर सर्व समावेशक अशा स्वयंसेवी क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या बाबतीत राष्ट्रीय धोरणाचा अभाव होता. त्यामुळे समाजातील विविध घटकांकडून त्या संदर्भात सातत्याने व वारंवार मागणी केली जात होती. त्या अनुषंगाने भारत सरकारने इसवी सन. २००७ मध्ये स्वयंसेवी क्षेत्र बाबतचे राष्ट्रीय धोरण जाहीर केले गेले.

देशातील दारिद्र्यता, गरिबी, विषमता व भेदभेद याबाबत जनजागृती चळवळ सुविधा पुरविणे प्रबोधन, प्रशिक्षण, संशोधन आणि प्रचारासारखे मार्ग वापरले. अनेक योजना विविध कार्यक्रम व विकास प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करून समाजातील निम्नस्तर वर्गाचा जीवनस्थर उंचावला. त्यामुळे सरकार आणि सर्वसामान्य जनता यामधील एक प्रभावी अराजकीय स्वैच्छिक क्षेत्र दुवा ठरले आहे. सामाजिक क्षेत्रात आणि इतर बहुविध क्षेत्रात देशातील सेवाभावी संस्थांनी कोणत्याही फळाची अभिलाषा न बाळगता निस्वार्थ भावनेने सामाजिक अभिसरणात जे मौलिक योगदान दिले आहे. त्याची दखल भारत सरकारने या धोरणाद्वारे घेतली आहे. त्यामुळे स्थानिक प्रांतिक व राष्ट्रीय स्तरावर सरकार स्वयंसेवी क्षेत्राबाबत भागीदारी आणि सहकार्य वृद्धिंगत करण्याचे समर्थन करीत आहे.

अशा प्रकारे शासनाने आणि स्वयंसेवी क्षेत्राने सहभागी पद्धतीने प्रकल्प राबविणे, या पुढील काळात आवश्यक आहे. या भागीदारीत खाजगी क्षेत्र, पंचायतराज संस्था, महापालिका व शैक्षणिक संस्थांचाही समावेश करण्यात यावा, अशा संयुक्त सल्लागार समूह व मंच, संघटनांना सरकार प्रोत्साहित करेल. तसेच आज देशात निर्माण होणाऱ्या संपत्तीमध्ये शेअर बाजाराचा मोठा वाटा आहे. हा पैसा स्वयंसेवी संस्थांकडे वळविण्याकरिता अशा संस्थाना दीर्घ कर सवलत देण्याच्या सरकार विचारार्थ आहे. या धोरणात स्वयंसेवी संस्थांना देण्यात येणाऱ्या शासकीय व आर्थिक अनुदानाच्या संबंधाने

काही प्रश्नही उपस्थित करण्यात आले. त्यामध्ये अर्थसाह्य उपलब्ध करून देण्याची जुनाट रचना, मनमानी कार्यपद्धती, व आरोग्य संस्थेची निवड अंमलबजावणीतील ढिसाळपणा आणि मिळालेल्या पैशाचा गैरवापर इत्यादी बाबींमुळे स्वयंसेवी क्षेत्राबाबत अविश्वासाचे वातावरण निर्माण झालेले आहे. याकरिता या संस्थांना दिल्या जाणाऱ्या सार्वजनिक निधीवर नियंत्रण ठेवणारी सक्षम यंत्रणा निर्माण करण्यात येईल.

munotes.in

**स्वयंसेवी संस्थांचे प्रकार :-**

स्वयंसेवी संघटना बहुविध क्षेत्रात कार्य करतात. त्यावरूनही आजच्या काळात त्यांचे प्रकार पाडले जातात. विशेषत: एका क्षेत्रात कार्य करणाऱ्या संघटना जशा आहेत, तशा अनेक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संघटना सुद्धा आहेत. त्यांचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल.

समाजकल्याण, सक्षमीकरण, आदिवासी विकास, मानवाधिकार, स्वच्छता व पिण्याचे पाणी, वने व पर्यावरण रक्षण, आरोग्य कल्याण, ग्राहक संरक्षण, पुनर्वसन, प्रौढ शिक्षण, सामाजिक सुरक्षा, कुटुंब कल्याण, ऊर्जा व पशु कल्याण, लघु सिंचन, भटके विमुक्त विकास, अंध अपंग कल्याण, वन्यजीव, संरक्षण, कृषी विकास, ग्रामीण विकास, कला व संस्कृती, पत्रकारिता, सुशासन, ग्लोबल वार्मिंग, पुराण वस्तू संरक्षण, महिला हक्क, जनसंपर्क, महिला कल्याण, साहित्य व वाङ्मय आणि क्रीडा, पानलोट क्षेत्र विकास, पंचायतीराजचे कल्याण, प्रसार माध्यमे, व्यसनमुक्ती, जलव्यवस्थापन, वेश्या व देवदासी, बालमजूर, विज्ञान व तंत्रज्ञान शिक्षण व संशोधन, इत्यादी स्वयंसेवी संस्थांचे प्रकार आहेत. भारतातील स्वयंसेवी संस्था मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात कार्य करतात. त्या जेवढ्या क्षेत्रात कार्यकरतात तेवढे त्यांचे वरील प्रमाणे उल्लेखित प्रकार पहावयास मिळतात.

**स्वयंसाहाय्यता गट (SHGS)**

भारतात धोरणकर्त्यांनी विकास प्रक्रियेतील वित्त सेवांची भूमिका उत्पादन, उत्पादकता वृद्धी व दारिद्र्य निर्मूलन ही उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून वित्तीय धोरणे आखली. यासाठी योग्य वेळी पुरेशा प्रमाणात वित्त पुरवठा सर्व दूर विशेषतः ग्रामीण व शहरी भागात उपलब्ध व्हावा, म्हणून राष्ट्रीयकृत व्यापारी बँकांच्या शाखांचा विस्तार वेगाने केला. दुर्बल क्षेत्र व ग्राहक यांच्यापर्यंत कर्ज पुरवठा उपलब्ध व्हावा म्हणून कर्ज वाटपाचा ४० % हिस्सा हा अग्रक्रम क्षेत्रासाठी निर्देशित केला. यात प्रादेशिक ग्रामीण विकास बँक व एकात्मिक विकास योजना यांचा वाटा सर्वाधिक आहे.परंतु या सर्व प्रयत्नानंतरही सन १९८१ मध्ये ग्रामीण भागातील ३९ % कुटुंबे बिगर संस्थात्मक वित्तीय व्यवस्थेवर अवलंबून होती. सन १९९१ मध्ये हे प्रमाण अल्पसे कमी होऊन ते ३६ % झाले. समाजातील तळागाळातल्या ५० % लोकांना जास्त व्याजदर असणारा सावकार हा वित्त स्त्रोतच उपलब्ध होता. असा निष्कर्ष १९९२ मध्ये रिझर्व बँक ऑफ इंडियाने नेमलेल्या कर्ज व गुंतवणूक पाहणी समितीने आपल्या अहवालात नोंदविला आहे. दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी राबविण्यात आलेल्या कार्यक्रमांतर्गत केलेल्या कर्ज वाटपात कर्जदाराची चुकीची निवड झाल्यामुळे परतफेडीचे प्रमाण कमी राहिले. बँकांचा गरीब ग्राहका बाबतचा दृष्टिकोन उदासीन राहिला. या पार्श्वभूमीवर ग्रामीण वित्त पुरवठ्यात नवीन उपक्रमांना चालना देऊन संस्थात्मक वित्त सेवांची गुणवत्ता सुधारण्यासंबंधी जागतिक पातळीवर झालेल्या चर्चेत आशियाई देशातील गरिबांच्या अनौपचारिक वित्त संस्थांच्या कार्यपद्धतीची स्वयं सहाय्यता गटाची दखल घेण्यात आली. स्वयंसहायता गट व औपचारिक वित्तसंस्था यांचा मेळ घालणाऱ्या वित्त यंत्रणेची संकल्पना पुढे आली. रिझर्व बँकेच्या पाठिंब्याने नाबार्डने मैसूर पुनर्निर्धारण आणि विकास संस्था (MYRADA) '**मायराडा**' या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने सन १९८६-८७ मध्ये स्वयंसहायता गटासंबंधी प्रकल्प सुरू केला. या प्रकल्पा अंतर्गत प्रामुख्याने खालील तीन घटकांचा समावेश करण्यात आला होता.

(१) स्वयंसेवी संघटनांनी, स्वयंसहायता गटांची स्थापना करून बचतीच्या मार्गात भांडवल निर्मिती करण्याची क्षमता वाढविणे.

(२) नाबार्डने स्वयंसेवी संघटनांना वित्त पुरवठा करणे.

(३) कालांतराने बँकांनी विकसित झालेल्या, स्वयंसहायता गटांना विशिष्ट कारणांसाठी बांधील असणारे कर्ज देणे व यातून गटाच्या सदस्यांना उत्पादक गुंतवणुकीसाठी ठरविलेल्या व्याजदराने कर्जाचे वाटप करणे.

या प्रकल्पातून आलेल्या अनुभवांची परिणती म्हणून सन. १९९२ मध्ये स्वयंसहायता गट बँक जोडणी या वित्त व्यवस्थेच्या नाविन्यपूर्ण प्रतिमानात झाली. नाबार्डने ५०० स्वयंसहायता गटांना सार्वजनिक व्यापारी बँकांशी जोडण्याचा पथदर्शी प्रकल्प सन. १९९२ मध्ये सुरू केला. रिझर्व बँक व नाबार्ड यांनी स्वयंसहायता गटांना वित्त पुरवठा

करण्यासंबंधीची अनौपचारिक मार्गदर्शक तत्वे बँकांना वितरित केली. लक्ष गट (Target Group Oriented) अभिमुख हे आशियाई देशातील बँक व्यवसायातील प्रथम पाऊल ठरले. यानंतर १९९६ मध्ये रिझर्व बँकेने स्वयंसहायता गट बँक जोडणी वित्त यंत्रणेचा बँकांच्या अग्रक्रम क्षेत्राच्या कर्जात समावेश करून या यंत्रणेला बँक व्यवहारांच्या मुख्य प्रवाहात आणले रिझर्व बँक आणि नाबार्ड यांच्या निकट सहकार्याने सर १९९६ पर्यंत या वित्त चळवळीची वाढ झाली. कर्ज परतफेडीची जवळजवळ १०० % प्रमाण असणाऱ्या या यंत्रणेच्या बाबतीतील बँकांच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे स्वयंसेवी संघटनांबरोबर बँकांनीही स्वयंसहायता गट स्थापन करण्यास सुरुवात केली.

केंद्र सरकारने सन. १९९९ मध्ये दारिद्र्य निर्मूलनासाठी घोषित केलेल्या सुवर्ण जयंती व ग्राम स्वयंरोजगार योजना या कार्यक्रमात स्वयंसहायता गटांमार्फत अनुदानरुपी कर्जाचे वाटप करून स्वयंरोजगार निर्माण करणे अभिप्रेत होते. या योजनेत अंतर्भूत असणारे स्वयंसहायता गट हे बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाचे वाटप सभासदांना करू लागले. नाबार्ड रिझर्व बँक ऑफ इंडिया आणि केंद्र सरकार यांच्या धोरणात्मक निर्णयामुळे स्वयंसेवी स्वयंसहाय्यता व्यष्टीय यंत्रणेचा विस्तार होऊन ती अधिक बळकट झाली. बँकांना जोडलेल्या स्वयंसेवी संघटनांची संख्या मार्च १९९३ अखेर केवळ २५५ होती ती मार्च २००८ अखेर १२ लाख २७ हजार ७७० इतकी वाढली. तर याच कालावधीत कर्ज वाटपाची रक्कम रुपये ०.२९ कोटी वरून ८८४९.२६ कोटी रुपयांपर्यंत वाढली. भारतातील ही वित्तीय व्यवस्था जगातील सर्वात मोठी स्वयंसहाय्यता बचत व कर्ज यंत्रणा ठरली.

**स्वयंसहायता गटाचा अर्थ व व्याख्या :-**

स्वयंसहाय्यता गटाचा अर्थ समजून घेतांना असे म्हणावे लागेल की, "एकाच वाडी वस्तीवरील, एकाच सामाजिक, आर्थिक स्तरांमधील समविचारी समान गरजा असणाऱ्या दहा ते वीस महिलांच्या संघटनेस स्वयंसहायता गट असे म्हणतात"

तसेच, "सर्वार्थाने साधर्म्य असणाऱ्या सभासदांनी वाजवी संख्येने स्वेच्छेने एकत्र येऊन सर्वांगीण प्रगती करिता बनविलेला व चालविलेला समूह म्हणजे स्वयंसहायता गट होय."

तर "परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे जाण्यासाठी स्वच्छेने संमतीने सामुदायिकपणे बचतीच्या निमित्ताने केलेली वाटचाल म्हणजे स्वयंसहायता गट होय."

**स्वयंसहायता गटाचे फायदे किंवा महत्व :-**

कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने स्वयंसहायता गटांचे महत्त्व हे अनन्यसाधारण असे आहे. त्याचे महत्त्व पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

(१) महिलांचे आर्थिक सामाजिक व मानसिक सबलीकरण करणे.

(२) स्वयंसहायता गटामुळे महिलांचा कौटुंबिक दर्जा वाढविणे व दबाव गट निर्माण करणे.

(३) आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना सावकाराच्या पाशातून मुक्त करणे.

(४) स्वयंसहायता गटामार्फत महिलांना संघटित करून 'स्व' अस्तित्वाची जाणीव करून देणे.

(५) महिलांमध्ये आत्मसन्मान व आदर निर्माण करणे.

(६) स्वयंसहायता गटातर्फे महिलांना काटकसर व बचतीची सवय लावून त्यांच्यात नेतृत्व गुण विकसित करणे.

(७) ग्रामीण भागातील दुर्बल महिलांना बचतीस प्रवृत्त करणे.

(८) स्वयंसहायता गटामार्फत सामाजिक उपक्रम राबविणे.

(९) स्वयंरोजगार निर्मितीसाठी स्वयंसहायता गटाद्वारे प्रशिक्षण देऊन उद्योजकता वाढविणे.

(१०) महिलांच्या ज्ञान, कक्षा रुंदावून महिलांना बँकिंग व्यवहाराची माहिती करून देणे.

(११) ग्राम पातळीवर उपलब्ध साधन संपत्तीच्या आधारावर आवश्यक ज्ञान व कौशल्यांच्या जोडीने समुदायाच्या गरजा भागविणे.

(१२) स्वयंसहायता गटाद्वारे महिलांचा ग्राम विकासात सहभाग वाढविणे. तसेच पंचायत समिती स्तरावरील सत्तेत सहभागी होण्यासाठी महिलांना सक्षम करणे.

(१३) स्त्री दृष्टिकोनाबाबत पुरुषांच्या मानसिकतेत बदल घडवून आणणे.

(१४) ग्रामीण भागातील अदृश्य स्वरूपाच्या निकामी पडून असलेल्या बचती स्वयंसहायता गटाद्वारे व्यवहारात आल्यामुळे पतनिर्मिती क्षमता वृद्धिंगत होण्यास मदत होते.

(१५) स्वयंसहायता गटामुळे गटातील सदस्य पर्यायाने कुटुंब, गाव, राज्य व देशाचे उत्पन्न वाढवून सर्वांगीण विकास साध्य करणे.

यावरून स्वयंसहायता गटाचे महत्त्व सिद्ध होते. स्वयंसहायता गटामुळे ग्रामीण व शहरी भागात विकासाचे व स्वयंरोजगार निर्माण होऊन विकासाला चालना मिळाली आहे. यात सहभागी होणारे सभासद स्वयंप्रेरणेने एकत्र येतात व यातून स्वतःचा व गटाचा विकास साध्य करतात हे स्वयंसहायता गटांच्या प्रगतीवरून स्पष्ट होते.

munotes.in

**भारतातील स्वयंसहायता गटाची प्रगती व विकास :-**

सन १९९२ पासून भारतात स्वयंसहायता गटांच्या कामकाजास प्रारंभ झाला. तेव्हापासून स्वयंसहायता गटांची प्रगती कशा प्रकारे झालेली आहे, याचा अभ्यास दोन टप्प्यात करता येईल. यासाठी भारतातील स्वयंसहायता गटांची प्रगतीचे वर्गीकरण पाहता भारतात स्वयंसहायता गटांची प्रगती दक्षिण भारतात केंद्रित झालेली आहे. त्यामानाने उत्तर भारतात स्वयंसहायता गट चळवळीची प्रगती फारशी झालेली दिसत नाही.

'आशिया पॅसिफिक ग्रामीण आणि शेती ऋण असोसिएशन' च्या साह्याने भारतामध्ये स्वयंसहायता गट कार्यक्रमास सुरुवात झाली. सन १९९२ मध्ये राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने नाबार्ड ५०० स्वयंसहाय्यता गटांना बँकेशी जोडण्याचा पथदर्शक प्रकल्प सुरू केला. त्यानंतर सन १९९३ मध्ये भारतीय रिझर्व बँकेने स्वयंसहायता गटांना कायदेशीर मान्यता दिली. रिझर्व बँकेने स्वयंसहायता गटांना सूक्ष्म वित्तासाठी मार्गदर्शक तत्वे वितरित करून १९९६ मध्ये स्वयंसहायता गटांना बँक संलग्नता यासाठी बँकिंग क्षेत्राच्या प्राधान्यक्रम कर्जाच्या क्षेत्रात समावेश केला. भारतामध्ये प्रामुख्याने तामिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र ही राज्य यात आघाडीवर आहेत.

**महाराष्ट्रातील स्वयंसहायता गटांची विभागनिहाय प्रगती :-**

महाराष्ट्रातील स्वयंसहायता गटांची १९९८-२००८ या १० वर्षातील सहा विभागातील प्रगतीचा अहवाल नोंदविलेला आहे. महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी महाराष्ट्रात सहा विभाग केलेले आहेत. त्यामध्ये मुंबई विभागात मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांचा समावेश होतो. नाशिक विभागात धुळे, जळगाव, नंदुरबार, नाशिक व अहमदनगर या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. तर पश्चिम महाराष्ट्र किंवा पुणे विभागात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. मराठवाडा विभागात औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद व बीड या आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. अमरावती विभागात बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. नागपूर विभागात वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या सहा जिल्ह्यांचा समावेश होतो.

महाराष्ट्रात स्वयंसहायता गट चळवळीची प्रगती असमतोल प्रमाणात झालेली आहे. एकत्रित संख्येनुसार महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र विभाग मार्च २००८ अखेर प्रथम क्रमांकावर असून द्वितीय क्रमांकावर नागपूर विभाग आहे. सन २००४-०५ पर्यंत नागपूर विभाग महाराष्ट्रात आघाडीवर होता. तर सन २००५-६ पासून पुणे विभागाचा राज्यात प्रथम क्रमांक आहे. पुणे विभागात विशेषत: प्रशासकीय मोहीम राबविण्यात आल्याचे हे श्रेय आहे. पश्चिम महाराष्ट्राची टक्केवारी २९.८१ % तर नागपूर विभागाची टक्केवारी २५.४० % अशी आहे. त्यानंतर मराठवाडा विभाग अनुक्रमे तिसऱ्या व अमरावती विभाग चौथ्या क्रमांकावर आहे. या दोन विभागांची टक्केवारी अनुक्रमे १६.२१ % व १६.०१ % अशी आहे. नाशिक विभागाचा क्रमांक हा पाचवा लागतो. नाशिक विभागाची टक्केवारी ७.८४ % एवढी आहे. महाराष्ट्रात शेवटचा सहावा क्रमांक कोकण विभागाचा आहे. कोकण विभागाची टक्केवारी फक्त ७.७० % इतकी आहे. अशा पद्धतीने महाराष्ट्रातील स्वयंसहायता गटाच्या प्रगतीचा अहवाल नोंदविन्यात आला आहे.

### ४.३.३ जागतिकीकरण (Globalization)

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शांतता आणि विश्वराज्य संकल्पना प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघटना स्थापन करण्यात आली. या संघटनेच्या वतीन अनेक संघटना जागतिक पातळीवर निर्माण करण्यात आल्या. यातून राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये सौहार्दपूर्ण व

मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित होऊ लागले. या प्रक्रियेतून राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये व्यापारी संबंध निर्माण झाले. या माध्यमातूनच गॅट कराराच्या रूपाने जागतिक पातळीवर उदारीकरण, खाजगीकरण किंवा जागतिकीकरण या संकल्पनांचा उदय झाला. वास्तविक पाहता, १९८५ नंतर जागतिकीकरण या संकल्पनेला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे. आज जगातील कोणतेही राष्ट्र जागतिकीकरणाच्या प्रभावापासून अलिप्त राहू शकत नाही. अनेक व्यापारी कंपन्यांचा विस्तार होऊन विदेशात प्रचंड प्रमाणात गुंतवणूक होत आहे. २१ व्या शतकाच्या प्रारंभी जगातील प्रत्येक राष्ट्राने जागतिकीकरणाचा स्वीकार केल्याचे दिसते.

**जागतिकीकरणाचा अर्थ व व्याख्या:-**

आधुनिक काळात सर्वत्र चर्चेचा असणारा विषय म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरणाला वैश्विकीकरण असा पर्यायी शब्द अनेक वेळा वापरला जातो. जागतिकीकरणाचा नेमका अर्थ समजून घेण्यासाठी पुढील व्याख्यांचा अभ्यास करावा लागेल.

**एडवर्ड हार्मन** यांच्या मते, " जागतिकीकरण ही उत्पादने, भांडवल, सेवा आणि आर्थिक संबंध यांचा सीमापार वाढता प्रवाह दर्शवणारी प्रक्रिया आहे."

**स्मिथ** यांच्या मते," जागतिकीकरण ही आंतरराष्ट्रीय वाद आणि सर्वांसाठी स्वातंत्र्य या मूल्यांचा समावेश असणारी आणि मुक्त व्यापार आणि अर्थव्यवस्थेची फायदे सर्वांना मिळून देणारी सर्व समावेशक प्रक्रिया आहे."

**रुसी मोदी** यांच्या मते, "जागतिकीकरण म्हणजे संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि वस्तू व सेवा यांची विक्री करणे होय."

**प्रो. सि.टी. कुरियन** यांच्या मते, "जागतिक अर्थव्यवस्था म्हणजे विविधता असलेल्या अर्थव्यवस्थांचा समूह होय. ज्यामध्ये निरनिराळ्या कार्यक्रमाने जे एकमेकांशी विविध मार्गाने परस्परांवर क्रिया करतात आणि अशा रीतीने कालांतराने त्यांच्या वृत्तीत बदल करतात, ही प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय."

**प्रो. देवेंद्र अवस्थी** यांच्या मते, " बाजारपेठेतील आर्थिक विकासाच्या डावपेचातून जागतिकीकरणाचे धोरण अस्तित्वात आले. आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक वातावरणाची राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा समन्वय साधण्याचा यात प्रयत्न होतो."

**श्रावण कुमार सिंग** यांच्या मते, “जागतिकीकरण म्हणजे सर्व राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि त्या बाजारपेठेत जगातील साधनसामग्रीचे आणि भांडवलाचे सुलभ परिचलन निर्माण करणे होय."

**संयुक्त राष्ट्र संघटना :-** "जागतिक सहकार्यांमधून नवी राजकीय व्यवस्था स्थिर करून विकसित करणे आणि त्या राष्ट्रांचा सर्वांगीण विकास करणे म्हणजे जागतिकीकरण होय."

ढोबळमानाने 'हे विश्वची माझे घर' या म्हणी प्रमाणे जागतिकीकरण म्हणजे काय? ते वरील व्याख्या वरून लक्षात येते. जागतिकीकरण संदर्भात असे म्हणता येईल की,

"Globalisation is a world economy created by the international division of labour and the world market. Globalisation, may also be defined as large scale, long term flow of capital, commodities, technology and labour, across the national boundaries."

**जागतिकीकरणाचे स्वरूप :-**

जागतिकीकरण ही आर्थिक एकीकरण व जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. यामध्ये राष्ट्रांतर्गत श्रमविभागणी आणि राष्ट्रीय बाजारपेठ यापेक्षा आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ यांचा प्रभाव अधिक असतो. जागतिकीकरण ही संकल्पना अतिशय व्यापक स्वरूपाची आहे. जागतिकरणातून भारतीय अर्थव्यवस्थेचा जगातील इतर राष्ट्राशी सुलभतेने आर्थिक समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जातो. जागतिकीकरणामुळेच राष्ट्रा-राष्ट्रातील उदार आर्थिक संबंध निर्माण होतात. जगातील प्रत्येक राष्ट्रात आणि राष्ट्रा-राष्ट्रातील उद्योगाची स्पर्धात्मकता वाढते. जागतिकीकरणामुळे तंत्रज्ञान, भांडवल व इतर साधनसामुग्री यांचे हस्तांतरण परस्पर राष्ट्रांमध्ये केले जाते. जगात होणाऱ्या महत्त्वपूर्ण संशोधन व विकासाचा लाभ सर्वच राष्ट्रांना जलद गतीने मिळतो. राष्ट्रातील उत्पादन क्षमता व कार्यक्षमतेत प्रचंड वाढ होते. अर्थव्यवस्थेला बंदिस्त करून मुक्ततेकडे घेऊन जाणाऱ्या आर्थिक धोरणालाच जागतिकीकरण असे म्हटले जाते. यामध्ये प्रामुख्याने आयात निर्यातीवरील शासनाचे नियंत्रण शिथिल केले जाते. तर खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराला प्रोत्साहन दिले जाते. बहुराष्ट्रीय कंपन्यांना प्रवेश देऊन मुक्त पारदर्शक व भेदभाव रहित व्यापारास प्रेरणा मिळते. आधुनिक तंत्रज्ञानाचे हस्तांतरण केले जाते. परकीय राष्ट्रांकडून भांडवल गुंतवणूक होते. देशांतर्गत नैसर्गिक साधनसंपत्तीचे संशोधन करून त्याचा उपभोग घेण्यासाठी निर्यातीचे धोरण अवलंबणे म्हणजेच, आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना देणे होय. थोडक्यात सर्व जग एक बाजारपेठ व जागतिक ग्राहकांसाठी उत्पादन हे जागतिकीकरणांमध्ये अभिप्रेत असते. जागतिकीकरणाची संकल्पना वस्तू व भांडवलाच्या मुक्त संचारावर भर देणारी आहे.

**जागतिकीकरणाचे गुण किंवा फायदे :-**

जगातील अनेक देशांनी जागतिकीकरणाचा स्वीकार केलेला आहे. १९९१ साली भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केला आहे. भारतासह इतर देशांनाही जागतिक कारणामुळे होणाऱ्या गुण-दोष व फायदे-तोटे यांची चर्चा करणे अपरिहार्य आहे.

**(१) आर्थिक विकासाला पोषक :-**

जागतिकीकरण जगातील सर्वच राष्ट्रांच्या आर्थिक विकासाला पोषक असून या धोरणामुळे मुक्त व्यापार व गुंतवणुकीचा फायदा अविकसित व विकसनशील राष्ट्रांना

अधिक मिळतो. तेथील लोकांच्या जीवनमानाचा दर्जा देखील उंचावतो. राष्ट्रांना आधुनिक बनविणारी ही प्रक्रिया होय.

**(२) विश्वराज्य व्यवस्था साकारली जाते :-**

जागतिकीकरणामुळे जगातील अंतरराष्ट्रीय संबंध दृढ झाले आहे. जग हे एक खेडेच बनले आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांतीकारी शोध लागले आहेत. नवनवीन तंत्रज्ञानाच्या साह्याने औद्योगीकरण क्षेत्रात आधुनिकीकरणाची प्रक्रिया वेग घेत आहे. ज्ञान व तंत्रज्ञाणामुळे आज जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत अगदी क्षणात पोहोचता येते. जग अतिशय जवळ आले आहे. राष्ट्रांच्या भौगोलिक सीमा जणू नाष्टच झाल्या आहेत. यातून विश्व एक राज्य ही संकल्पना पुढे येत आहे.

**(३) बहुराष्ट्रीय कंपन्यांचा विस्तार :-**

जागतिकीकरणामुळे जगात अनेक कंपन्यांचा अतिशय वेगाने विस्तार होत आहे. तसेच त्यांची गुंतवणूकही वाढत आहे. १९९५ सालाच्या शेवटी जगात ४० हजार बहुराष्ट्रीय कंपन्या व त्यांच्या २.५ लाख संलग्नित कंपन्यांसह कार्यरत होत्या. त्यांची २६०० अब्ज डॉलर्स एवढी परदेशातील गुंतवणूक होती. १९९१ वर्ष अखेरीस भारतात १८७ बहुराष्ट्रीय कंपन्या व त्यांच्या ९२६ संलग्नित कंपन्यासह कार्यरत होत्या. १९९४ वर्षाखेरीस त्यांची ३६२ कंपन्या होत्या. भारताच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाने प्रसिद्ध केलेले इंडिया २००५ (रेफरन्स ॲनिमल) मध्ये विदेशी कंपन्यांची संख्या प्रसिद्ध केली आहे.

**(४) स्पर्धेत वाढ होते :-**

जागतिकीकरणामुळे विकसनशील राष्ट्रांच्या स्पर्धेत व शक्तीत वाढ होते. जागतिकीकरण हे राष्ट्रांना स्वतःचा विकास करण्यासाठी व जलद आर्थिक विकासासाठी तसेच लाभदायक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन देते. म्हणजेच या प्रक्रियेतून विकसनशील, अविकसित व गरीब राष्ट्रांना विकासाची पुरेशी संधी प्राप्त होते.

**(५) जागतिक किंवा वैश्विक एकत्रीकरण :-**

जागतिकीकरणाने विकसनशील राष्ट्रांचा आर्थिक विकास करता येतो जागतिक कारणाने जगाची पुनर्रचना होऊन विकास होतो जागतिक व्यापारात अडथळे निर्माण होत नाहीत. यातून जागतिक सहकार्य वाढीस लागते. या प्रक्रियेतूनच जगातील राष्ट्रांचे एकत्रीकरण होऊ लागते.

munotes.in

**(६) आंतरराष्ट्रीय व्यापारात वृद्धी :-**

जागतिकीकरणामुळे प्रत्येक राष्ट्राच्या आयाती व निर्यातीत वाढ होते. वाढती निर्यात ही विकासाला प्रेरक ठरते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार व वृद्धीला पोषक अशी परिस्थिती जागतिकीकरणामुळे निर्माण होते.

**(७) उत्पादन क्षमतेचा योग्य उपयोग :-**

जागतिक कारणामुळे राष्ट्र-राष्ट्रातील अर्थव्यवस्थेच्या उत्पादनक्षमतेचा पर्याप्त वापर वाढतो. या धोरणामुळे विविध देशातील उत्पादने व बाजारपेठा वाढतात. त्यांच्या सोबत स्पर्धा करण्यासाठी कार्यक्षमता वाढवावी लागते. उत्पादन क्षमतेचा पूर्ण उपयोग करून घेतला जातो. त्याशिवाय स्पर्धेत निभाव लागत नाही. यामधूनच मोठ्या प्रमाणावर उत्पादनाच्या बचतीही प्राप्त होतात.

**(८) नव-नवीन तंत्रज्ञानाची निर्मिती व देवाण-घेवाण :-**

जगातील विविध देशात सतत संशोधन केले जाते. त्यातून नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत जाते. नव्या उत्पादनाच्या पद्धती नवीन उत्पादने अद्यावत साधनसामग्री विकसित केली जाते. जगातील सर्व राष्ट्रांच्या जलद आर्थिक विकासासाठी तंत्रज्ञानाच्या देवाणघेवाणीत कोणताही अडथळा निर्माण होत नाही. नव तंत्रज्ञानाची देवाघेवाण सुलभतेने व तत्परतेने होते. जागतिकीकरणा द्वारे जगातील विविध देशात तंत्रज्ञानाची देवाणघेवाण होत असते.

**(९) सामाजिक परिवर्तन :-**

जागतिक कारणामुळे सकारात्मक सामाजिक परिवर्तन होते. जागतिकीकरणामुळेच भारतीय जनतेच्या जीवन मनात मोठे परिवर्तन घडवून आले आहे. पाश्चिमात्य उत्पादनांच्या वापरामुळे लोकांचे जीवनमान बदलत चालले आहे. शिक्षण प्रक्रियेत देखील बदल घडून आल्याचे आढळते. समाज गतिशील होतो. समाजाची आधुनिकतेकडे वाटचाल होते.

**(१०) वाढते शहरीकरण किंवा नागरीकरण :-**

जागतिकीकरणामुळे औद्योगिक विकास घडून येतो. त्यातून रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतात. सततचा दुष्काळ आणि उध्वस्त झालेले शेती क्षेत्र पाहता, शहरीकरण किंवा नागरीकरण प्रक्रियेत झपाट्याने वाढ होत आहे. यातून गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार, कुपोषण, बालमृत्यू, आरोग्य अशा अनेक समस्या निर्माण झाल्या असल्या तरीही या समस्यांपेक्षा जागतिक कारणामुळे विकासाचा दर नक्कीच जास्त वाढला आहे. जागतिक निर्देशांकात याची नोंदही आहे.

### (११) इतर फायदे :-

जागतिकीकरण प्रक्रियेमुळे देशाच्या विदेशी चलन साठ्यामध्ये वाढ होते. तसेच देशातील उत्पादनाच्या वितरणातील विषमता देखील कमी होते. तर उद्योगधंद्यांच्या व्यवस्थापनात व कौशल्यात सुधारणा घडून येते. देशातील नैसर्गिक साधन संपत्तीचे संशोधन व पुरेपूर उपभोग घेता येतो.

## जागतिकीकरणाचे दोष किंवा तोटे :-

जागतिकीकरणामुळे ज्याप्रमाणे अनेक फायदे मानवी समूहाला झाले आहेत. त्याप्रमाणेच त्याचे काही दुष्परिणाम देखील आपणास भोगावे लागत आहेत. त्याचा उहापोह करणे आवश्यक ठरते.

### (१) चंगळवादात वृद्धी :-

जागतिकीकरणामुळे विकसित राष्ट्रातील चंगळवादी धोरणाने भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात देखील प्रवेश केला आहे. विकसनशील राष्ट्रात चैनीच्या वस्तूची मागणी वाढते आहे. त्यामुळे उत्पादनाचा प्राधान्यक्रम बदलतो आहे. समाजाच्या दृष्टीने महत्त्वाच्या वस्तू उत्पादित करन्या ऐवजी श्रीमंतांच्या गरजा भागविण्यासाठी उपलब्ध साधन सामग्रीचा वापर केला जातो. यातून आधुनिकतेच्या नावाखाली चंगळवादी राहणीमानाचा अतिरेक केल्याचे दिसून येते. उदा. खेड्यांमध्ये अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य यासारख्या मूलभूत गोष्टींची गरज असताना, देखील कोल्डड्रिंक्स, वेफर्स, मिनरल वॉटर व स्मार्टफोन इत्यादीच्या वापरासाठी गुंतवणूक केली जाते. यातून युवा पिढी भरकटत जाताना दिसून येत आहे. हा जागतिकीकरणाचा मोठा दुष्परिणाम होय.

### (२) कर्जबाजारीपणा व आर्थिक विषमतेत वाढ होते :-

जागतिकीकरणामुळे विकसनशील राष्ट्रावरील कर्जाचा बोजा वाढतो. आयातीचे प्रमाण वाढल्याने देणे परत फेडण्यासाठी पुन्हा कर्ज काढावे लागते. यातून कर्जाचा डोंगर सतत वाढत जातो. तर वैयक्तिक जीवनामध्ये चंगळवादी वृत्तीमुळे कर्ज काढून नागरिक चैनीच्या वस्तू खरेदी करतात. यातून ते कर्जबाजारी होतात. जागतिक कारणामुळे आर्थिक विषमतेची दरी वाढत जाते.

### (३) वाढते गुन्हेगारीकरण :-

जागतिकीकरणामुळे अनेक वेळा वस्तूंचा तुटवडा निर्माण होतो. त्यातून नफेखोर वृत्ती आणि महागाई वाढते. गरिबांना मूलभूत वस्तू खरेदी करणे परवडत नाही. म्हणून त्यातून वस्तूंची तस्करी, भ्रष्टाचार आणि गुन्हेगारीकरण वाढते.

### (४) बेकारी मध्ये वृद्धी :-

जागतिकीकरणामुळे शिक्षणाचे प्रमाण वाढले असून, कौशल्यपूर्ण शिक्षण घेणाऱ्यांची संख्या देखील वाढत जाते. अनेक वेळा औद्योगीकीकरणाच्या माध्यमातून निर्माण

munotes.in

झालेले कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या प्रशिक्षित कामगारांची संख्या अधिक प्रमाणात असल्यामुळे त्यातून बेकारीमध्ये वाढ होते. आणि देशात रोजगाराचा प्रश्न निर्माण होतो.

**(५) विदेशी गुंतवणुकीतील अडथळे :-**

भारतासारख्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात विदेशी गुंतवणूकदार फारसे उत्सुक नसतात. कारण नोकरशाहीची प्रवृत्ती, कामातील दिरंगाई, प्रशासकीय नियंत्रण, गैरव्यवहार, भ्रष्टाचार, उपासमार, कुपोषण व आर्थिक अस्थिरता इत्यादी. समस्यांमुळे भारतात बहुराष्ट्रीय कंपन्या फारसी गुंतवणूक करताना दिसत नाहीत. या उलट तैवान, दक्षिण कोरिया, इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड, फिलिपाईन्स यासारख्या लहान व लोकसंख्या कमी असलेल्या राष्ट्रांमध्ये गुंतवणुकीस प्राधान्य देतात. वरील प्रमाणे समस्या व अडथळे या लहान राष्ट्रांमध्ये निर्माण होत नाहीत.

**(६) पर्यावरण असंतुलन :-**

जागतिकीकरणामुळे औद्योगिक प्रगती झपाट्याने झाली. परंतु एकीकडे नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरिक्त उपभोग वाढत गेल्याने व शहरीकरण वाढल्याने पर्यावरणाचे संतुलन बिघडत गेले आहे. भूकंप, अतिवृष्टी, उष्माघात, दुष्काळ इत्यादी. पर्यावरणीय संतुलनाची समस्या निर्माण झाली आहे.

**(७) शेतीवरील अनिष्ट परिणाम :-**

बहुराष्ट्रीय कंपन्यांनी शेती बाजारावर लक्ष केंद्रित केले आहे. या कंपन्या बी-बियाणे खते कीटकनाशके यांचा पुरवठा करतात. तसेच जागतिक स्तरावरील शेती बाजारावर पूर्ण नियंत्रण ठेवतात. कृषी जागतिकीकरणाच्या व्यवस्थेत भारतासारख्या देशातील लहान शेतकऱ्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. फारशा उत्पादनाच्या दिशेने शेतीची वाटचाल सुरू झाल्यास, अन्न-धान्य उत्पादनातील स्वयंपूर्णतः नष्ट होईल. राष्ट्राला अन्नधान्याच्या आयातीवर अवलंबून राहावं लागेल हे परावलंबन अत्यंत धोकादायक ठरेल. शेती क्षेत्रात जैविक तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. त्यामुळे शेती आता प्रयोगशाळेत बंदिस्त होईल. संगणकाच्या माध्यमातून शेतीचे रूपांतरण कारखान्यात होईल. यातून शेती क्षेत्र पूर्णतः उद्ध्वस्त होईल.

**(८) संस्कृतीवर अनिष्ट परिणाम :-**

जगातील प्रत्येक देशाला आपली प्राचीन संस्कृती प्रिय असते. जागतिकीकरणाचा देशाच्या संस्कृतीवरच अनिष्ट परिणाम होतो. असे नाही तर राष्ट्रातील लोकांची जीवन पद्धती, खान-पान, वेशभूषा, संगीत, जीवनमूल्य, धर्म, या सर्व बाबींवर जागतिकीकरणाचा दुर्गामी परिणाम होतो. जागतिक कारणामुळे पारंपारिक जीवन पद्धती व मूल्य नष्ट होत आहेत. विकसनशील देशातील तरुण वर्ग आपल्या देशातील समृद्ध सांस्कृतिक परंपरा विसरून पाश्चात्यांच्या अनिष्ट चालीरीती परंपरांचा स्वीकार करत आहेत. यातून देशातील प्राचीन संस्कृती व परंपरा नष्ट होत आहे.

munotes.in

**(९) बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी :-**

बहुराष्ट्रीय कंपन्यांनी बँकिंग, विमा, माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार सेवा, कायदा, वैद्यकीय सेवा, पर्यटन, जाहिराती, लेखापरीक्षा, इत्यादी. विविध क्षेत्रात आपली मक्तेदारी निर्माण केली आहे. यातून जनतेचे शोषण होत आहे. या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आर्थिक साम्राज्य निर्माण होत आहे.

**(१०) नव-वसाहतवादाचे धोरण :-**

जगामध्ये १८ व्या व १९ व्या शतकामध्ये ब्रिटिश, फ्रेंच, डच, व पोर्तुगीज कंपन्यांनी व्यापाराच्या नावाखाली आपले साम्राज्य प्रस्थापित केले होते. आज या बहुराष्ट्रीय कंपन्या देखील मोठ्या प्रमाणामध्ये याच विकसित राष्ट्रांच्या आहेत. या कंपन्यांच्या माध्यमातून व जागतिक संस्थांच्या संगनमताने नव-वसाहतवादी धोरण अवलंबत आहेत. यातून आर्थिक साम्राज्यवाद निर्माण होत आहे.

अशाप्रकारे विसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात जगातील अनेक देशाने खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या आधारे आर्थिक सुधारणा केल्या व अनेक विकासशील राष्ट्रांना जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, यासारख्या संस्थांनी कर्ज देताना आर्थिक सुधारणा करण्याच्या अटी घातल्या आहेत. भारतालाही १९९१ नंतर आर्थिक सुधारणांचा पाठपुरावा करावा लागला. भारतीय अर्थव्यवस्थेवर अनेक बरे वाईट परिणाम झाल्याचे आजही दिसून येते.

### ४.३.४ नागरीकरण किंवा शहरीकरण (Urbanization)

प्राचीन कालखंडापासूनच भारतात नागरी संस्कृतीची सुरुवात झाली आहे. सर्वात प्राचीन समजल्या जाणाऱ्या सिंधू संस्कृतीतील मोहनजोदडो व हडप्पा हे नगरांची उत्तम उदाहरणे आहेत. महाभारत व रामायण यामध्ये देखील नगरांचा उल्लेख दिसून येतो. भारतीय समाजास नागरी संस्कृतीचे आकर्षण सुरुवातीपासूनच राहिले आहे. शहरातील विविध सुख सोयींकडे ग्रामीण जनतेने आकर्षित होणे सहाजिक आहे. नागरीकरणाची प्रक्रिया ही प्राचीन कालखंडापासून चालू आहे. परंतु नागरीकरणाला जगात खऱ्या अर्थाने गती मिळाली, ती औद्योगिक क्रांतीनंतरच नागरीकरणाचे वाढते स्वरूप लक्षात घेता, प्रशासकीय व समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा बनला आहे.

१९५० मध्ये जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ३० % लोकसंख्या शहरात राहणारी होती. वर्तमान स्थितीत जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ५० % टक्के लोकसंख्या ही शहरवासीय बनली आहे. एकूण लोकसंख्या व देशातील नागरिकांचे प्रमाण लक्षात घेता, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड हे जगात सर्वात जास्त नागरीकरण झालेली राष्ट्रे आढळली आहेत. जगात सर्वात जास्त लोकसंख्या असलेले शहर जपानची राजधानी टोकियो ही आहे. तर दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे अमेरिकेतील न्यूयॉर्क व लॉस एंजिल्स ही शहरे होत. अमेरिकेतील 'पॉप्युलेशन क्रायसिस कमिटी' ने जगातील शंभर महानगरांची पाहणी केली. त्यामध्ये भारतातील पुणे हे शहर सर्वात लहान आहे. यावरून जागतिक नागरीकरणाचे स्वरूप लक्षात येते.

भारताच्या संदर्भात २०११ च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या १२१ कोटी पेक्षाही अधिक आहे. एकूण लोकसंख्येपैकी ३१.१६ % नागरी लोकसंख्या आहे. देशात दहा लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणारी जवळपास ५० शहरे आहेत. मुंबई हे देशात सर्वात जास्त लोकसंख्या असलेले शहर आहे. मुंबईनंतर अनुक्रमे कलकत्ता, दिल्ली आणि चेन्नई असा क्रमांक लागतो. भारतात राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात नागरी लोकसंख्येची स्थिती पाहता, गोवा ४९.०८ % मिझोरम ४९.०६ % तामिळनाडू ४४.०० % तर महाराष्ट्र ४२.०४ % असे आहे. गोवा हे राज्य भारतातील सर्वात जास्त नागरीकरण झालेले राज्य आहे. तर केंद्रशासित प्रदेशाच्या बाबतीत दिल्ली हे सर्वात जास्त नागरीकरण झालेला केंद्रशासित प्रदेश आहे. देशात सर्वात कमी नागरीकरण असलेले राज्य म्हणजे हिमाचल प्रदेश व बिहार हे आहेत.

महाराष्ट्रात २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राचे एकूण लोकसंख्या ११ कोटी २३ लाख ७४ हजार ३३३ एवढी आहे. यापैकी नागरी लोकसंख्या पाच कोटी आठ लाख १८ हजार २५९ इतकी आहे. तर नागरी लोकसंख्येचे हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ४५.२२ % इतके आहे. महाराष्ट्रात दहा लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणारे मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक व औरंगाबाद ही चार शहरे आढळली आहेत. महाराष्ट्रात मुंबई व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे १०० % नागरी आहेत. तर नागपूर, ठाणे, पुणे व उल्हासनगर हे चार तालुके देखील पूर्णपणे नागरी किंवा शहरी आहेत.

सर्वसाधारणपणे शहर किंवा नगर म्हणजे ज्या भागात अधिक लोकसंख्या एकवटलेली असते. म्हणजेच लोकसंख्येची घनता जास्त असते. जिथे बिगर कृषी व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण ३/४ पेक्षा अधिक असते, व जेथे शिक्षण, व्यापार, वाहतूक, दळणवळण, बँका, मनोरंजनाची साधने उपलब्ध असतात. तसेच विविध भौतिक सुविधा, अत्याधुनिक सोयीसुविधा, उपलब्ध असतात व जेथे नागरिकांचे राहणीमान उंचावलेले असते. अशा मानवी वस्तीला नगर किंवा शहर असे म्हटले जाते. लोकसंख्येनुसार व नगराच्या विकासानुसार शहराचे संक्रमणकालीन शहर, छोटे शहर, मोठे शहर व महानगर असे वर्गीकरण केले जाते.

**नागरीकरणाचा किंवा शहरीकरणाचा अर्थ व व्याख्या :-**

ग्रामीण भागातून शहरी भागाकडे लोकांचे होणारे स्थलांतर म्हणजे नागरीकरण होय. नागरिकरणासंबंधी विचारवंतांनी विविध बाजूने व्याख्या स्पष्ट केल्या आहेत. त्यांचा उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल.

**श्रीराम माहेश्वरी** यांच्या मते, "नागरीकरण म्हणजे ग्रामीण ते शहरी वातावरण असे लोकसंख्येचे स्थलांतर होय."

**एंडर्सन** यांच्या मते, "नागरीकरण एकतर्फी प्रक्रिया नसून दूतर्फी प्रक्रिया आहे. यामध्ये केवळ ग्रामीण क्षेत्रातून नागरिक्षेत्रात स्थलांतरित होणे असे नाही तर प्रवाशांच्या दृष्टिकोनातून विश्वासात, मूल्यात आणि व्यवहारातील स्वरूपात बदल होणे असा आहे."

munotes.in

**नागरीकरणाची कारणे :-**

नागरीकरणाची वाटचाल पाहता व शहराबद्दलचे लोकांचे आकर्षण लक्षात घेता. असे लक्षात येते की, नागरीकरण ही सतत गतिशील व न थांबणारी प्रक्रिया आहे. जगात नागरिकांना खरी गती औद्योगिक क्रांतीनंतरच प्राप्त झाली. नागरीकरणाची गती त्या-त्या शहरातील उपलब्ध असलेल्या रोजगार, व्यापार, दळणवळण, उद्योगधंदे, शैक्षणिक केंद्र, मनोरंजनाची साधने, इत्यादीवर अवलंबून असलेले दिसून येते. जसे काही शहरांचे नागरिकरण वेगाने तर काही अति वेगाने व काही मध्यम गतीने तर काही शहरात अत्यंत मंद गतीने होताना दिसून येते. या वेगवेगळ्या स्वरूपाच्या शहरीकरण किंवा नागरीकरणासाठी विविध कारणे कारणीभूत ठरली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने औद्योगिकीकरण, बिगर कृषी व्यवसायांना अधिक महत्त्व, वाढती लोकसंख्या, वाहतूक व दळणवळणाच्या पुरेशा सुविधा, व्यापार व व्यवसायाचे विकेंद्रीकरण, कौशल्यपूर्ण शैक्षणिक सुविधा, शहरांचे वाढते आकर्षण, आधुनिकीकरण व पाश्चातीकरण, पर्यटन व मनोरंजनाचे केंद्र, राजकीय घडामोडी, इत्यादी. कारणामुळे भारतात शहरीकरण किंवा नागरीकरण हे वेगाने वाढत आहे. वाढत्या नागरीकरणातून काही समस्या किंवा अडचणी देखील पुढे आल्या आहेत. त्यांचाही गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

**नागरीकरणा पुढील समस्या :-**

भारतात वाढत्या नागरीकरणामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने वाढते गुन्हेगारीकरण, बाल गुन्हेगारांचे प्रमाण, रोजगाराची समस्या, गलिच्छ वस्त्यां मधील वाढ, वाहतुकीची समस्या, प्रदूषणाचे वाढते प्रमाण, जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा, आरोग्याच्या समस्या इत्यादी. अनेक प्रकारच्या समस्या वाढत्या नागरीकरणामुळे पुढे येत आहेत. या समस्येवर वेळीच उपाययोजना होणे आवश्यक आहे. यामुळेच महात्मा गांधींनी खेड्याकडे चला हा संदेश प्रत्येक नागरिकाला दिला आहे. या संदेशाचे सर्वांनी पालन केले, तर निश्चितच नागरीकरणाची ही समस्या दूर होऊ शकते.

### ४.३.५ स्थानिकीकरण (Localization)

जागतिकीकरणाच्या पूर्णतः विरुद्ध असा हा दृष्टिकोन आहे. तो अशा विश्वासावर आधारित आहे की, ज्यावरील संसाधनांचे व्यवस्थापन करायचे आहे. (उदा. वन, समुद्र किनारपट्टी, शेती, शहरी व ग्रामीण सुविधा, इत्यादी.) त्याचे सर्वोत्तम ज्ञान आणि त्यावर त्यांचा प्राथमिक अधिकार असतो. अर्थात, हे प्रत्येक वेळी खरेच असते असे मात्र नाही. पण दोन शतकांच्या प्रबळ शासन वर्चस्वी धोरणांमुळे स्थानिकांच्या अशा क्षमता पारंपारिक नियम आणि नियामक संस्था अशा साऱ्यांची आता अधोगती झालेली असली तरी ही अशा समूहांचे शासकीय आणि नागरी समाजाकरवी सबलीकरण करून मूलभूत उत्पादन, उदयोग, व्यापार, स्वास्थ्य सुविधा, शिक्षण आणि अन्य सेवा यांचे पुन्हा स्थानिकीकरण करणे शक्य आहे.

भारतात आजही विकेंद्रित स्तरावर एकत्र काम करून झोपडपट्टीवासीय महिलांचे गट व अन्य नागरिक यांना अनेक कामांसाठी प्रवृत्त केले आहे. त्यातून पानलोटाचं पुनर्जीवन, पाण्याच्या साठवणुकीची आणि वितरणाची विकेंद्रीत व्यवस्था, घनकचऱ्याचे व्यवस्थापन, गरीब महिलांना उपजीविका मिळवून देणे, मलनिसारण, सर्वांसाठी चांगली घरे अशी काम झाली आहेत. गुजरात मधील भुज या जिल्ह्याप्रमाणेच बंगळुरू, पुणे आदी शहरांमध्येही सजग

munotes.in

नागरिक ७४ व्या घटनादुरुस्तीची मदत घेऊन विकेंद्रीत स्थानिक नियोजनाचा आग्रह धरत आहेत. यापूर्वी महात्मा गांधीजींनी ग्रामराज्याची संकल्पना अस्तित्वात आणून, त्या माध्यमातून खेड्यातील स्थानिक लोकांच्या हातून स्थानिक विकास घडून आणण्यासाठी श्रमाला महत्त्व दिले. तसेच, स्थानिक पातळीवर लघु, कुटीर व हस्त उद्योगांना प्राधान्य दिले. गांधीजींचे हे विचार म्हणजेच, स्थानिकीकरणाकडे असलेली वाटचाल होय. यावरून स्थानिकीकरणाची संकल्पना लक्षात येते.

स्थानिकीकरण यशस्वी होण्यासाठी जात, धर्म, लिंग यांच्या आधारे पारंपारिक पद्धतीने जे शोषण होत आहे. त्याचा सामना करणे आवश्यक ठरते. स्थानिक पातळीवरील अशी विषमता दूर करता येतात हे अनेक उदाहरणांनी दाखवून दिलेलं आहे. आंध्रातील डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीनं दलित महिलांना प्रतिष्ठा आणि गौरव मिळवून दिला आहे. तामिळनाडूतील कुंभकोणम या जिल्ह्यातील दलित आणि उच्च जाती आता अधिक बरोबरीच्या नात्याने व्यवहार करू लागल्या आहेत. तसेच नर्मदा बचाव आंदोलनाच्या जीवनशाला मधून आदिवासी मुला-मुलींचे सबलीकरण होत आहे. जागतिकीकरणामुळे जात, धर्म व लिंग या आधारे होणारे शोषण कमी होत आहे. ही प्रक्रिया पूर्णतः सहभागी स्वरूपाची आणि स्थानिकांचे हक्क आणि वहीवाट यांची जाणीव ठेवणारी असते. या योजनेत ग्रामीण भागाशिवाय शहरांसाठीही काही कृती कार्यक्रम असतील. त्यांनी आपल्या क्षेत्रात पडणाऱ्या पावसाचे पाणी जमिनीत मुरवावं, रिकाम्या जागांमध्ये शेतीबागा करून उत्पादन घ्यावे, ऊर्जा उत्पादन करावे. शहरांना खेड्यांकडून काहीतरी घेत राहावे लागेल. स्वतः पूर्ण निष्क्रिय राहून बांडगुळाप्रमाणे खेड्यांचे शोषण करत जगावे हा अनुचित प्रकार थांबवायला हवा. स्वतःच्या जास्तीत जास्त गरजा त्यांनी स्वतःच भागवायला हव्यात, आपल्या संसाधनांचा वापर कसा करायचा हे ग्रामीण जनता जितक्या ठोसपणे ठरवेल आणि ठणकावून सांगू शकेल. तेव्हाच आपल्या जीवनशैलीच्या आघातांविषयीची जाणीव शहरवासीयांमध्ये जितकी अधिक निर्माण होईल.

समुचित अशा स्थानिक विकास प्रयत्नांतून खेडी जस जशी पुनर्जीवित होत जातील, तस तशी सध्याची खेड्यांकडून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरांची गंभीर प्रक्रिया धीमी होत जाईल. कालांतराने ती उलटी ही होऊ शकेल. महाराष्ट्रात राळेगणसिद्धी आणि हिवरे बाजार इथे समाज प्रगती सहयोगाच्या कामामुळे, मध्यप्रदेशातल्या देवास जिल्ह्यात आणि तरुण भारत संघाच्या कामामुळे राजस्थानातल्या अलवर या जिल्ह्यातही असं उलट स्थलांतर घडून आल्याची उदाहरणे आहेत. शहरीकरणाकडून ग्रामीण भागाकडे स्थानिकीकरण प्रक्रिया घडवून येईल. अशा प्रकारचे हजारो प्रयोग सामाजिक पातळीवर सुरू आहेत. ते जलनियोजन, जैवविविधतेचे संरक्षण, शिक्षण प्रशासन, अन्न आणि विविध वस्तूंचे उत्पादन, ऊर्जा उत्पादन, कचरा व्यवस्थापन अशा अनेक क्षेत्रातले आहेत. ते खेड्यातही चालू आहेत. ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्ती ही ग्रामीण आणि शहरी समुदायांमधील सत्तेच्या विकेंद्रीकरणाबाबतची तरतूद आहे.त्यांचा तार्किक शेवट स्थानिकीकरण या संकल्पनेमध्येच होतो.

ह्याची काही जिती जागती उदाहरणे अशी की, पिक वैविध्यातून धारणाक्षम शेती कशी करता येते. हे डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीच्या दलित महिलांनी, कर्नाटकातील ग्रीन फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या समुदायांनी बीज बचाव आंदोलनाच्या शेतकऱ्यांनी आणि नव धान्याच्या जैव पंचायतीनं दाखवून दिलं आहे. वन पांथळ जागा, पूर्ण

किनारपट्ट्या वन्यजीव इत्यादींच्या संरक्षणाचे आणि पुनरुजजीवनाचे अनेक उत्स्फूर्त सामाजिक प्रयत्न आज ओडिशा, महाराष्ट्र, उत्तराखंड, नागालँड आणि अन्यही अनेक राज्यात सुरू आहेत. शिक्षण, स्वास्थ्य, सेवा इत्यादींचा सामुदायिकरण वाढवत स्थानिक नियंत्रण करण्याचे यशस्वी प्रयत्न नागालँड सरकारने केले आहेत. कमी पावसाच्या आवर्षण प्रवन क्षेत्रात जल स्वावलंबनाचे अनेक प्रयत्न यशस्वी झालेले आहेत. विकेंद्रीत जलसंग्रहण आणि काटेकोर पाणी वाटप यामुळेच हे शक्य झाले आहे. राजस्थानातील अलवर या जिल्ह्यातील तरुण भारत संघाचे काम याबाबतीत उल्लेखनीय असे आहे. खेड्यांच्या जीवावर बांडगुळी जीवन जगणारी शहर ही सध्याची पद्धत सोडून स्वावलंबी शहराच्या दिशेत गेलेलं शहर म्हणजे गुजरातीतलं भुज, हुन्नर, शाला, सहजीवन, कच्छ महिला विकास संघटन, व ए.सी.टी. अशा अनेक गटांनी एकत्रित येऊन उल्लेखनीय असे कार्य केले आहे.

**सारांश :-**

अशा प्रकारे प्रस्तुत प्रकरणांमध्ये भारतातील स्थानिक स्वंशासना समोरील उद्भवणाऱ्या समकालीन समस्या व आव्हानांचा वेध घेन्यात आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये तळागाळापर्यंत लोकशाहीचे विकेंद्रीकरण व सत्तेचे विकेंद्रीकरण घडवून आणण्यासाठी तळागाळातील क्षमता वाढवण्याचा वेळोवेळी प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामध्ये स्थानिक पातळीवर नेतृत्व निर्माण करणे, निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांची क्षमता वाढविणे, कार्यकर्त्यांची क्षमता वाढविणे, संस्थात्मक क्षमता वाढविणे, ज्ञान नेटवर्किंग व संप्रेषण क्षमता वाढविणे, वित्तीय क्षमता वाढविणे, इत्यादी. क्षमता वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासोबतच, ग्रामीण पातळीवरील समस्या सोडविण्यासाठी आणि तळागळातील क्षमता वाढविण्यासाठी स्वयंसेवी संस्था, संघटना आणि स्वयंसहायता गट यांची भूमिका कशा प्रकारे महत्वपूर्ण राहिली आहे. त्याचे अध्ययन केले आहे. तसेच ग्रामीण पातळीवरील स्थानिकीकरण कशा प्रकारे घडून येत आहे. या बाबींचा विचार करण्यात आला आहे. जागतिकीकरनाचा कोणत्या प्रकारचा प्रभाव निर्माण झाला आहे. जागतिकीकरणाचे गुण, दोष व फायदे, तोटे याचा अभ्यास केला आहे.नागरिकरण ही प्रक्रिया औद्योगिकरणामुळे उद्यास आलेली असून ग्रामीण पातळीवर याचा नेमका कसा प्रभाव पडला आहे. या संकल्पनांचे देखील सविस्तर अध्ययन करण्यात आले आहे.

**आपली प्रगती तपासा :-**

(१) स्थानिक स्वशासना समोरील समकालीन समस्या व आव्हाने विशद करा?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

(२) स्थानिक स्वराज्य संस्थेतील तळागाळातील क्षमता निर्माण करणाऱ्या घटकांची चर्चा करा?

(३) स्वयंसेवी संस्थांची सविस्तर माहिती सांगा?

(४) स्वयंसहायता गटाचे प्रमुख प्रकार सांगा?

(५) जागतिकीकरणाचे स्वरूप सांगून त्याचे गुण व दोषांची चर्चा करा?

(६) नागरीकरण म्हणजे काय ते सांगून नागरीकरणाची प्रमुख कारणे विशद करा?

(७) स्थानिकीकरण ही संकल्पना स्पष्ट करा?

munotes.in

**संदर्भ :-**

(१) Dr. S.L. Goel, and Dr. Shalini Rajneesh, (2009) Panchayatiraj In India, Deep & Deep Publication Pvt. Ltd., New Delhi.

(२) B.S. Khanna, (1999) Rural Local Government In India and South Asia, New Delhi.

(३) डॉ. श्याम शिरसाट व प्रा. भगवानसिंग बैनाडे, (२०१४) पंचायती राज आणि नागरी प्रशासन, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

(४) डॉ. जे. के. भालेराव, स्वयंसेवी संघटना: रचना व कार्यपद्धती (NGO), विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

(५) डॉ. बी. एस. पिंपळे, डॉ. पी. व्ही. भुताळे, प्रा. बाजीराव वडवळे, (२००७) कर्मचारी व वित्तीय प्रशासन, सह्याद्री प्रकाशन नांदेड.

❄❄❄❄❄❄

munotes.in